**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. दीपकराव साळुंखे)**

**पृ.शी.** : नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा सुरू होऊनही पायाभूत सुविधांची कामे अपूर्ण असणे.

**मु.शी.** : नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा सुरू होऊनही पायाभूत सुविधांची कामे अपूर्ण असणे यासंबंधी सर्वश्री जयवंतराव जाधव, दीपकराव साळुंखे, अनिल भोसले, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा सुरू होऊनही पायाभूत सुविधांची कामे अपूर्ण असल्यामुळे नाशिक व त्र्यंबकेश्वर येथील साधुमहंतांनी तीव्र नापसंती व्यक्त केलेली असणे, सिंहस्थ कुंभमेळयासाठी येणाऱ्या भाविकांची कुचंबणा होऊ नये म्हणून भाविकांना पुरेशा प्रमाणात सोयी-सुविधा पुरविण्यात याव्यात असे मा.उच्च न्यायालयाने शासनास माहे एप्रिल, 2015 च्या तिसऱ्या सप्ताहात निर्देश दिलेले असणे, सिंहस्थ कामांसाठी शासनाने नाशिक महानगरपालिकेला पुरेसा निधी उपलब्ध करुन न दिल्यामुळे महापालिकेने विकासकामांसाठी 250 कोटी रुपयांचे कर्ज घेतलेले असणे, पंचवटी परिसरातील 100 खाटांच्या हॉस्पिटलसाठी आवश्यक स्टाफ आणि यंत्रसामुग्री उपलब्ध न झाल्यामूळे महापालिकेसमोर वैद्यकीय सेवेचा यक्षप्रश्न निर्माण झालेला असणे, सिंहस्थ कुंभमेळा सुरू होवूनही जिल्हा रुग्णालयातील नवीन 200 खाटांच्या रुग्णालयाबाबतचे नियोजन, रक्तपुरवठा, औषधे, यंत्रसामुग्री, खाटांचे नियोजन, खाजगी सेवा घेण्याबाबतची निविदा, परिचारीकांचे प्रशिक्षण त्याबाबत होत असलेली दिरंगाई, कुंभमेळ्याच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पार्श्वभुमीवर नाशिक विमानतळावरुन प्रवासी वाहतुक सुरू न केल्यामुळे हवाई प्रवासाअभावी पर्यटकांची होणारी गैरसोय, प्रदुषित गोदावरी नदीमध्ये स्नान न करण्याचा साधु महंतांनी पवित्रा

..2



श्री. जयवंतराव जाधव ....

घेऊनही गोदावरी प्रदुषण नियंत्रणात आणण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांनी व्यक्त केलेली हतबलता, दहशतवादी हल्ले व घातपाताची शक्यता विचारात घेवून साधु महंतांची विशेष सुरक्षा व्यवस्था ठेवण्याची आवश्यकता, सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी देशभरातून येणाऱ्या साधु महंतांकरिता पुरेसा अन्नसाठा पुरवठा करण्याचा शासनाचा प्रस्ताव केंद्राने मान्य करुनही या मंजुर धान्याची राज्य शासनाने अन्न धान्य महामंडळाच्या गोडाऊनमधून उचल न केल्यामुळे सदर धान्याचे नियतन व्यपगत होणे, राज्य शासनाने सदर धान्य उचलण्यासाठी पाठविलेला पुनर्प्रस्ताव केंद्राकडे प्रलंबित असल्यामुळे ऐन सिंहस्थात सवलतीच्या दरात धान्य उपलब्ध होते की नाही याबाबत पेचप्रसंग निर्माण झालेला असणे, माहे जून, 2015 मध्ये झालेल्या पावसाने साधुग्राममधील निकृष्ट कामामुळे साधुग्रामची दुरावस्था होणे, सिंहस्थ कुंभपर्वात वादळी पाऊस आल्यास साधुग्रामची वाताहत होऊ नये म्हणून उपाययोजना करण्याची आवश्यकता, वैश्विक इव्हेन्ट असलेल्या सिंहस्थाचे ब्रँडींग तसेच प्रचार व प्रसाराबाबत कार्यवाही न केली जाणे, याबाबत शासनाकडून दिरंगाई व टाळाटाळ केली जात असल्यामुळे साधु महंत व भाविकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, यावर शासनामार्फत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मी नाशिकच्या कुंभमेळ्याच्या संदर्भात लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे. राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी या संदर्भातील उत्तर द्यावे असे माझे, माझ्या सन्माननीय सहकाऱ्यांचे व सभागृहाची अपेक्षा हाती. परंतु काही हरकत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांचे तेवढेच विश्वासू, कर्तबगार माननीय राज्यमंत्री उत्तर देण्याकरिता उपस्थित आहेत. मला निश्चितच खात्री आहे. कुंभमेळा हा माझ्या लक्षवेधी सूचनेचा एखादा विषय नसून त्या माध्यमातून तमाम भविकांच्या भावना मी व्यक्त करीत आहे. विषय गंभीर असल्यामुळे लक्षवेधी सूचनेवर माझे मत व्यक्त करताना मी आपल्याकडून संरक्षणाची अपेक्षा करतो. नाशिक येथे कुंभमेळ्याचा ध्वजारोहण सोहळा 4 दिवसांपूर्वीच संपन्न झाला आहे. कुंभमेळ्याच्या संदर्भातील सर्व कामे पूर्णत्वास आलेली आहेत असे गृहीत धरून कुंभपर्व सुरुझालेले असते. परंतु आजही तेथे 30-35 टक्के कामे अपूर्ण अवस्थेत आहेत. कुंभपर्वाच्या पर्वणीच्या निमित्ताने ती कामे घाईने करण्याचा प्रयत्न झाला तर कामांच्या दर्जाबाबत निश्चितच शंका उपस्थित हाणार आहे. मी नाशिक मनपा आयुक्तांचे मन:पूर्वक अभिनंदन करीन. माननीय मुख्यमंत्र्यांनी आम्हाला चांगले सक्षम आयुक्त दिलेले आहेत. मनपाचे अधिकारी/कर्मचारी यांना पूर्वीच्या कुंभमेळ्याचा अनुभव असल्यामुळे प्रत्येक जण काम करण्याचा चांगल्या पध्दतीने प्रयत्न करीत आहे. महापौर, आयुक्त देखील काम करण्याचा प्रयत्न करीत आहेत. नुकतेच राज्याचे मुख्य सचिव श्री. स्वाधिन क्षत्रिय साहेब आले होते, त्यांच्याकडे मनपा आयुक्तांनी 750 कोटी रुपयांच्या निधीची मागणी केली आहे. महापौरांनीही मागणी केली आहे. सदर मागणीच्या अनुषंगाने शासन वैयक्तिक परत काही भार उचलणार का अथवा नाशिक मनपाच्या मूलभूत सुविधांकरिता कमी पडणारा निधी केंद्र शासनाकडून तातडीने उपलब्ध करून देणार का ? आम्ही अधिकाऱ्यांचे कौतुक करीत असलो तरी काही गोष्टींच्या संदर्भात त्रुटी, अपूर्णत्व निदर्शनास येत आहे. वृत्तपत्रांत अनेकदा उल्लेख केला जातो की, आरोग्य विभागामध्ये प्रशासकीस उदासीनता आहे. जिल्हा उप रुग्णालयाच्या सारख्या तत्सम गोष्टी खात्यामार्फत उपलब्ध करून द्यायच्या आहेत. सदर विषयाच्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले आहे. जिल्हा उप रुग्णालयाची इमारत अपूर्ण आहे, त्यासाठी लागणारे युनिट आवश्यक आहे, ते कधी पोहचणार आहे ? तांत्रिक स्टाफ, डॉक्टर यांची आजतागायत उपलब्धता करून दिलेली

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयवंतराव जाधव ....

नाही. आपण या सर्व गोष्टी तसेच स्टाफ, डॉक्टर्स यांची उपलब्धता किती दिवसांत करून देणार आहात ? (अडथळा) हा कुंभमेळ्याच विषय आहे. हा विषय दोन प्रश्नांनी संपणारा नाही. मी सदर विषयावर प्रश्न मांडताना संरक्षण देण्याबाबत सांगितले आहे. भाविकांसाठी कुंभमेळा ही पर्वणी आहे तशी प्रशासनातील अधिकाऱ्यांना पैसे घेण्याचीही ही पर्वणी आहे. हेड डायरेक्टर यांच्याकडून साडे चार कोटी रुपयांची डर्टी खरेदी झाली. नाशिक मनपाने जंतूनाशके औषधे मागितली नाहीत आणि जिल्हा प्रशासनानेही मागितली नाहीत. परंतु तरीही साडे चार कोटी रुपयांची जंतूनाशके औषधे नाशिक मनपाकडे सरळ पाठवून दिली. आमचे आयुक्त सक्षम आहेत आणि त्यामुळे त्यांनी सांगितले की, आम्ही ही खरेदी मागितलेली नाही. मग शासनाने का पाठविली आहे ? सभापती महोदय, तेथे तो ट्रक 4 दिवस उभा हाता. आयुक्तांनी स्पष्ट नकार दिल्यावर तो ट्रक काल हलविला. डर्टी खरेदी कोणाच्या मार्गदर्शनाखाली झाली, कोणाच्या मागणीनंतर झाली आहे ? साडे चार कोटी रुपयांची खरेदी परत पाठविण्यात आली. ती साडे चार कोटी रुपयांची जंतूनाशके औषधे कुठे देण्यात आली, आपण याबाबत चौकशी करणार का ?

सभापती महोदय, जिल्हा परिषदेने सांगितले की, दरवर्षीप्रमाणे आखड्यांना स्वस्त धान्य उपलब्ध करून देण्याची जबाबदारी जिल्हा प्रशासनाची असते. परंतु यामध्ये दोन भिन्न गोष्टी आढळून आल्या. केंद्र शासनाकडून धान्य मंजूर करून देण्यात आले होते, त्याचे पत्र जिल्हा प्रशासनाला उपलब्ध झाले नाही का की जिल्हा प्रशासनाच्या उदासीनतेमुळे कुंभमेळ्यांचे धान्य उचलण्यात आले नाही ? वेगवेगळी कारणे दिली आहेत. मध्यंतरीच्या काळात 7 तहसीलदारांना निलंबित केले. त्यामुळे धान्य उचलण्यात आले नाही झाले की पत्रच उशिरा आले याची चौकशी होऊन तातडीने सर्व आखाड्याकरिता केंद्र शासनाने मंजूर केले अधिकचे स्वस्त धान्य तातडीने उपलब्ध करून, याबाबतीत अनियमितता झाली आहे, ती शोधून त्यावर कारवाई करणार का ? माननीय मंत्र्यांनी साधू ग्रामबाबत लेखी उत्तर दिले आहे, असे सांगण्यात आले आहे की, स्वच्छते

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

बाबत अमुक अमुक उपलब्ध करून देण्यात येईल. त्यामध्ये घंटा गाडी आहे. मी सांगू इच्छितो की, नाशिक मनपा घंटागाडी सुरूकरणारी पहिली मनपा आहे. मानीनय मंत्री सक्षम आहेत. ..5



श्री. प्रकाश महेता : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी 1-1 प्रश्न विचारावा. सन्माननीय सदस्यांना पुन्हा प्रश्न विचारण्यास संधी देण्यात येईल. परंतु एकाच वेळी 4-5 प्रश्न विचारले तर माननीय राज्यमंत्री त्याची उत्तरे कशी देणार ? सन्माननीय सदस्यांचे समाधान होत नाही तोपर्यंत त्यांना प्रश्न विचारूद्यावेत.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांनी कुंभमेळ्याच्या संदर्भात महत्वाचे प्रश्न विचारले आहेत. कुंभमेळ्यासाठी मोठ्या संख्येने भाविक येतात. 12 वर्षांनी अतिशय मोठ्या उत्साहाने होणारा उत्सव महाराष्ट्रात होऊ घातला आहे आणि आता त्याची सुरूवातही झाली आहे. निश्चितच यासाठी प्लॅनिंग इन डिटेल, प्लॅनिंग इन ॲडव्हान्स यांचे खूप जास्त महत्त्व आहे. केंद्र शासनाकडून मनपाला राहिलेला निधी उपलब्ध करून द्यावा असे त्यांनी संगितले आहे. सदर उपक्रमासाठी एकूण 919 कोटी रूपये प्रस्तावित आहेत, त्यापैकी 689 कोटी रूपये हा केंद्र शासनाचा वाटा आहे तर राज्य शासनाचा वाटा 230 कोटी रूपये आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील.....

वाढीव 230 कोटी रुपये खर्चासाठी नाशिक महानगरपालिकेला कर्ज घ्यावे लागेल, असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. महापालिकेने उचलावयाच्या खर्चाच्या हिश्याचा हा प्रश्न आहे. राज्य शासनाने आपल्या हिश्याची रक्कम यापूर्वीच दिलेली आहे. तथापि, निधी देण्याबाबत सहानुभूतिपूर्वक विचार करावा, असा आग्रह सन्माननीय सदस्यांनी धरलेला आहे. राज्य शासन केंद्र सरकारकडे जाऊन निधी मिळविण्याचा कसोशीने प्रयत्न करील. 12 वर्षानंतर भव्य असा उत्सव नाशिक येथे होत आहे. त्यामुळे या उत्सवाचा सर्व प्रपंच योग्य पध्दतीने व्हावा, या साठी केंद्र सरकारकडे अतिरिक्त निधीचा आग्रह धरला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी नाशिक येथील रुग्णालये, त्यामधील कर्मचारी वर्ग, डॉक्टर या बाबतचाही प्रश्न उपस्थित केला आहे. पंचवटी येथील रुग्णालय, शासनाचे जिल्हा रुग्णालय यांना सूचना देण्यात आल्या आहेत. कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिक येथे येणाऱ्या सर्वांचीच दर्जेदार उपचाराची सोय झाली पाहिजे. त्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या मनुष्यबळावर अवलंबून न रहाता अधिकचे मनुष्यबळ उपलब्ध करुन द्यावयाचे होते. परंतु, तेवढ्या प्रमाणात कौशल्यप्राप्त मनुष्यबळ उपलब्ध झाले नाही. त्यामुळे कंत्राटी पध्दतीने डॉक्टरांची उपलब्धता करता येईल किंवा कसे, या बाबतचा निर्णय झाला आहे. तसेच, त्या परिसरातील ग्रामीण रुग्णालये, सिव्हिल हॉस्पिटल, मेडिकल कॉलेजेस, संदर्भ रुग्णालये यामध्ये उपलब्ध असलेले सुपर स्पेशालिस्ट व स्पेशालिस्ट यांची कुमक त्या ठिकाणी पाठविण्याची तजवीज करण्यात आली आहे.

सभापती महोदय, नाशिक येथे आवश्यकता नसताना औषधांचा पुरवठा करण्यात आला, एका ट्रकमध्ये साडेचार कोटी रुपयांची औषधे होती, या औषधांची मागणी महापालिकेकडून करण्यात आली नव्हती, जंतुनाशक औषधांची आवश्यकता नसताना ती पाठविण्यात आली, अशा प्रकारचे मुद्दे सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केले आहेत. या संदर्भात निश्चितपणे चौकशी केली जाईल, अहवाल घेतला जाईल, वस्तुनिष्ठ माहिती घेतली जाईल आणि या संदर्भात चुकीची कार्यवाही झाली असेल तर संबंधितांवर कारवाई केली जाईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील.....

सभापती महोदय, रेशन दुकानांवर अन्नधान्याचा अपुरा पुरवठा करण्यात आलेला आहे, पुरवठा करण्यात आलेल्या अन्नधान्याची उचल करण्यात आलेली नाही, अशी माहिती सन्माननीय सदस्यांनी दिली आहे. सन्माननीय सदस्य सांगत असलेली माहिती आणि शासनाकडे उपलब्ध असलेली माहिती यामध्ये विसंगती आहे. तथापि, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली माहिती सत्यकथन समजून या संदर्भात सुध्दा सखोल चौकशी करुन अहवाल घेण्यात येईल व पुढील कार्यवाही केली जाईल.

सभापती महोदय, नाशिक येथे भव्य प्रमाणात कुंभमेळ्याचा उत्सव साजरा करण्यात येत असून We are hosting this festival. त्यामुळे तेथील स्वच्छतेला फार महत्त्व आहे. त्या ठिकाणी घंटागाडी सुरु करण्याचा आणि कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा ठेका विलंबाने का देण्यात आला, असा शेवटचा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे. सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नामध्ये तथ्य असून हा ठेका देण्यामध्ये थोडा विलंब जरुर झाला आहे. तथापि, तेथील स्वच्छतेच्या बाबतीत जे काही करता येईल ते सर्व करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. तातडीने या संदर्भातील सर्व बिडरची एक बैठक बोलाविण्यात येईल, त्यांच्यामधील वादांचे निराकरण करण्यात येईल, एल-1 ऐवजी एल-2 ला कंत्राट देण्यात आले असेल तर सर्वांना एकत्रित बोलावून त्या मधून मार्ग काढण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव जाधव यांनी एका महत्वाच्या विषयावर लक्षवेधी सूचना मांडली आहे. मी आपल्याकडून संरक्षण मागणार नाही. मी मोजकेच दोन-तीन प्रश्न मंत्री महोदयांना विचारणार आहे.

सभापती महोदय, कुंभमेळ्याच्या निमित्ताने विमानसेवा सुरु करण्यात आली आहे. पुणे-नाशिक ही विमानसेवा पहिल्या आठवड्यातच बंद झाली आहे. हे अधिवेशन संपण्यापूर्वी किंबहुना पुढील आठवड्यात याबाबत आवश्यक ती कार्यवाही करुन ही विमानसेवा पूर्ववत करण्यात येईल का ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे.......

सभापती महोदय, जुन्नर येथे शंकराचे सुप्रसिध्द पांडुरेश्वर देवस्थान आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने आलेले सुमारे 10 ते 15 हजार साधुसंत आणि भक्तगण या देवस्थानाला भेट देण्यासाठी येणार आहेत. त्या अनुषंगाने आवश्यक त्या सोयी-सुविधा निर्माण करण्याचा निर्णय शासनाने घेतला असला तरी अद्याप स्वच्छतागृहांचे काम किंवा इतर काही कामे अपुरी आहेत. आवश्यक तेवढा निधी देऊन ही सर्व कामे पुढील आठवड्यापर्यंत पूर्ण झाली पाहिजेत, अशा प्रकारचे नियोजन राज्य शासन करणार आहे का ?

सभापती महोदय, कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिक येथे मोठ्या प्रमाणावर साध्वी देखील आलेल्या आहेत किंवा येणार आहेत. महिला साध्वींना शाही स्नानासाठी जागा मिळावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. तथापि, या संदर्भात एक वादग्रस्त चर्चा त्या ठिकाणी सुरु आहे. वाद न वाढविता सामंजस्याने मार्ग काढून महिला साध्वींना देखील जागा उपलब्ध करुन देण्याबाबतच्या त्यांच्या मागणीबाबत शासन विचार करणार आहे का ?

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी उपस्थित केलेले प्रश्न अतिशय महत्वाचे आहेत.

सभापती महोदय, गेले महिनाभर शर्थीचे प्रयत्न करुन त्या ठिकाणी विमानसेवा सुरु झालेली आहे. नाशिक-पुणे ही विमानसेवा जवळ जवळ आठवडाभर सुरु होती. 6 ते 7 सिटर एअरक्राफ्ट सुरु करण्यात आले होते. या विमानाला नाशिक येथे मुक्काम करावा लागतो व त्यासाठी 25 ते 30 हजार रुपयांचे भाडे द्यावे लागते. साधारणपणे 5 हजार रुपये विमानाचे तिकीट असून या माध्यमातून विमान कंपनीला 35 ते 40 हजार रुपये उत्पन्न मिळते व त्यामधील 25 ते 30 हजार रुपये भाड्यामध्ये खर्च होतात. त्यामुळे त्यांना ही विमानसेवा परवडत नव्हती. याबाबत त्यांनी राज्य शासनाकडे भाडे कमी करुन मिळावे, अशा प्रकारची विनंती केली होती. या संदर्भात आम्ही केंद्र सरकारच्या संबंधित मंत्री महोदयांशी आणि संबंधित विभागाशी बोललो आहोत व भाडे कमी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

करण्याची विनंती त्यांना केली आहे. पुढील आठवड्यात ही विमानसेवा पूर्ववत होईल, अशी अपेक्षा आहे.

...4....



श्री.गिरीष महाजन.....

सभापती महोदय, पुणे-नाशिक विमानसेवेप्रमाणेच मुंबई-नाशिक विमानसेवेसाठी एक चार्टर्ड प्लेन कंपनीने सुरु केले आहे. या सेवेच्या दिवसांतून दोन फेऱ्या होतात. या विमानाला नाशिक येथे मुक्काम करावा लागत नसल्यामुळे त्यांना भाड्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. ही विमानसेवा सुरळित सुरु आहे.

सभापती महोदय, पुणे येथून नाशिकला किंवा परतीच्या प्रवासाला रस्तामार्गाने साधारणपणे पाच ते सहा तासांचा कालावधी लागतो. त्यामुळे नाशिककर आणि पुणेकरांची नाशिक-पुणे विमानसेवेची गरज लक्षात घेऊन या विमानसेवेबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जुन्नर येथील पांडुरेश्वर देवस्थानाबाबतचा प्रश्न उपस्थित केला आहे. येथील कामांसाठी काही निधी उपलब्ध करुन दिलेला असून कामे सुरु आहेत. लवकरात लवकर, आठवड्याभरात शौचालयाची व इतर सर्व कामे पूर्ण होतील.

सभापती महोदय, साध्वींच्या शाहीस्नानाच्या जागेबाबतचा महत्वाचा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे. या पूर्वीच्या कुंभमेळ्यांमध्ये महिला साध्वींची उपस्थिती फारशी नसायची. तथापि, पहिल्यांदाच या कुंभमेळ्याला साध्वींची उपस्थिती लक्षणीय आहे. गेल्या दोन-तीन महिन्यांपासून त्यांचे आगमन होत आहे. या साध्वींची संख्या साधारणपणे 5 ते 7 हजार एवढी आहे. त्यांनीही जागेची मागणी केली होती. तथापि, साधु-महंतांनी यास हरकत घेतली. साध्वींची व्यवस्था येथे करु नये, असे त्यांचे म्हणणे होते. त्यामुळे थोडा वाद निर्माण झाला होता, असे म्हणावयास हरकत नाही. या संदर्भात तेथील महंत, महामंडलेश्वर यांच्याशी चर्चा करुन साध्वींनाही जागा देण्याबाबतचा निर्णय झालेला आहे. साधु-महंतांनी ही मागणी मान्य केली आहे व त्यानुसार साध्वींनाही शाहीस्थानासाठी आपण वेळ व जागा निश्चित करुन देणार आहोत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या कुंभमेळ्यासाठी साधु-महंतांची ग्रेडेशननुसार सोय केली आहे का ? याचे कारण असे आहे की, काही साधु आलिशान ए.सी.युक्त तंबुंमध्ये

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

रहात आहेत, साध्वी त्यांची सेवा करीत आहेत, त्यांना वायफाय इंटरनेट, संगणक सुविधेपासून सर्व

...5....



श्री.जयंत प्र.पाटील...........

सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत, असे चित्र आम्ही कालच दूरदर्शनवर बघितले आहे. तथापि, काही साधु मात्र स्वच्छतागृहांमध्ये रहात आहेत. त्यामुळे तेथे जमलेल्या साधुंना त्या स्वच्छतागृहाचा वापर करता येत नाही, हे खरे आहे का ? यावर काही बंधन शासन आणणार आहे का ? तसेच, सर्व साधु-महंतांची एकच ग्रेड ठेवण्यात येईल का ? आलिशान सुविधा देण्याचे बंद करुन या कुंभमेळ्याचे माहात्म्य शासन अबाधित राखणार आहे का ?

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, साधुंनी कोठे रहावे, कसे रहावे, अे.सी.मध्ये रहावे की, नॉन अे.सी.मध्ये रहावे, हा साधु-महंतांचा प्रश्न आहे. आपण बघितले तर त्र्यंबकेश्वर किंवा नाशिक येथे या साधु-महंतांचे मोठमोठे आश्रम आहेत. पाहिजे तर मी सन्माननीय सदस्यांना तेथे घेऊन जाईन. आपण माझ्याबरोबर एकदा चला. आपला विश्वास बसणार नाही. पण राजकीय लोकांना मागे टाकतील, अशा व्यवस्था त्या ठिकाणी आहेत व त्या परंपरागत आहेत. फार मोठ्या प्रमाणावर जमीन त्यांनी घेतली आहे. त्या ठिकाणी चार ते पाच लाख साधु येणार आहेत. त्यांची मोठमोठी मेडिकल कॉलेजेस आहेत, हजारो एकर जमीन ते राखून आहेत. संपूर्ण देशात त्यांच्या जमिनी आहेत.

यानंतर श्री.बोरले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.गिरीष महाजन...........

असे महामंडलेश्वर, साधुमहंत त्या ठिकाणी आलेले आहेत. आपण त्र्यंबकेश्वर येथे गेलात तर त्या ठिकाणी त्यांची शकडो एकर जागा आहेत, आश्रम आहेत. त्या ठिकाणी त्यांनी साधुसंत, भक्तगण यांना राहण्यासाठी एअर कंडिशनर व्यवस्था केलेली आहे. त्या ठिकाणी मोठ-मोठे मंदीर आहेत. हा त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे. परंतु, शासनाने त्यांना एअर कंडिशनर, नेट किंवा वायफाय उपलब्ध करुन दिलेले नाही, तर ही त्यांची स्वत:ची वैयक्तिक व्यवस्था आहे. आपण बाहेरुन येणाऱ्या साधुंसाठी 325 एकर जागा घेऊन त्या ठिकाणी त्यांची व्यवस्था केलेली आहे. आपण त्या ठिकाणी शौचालय, आंघोळ, पाणी, वीज, ड्रेनेज, रस्ते अशी व्यवस्था केलेली आहे. ते त्या ठिकाणी आल्यानंतर तेथे राहुटी उभारतात आणि त्या राहुटी पंचतारांकित असतात. आपण त्यांना फक्त ओपन जागा दिलेली आहे. काही महामंडलेश्वर पंचतारांकित राहुटीमध्ये राहतात. आपण तेथे गेल्यानंतर आपण राहुटीमध्ये आहोत की कोठे आहेत, याची आपण कल्पनाही करणार नाही. ते स्वतः त्यांची व्यवस्था करतात. शासन भेदभाव करते, अशातला भाग नाही. कोणतेही साधू स्वच्छतागृहात राहत नाहीत. ते शौचालयामध्ये गेले असतील आणि तुम्हाला वाटले की, ते तेथे राहतात. परंतु, मी सांगू इच्छितो की, कोणतेही साधू स्वच्छतागृहात राहत नाहीत. शासनातर्फे असा कोणताही भेदभाव केला गेलेला नाही.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी नाशिक शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. माननीय पालकमंत्र्यांनी नुकताच मुख्यमंत्री महोदयांसमवेत नाशिक येथे ध्वजारोहण रोहळा पार पाडलेला आहे. नाशिक येथे कुंभमेळ्याचा कार्यक्रम एका वर्षासाठी चालणार आहे. कुंभमेळ्यामध्ये पर्वणीच्या ज्या तारखा असतात त्या दिवसाची क्रिटीकल मॅनेजमेंट करण्यासाठी आज आपल्याकडे पुरेसा वेळ आहे. पहिला ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाला त्या दिवशी नाशिक शहरात किती गर्दी झाली होती, त्या दिवशी ट्रॅफिकचे नियोजन व्यवस्थित रीत्या पार पाडण्यात आले होते काय आणि त्यातील पहिला इव्हेन्ट झाल्यानंतर त्याचा फिडबॅक शासनाने घेतलेला आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, आज कुंभमेळा म्हटल्यानंतर नाशिक शहराची जी बेसिक लोकसंख्या आहे आणि जी मायग्रेटिंग

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले.........

पॉप्युलेशन आहे, म्हणजे वर्षभरासाठी नाशिक येथे मुक्कामासाठी आलेले साधुसंत, साध्वी यांचे मेळावे, त्यांची व्यवस्था संपूर्ण वर्षभरासाठी राहणार आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने भाविक मोठ्या संख्येने वर्षभर नाशिक येथे येणार आहेत. त्यातील प्रायॉरिटीज आपण ठरविलेल्या आहेत काय ? आपण सारखा विमान सेवेचा उल्लेख करतो. आपण विमानाचा प्रश्न थोडा वेळ बाजूला ठेवला तरी चालेल. परंतु, नाशिक येथे येण्यासाठी ट्रेनची कनेक्टिव्हिटी आणि नाशिक रोड ते नाशिक शहर, नाशिक ते त्र्यंबकेश्वर हा रस्त्याचा प्रवास आणि वाहतूक सुरक्षित होणार आहे काय, त्यासाठीचे नियोजन काय आहे ? तसेच, ट्रॅफिकच्या संदर्भात आपण एक वेगळा सेल तयार करुन पंचवटी, तपोवन, नाशिक रोड, मुंबई-आग्रा महामार्ग, धुळे रस्त्याने येणारी ट्रॅफिक या सर्व ठिकाणी आपण कशा प्रकारचे नियोजन केलेले आहे, हे बघण्याची आवश्यकता आहे. दुसरी गोष्ट अशी की, नाशिक येथे एक टास्क फोर्स असला पाहिजे. त्यामध्ये गृह विभाग, नगर विकास विभाग, प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या लोकांचा सहभाग असला पाहिजे. कारण, कुंभेळा वर्षभर भाविकांसाठी, साधुसंतांसाठी अतिशय महत्वाचा आहे. परंतु, वर्षभरात तेथील नदीची जी दुर्दशा होणार आहे त्याचे नियमित मॉनेटरिंग झाले पाहिजे. कारण, आपल्याला यापूर्वीच हायकोर्टाने सूचना दिलेल्या आहेत की, कदाचित आम्हाला कुंभमेळा भरविण्यावरच बंदी घालावी लागेल. वर्षभरात तेथील नदीची जी दुर्दशा होणार आहे त्याबाबत मोठा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यासाठी नाशिक येथे एक किंवा दोन दिवसासाठी नाही तर वर्षभरासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाची यंत्रणा आवश्यक आहे. आपण या दृष्टीने कोणते नियोजन केलेले आहे ? तसेच, आता पर्वणीच्या तारखा निश्चित झालेल्या आहेत. त्या दिवशीचे नियोजन कसे असणार आहे आणि तयासाठी सर्व यंत्रणांनी एकत्रितपणे मॉकड्रिल घेतलेले आहे काय ? माझा शेवटचा प्रश्न असा आहे की, प्रत्येक पर्वणीच्या वेळी तेथे मोठ्या प्रमाणावर व्हीआयपी लोक येतात. त्या दृष्टीने नियोजन करणे आवश्यक आहे. कारण, त्यावेळी सर्व यंत्रणाांवर ताण पडतो. मागील कुंभमेळ्यात जशी दुर्दैवी घटना घडली तशी घटना पुन्हा घडू शकते. या सर्व गोष्टींचा विचार करुन आमचे नाशिक शहर सुरक्षित कसे राहील आणि खरे म्हणजे पर्वणीसाठी अधिकचा निधी देऊन त्या शहराचे पुढील 12 वर्षाचे नियोजन करुन



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले........

तेथे सोईसुविधा कशा उपलब्ध करुन देता येतील, तेथील नदीचे पाणी स्वच्छ ठेवणे या दृष्टीने नाशिक शहराला शासनामार्फत कोणते दीर्घकालीन फायदे देता येतील याबद्दल आपण विचार करणार आहात काय ?

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, आपण त्या ठिकाणी जवळपास 2378 कोटी रुपयांच्या कामांचे नियोजन केलेले आहे. सुरुवातीला असे ठरले होते की, 25 टक्के निधी राज्य व केंद्र शासन आणि 75 टक्के निधी महानगरपालिका देईल. डिसेंबर महिन्यात कुंभमेळ्याचा मंत्री म्हणून माझ्या नावाची घोषणा करण्यात आली. आपण नागपूर येथे मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीसाठी सर्व लोकप्रतिनिधी, महानगरपालिकेचे अधिकारी उपस्थित होते. आपणही त्या बैठकीस उपस्थित होता. त्या बैठकीच्या वेळी महानगरपालिकेने 75 टक्के निधी देण्यास असमर्थता दर्शविली आणि हे खरे आहे की, महानगरपालिकेला 18 कोटी रुपये उपलब्ध करुन देणे शक्य नव्हते. म्हणून आम्ही 50-50 टक्के निधी उपलब्ध करुन द्यावा, असे त्यांना सांगितले. परंतु, त्यांनी सांगितले की, आम्ही 25 टक्के निधी उपलब्ध करुन देऊ आणि 75 टक्के निधी शासनाने उपलब्ध करुन द्यावा. आपण ते मान्य केले. त्यानंतर महानगरपालिकेचा 25 टक्के हिस्सा आणि शासनाचा 75 टक्के हिस्सा असा रेश्यो ठरविण्यात आला आणि त्या अनुषंगाने सर्व कामे हाती घेण्यात आली. मी सुरुवातीलाच सांगितले की, मूळ आराखडा 1052 कोटी रुपयांचा होता. त्यानंतर 1119 कोटी रुपयांचा सुधारित आराखडा तयार करण्यात आला. महानगरपालिकेने आणि शासनाने आपापला हिस्सा दिलेला आहे, यामध्ये दुमत नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले साहेबांनी तेथे होणाऱ्या गर्दीचे व्यवस्थापन आपण कशा प्रकारे करणार आहात, असा दुसरा प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी सांगू इच्छितो की, परवा 14 तारखेला त्या ठिकाणी ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाला. त्यावेळी 3 ते 3.5 लाख लोक तेथे उपस्थित होते. पोलीस यंत्रणेने बारकाईने लक्ष ठेवून संपूर्ण नियोजन केले होते.

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन........

त्यांना थोडे मागे जाऊ द्यावे, पुढे जाऊ द्यावे यावरुन थोडी बोलाचाली झाली. परंतु, हा विषय वेगळा आहे. ही पर्वणी वर्षभर चालणार आहे. कुंभमेळा वर्षभर होणार आहे आणि ऑगस्ट, 2016 मध्ये त्याची समाप्ती होईल. परंतु, सर्वात जास्त गर्दी शाहीस्नाच्या वेळी होत असते. त्यावेळी जास्त काळजी घ्यावी लागते. प्रथम शाहीस्थान दिनांक 29 ऑगस्ट, 2015 रोजी, दुसरे शाहीस्थान दिनांक 13 सप्टेंबर, 2015 रोजी आणि तिसरे शाहीस्थान 18 सप्टेंबर, 2015 रोजी होणार आहे. शाहीस्नाच्या दिवशी तेथे कोटीच्या संख्येने गर्दी होईल. म्हणून त्या दिवशीचे नियोजन अत्यंत महत्वाचे असते. पोलीस यंत्रणा, महसूल विभाग, एस.टी., रेल्वे विभाग यांनी सादरीकरण केले होते. आम्ही त्या वेळी सर्व लोकप्रतिनिधींना आमंत्रित केले होते. गर्दी कशी असेल, कोठे असेल, त्याचे नियोजन कसे करायचे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे जवळपास 600 सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. आपण सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून तेथील प्रत्येक मुव्हमेंटवर नियंत्रण ठेवणार आहोत. छोटी गल्ली, मुख्य रस्ते, ज्या भागातून लोक येणार आहेत, जेथे ट्रॅफिक होणार आहे, पार्किंग व्यवस्था, रेल्वे स्टेशन, एसटी स्टँड अशा ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्यासाठी कन्ट्रोल रुम तयार केलेले आहे, ते बघण्यासारखे आहे. आपण पाहिजे तर त्या ठिकाणी जाऊ या. सर्व गोष्टींचे नियोजन केलेले आहे. कोणत्या ठिकाणी जास्त गर्दी आहे हे आपल्याला सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये दिसेल आणि ती गर्दी कोणत्या रस्त्याने डायव्हर्ट करावयाची याबाबत संबंधितांना सूचना देता येतील. बारीकसारीक गोष्टींचा अभ्यास करुन तेथे होणाऱ्या गर्दीचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे कोणतीही अडचण येईल, असे मला वाटत नाही. मागील वेळी जी दुर्दैवी घटना घडली त्यामध्ये 27-28 लोकांचा मृत्यू झाला होता. त्यावेळी जो शाहीस्नाचा रस्ता होता तो अतिशय अरुंद होता आणि त्या रस्त्याला खूप स्लोप होता. या कुंभमेळ्यातील सर्वात मोठे यश जर कोणते असेल तर ते म्हणजे आपण तो रस्ता बदलला आहे. नाही तर आज काल रस्ता बदलणे किती जिकीरीचे आणि कठीण काम आहे, याची आपल्याला देखील कल्पना आहे. आम्ही सर्व साधुमहंतांना विनंती करुन तेथील रस्ता बदलला आहे. मागील वेळी जेवढा रस्ता होता त्यापेक्षा

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन........

तिप्पट मोठा रस्ता केलेला आहे. त्या रस्त्याला स्लोप नाही, तो रस्ता सरळ आहे. मला असे वाटते की, मागील वेळी जी परिस्थिती निर्माण झाली तशी परिस्थिती आता निर्माण होणार नाही. आम्ही त्या दृष्टीने संपूर्ण काळजी घेतलेली आहे. आपण व्हीआयपी मुव्हमेंटच्या बाबतीत उल्लेख केलेला आहे. आम्ही माननीय राष्ट्रपती, माननीय पंतप्रधान आणि सर्व पक्षाच्या नेत्यांना आमंत्रण दिलेले आहे. परंतु, माननीय पंतप्रधानांनीशाहीस्नाच्या वेळी व्हीआयपी, व्हीव्हीआयपी यांना तेथे अलाऊ करायचे नाही, असे आम्हाला सांगितले आहे आणि ते बरोबर आहे. अगोदरच पोलीस यंत्रणेवर खूप मोठा ताण आहे आणि व्हीव्हीआयपी आल्यानंतर सर्व रस्ते, मुव्हमेंट बंद होतात. म्हणून शाहीस्नानाच्या वेळी तेथे कोणतेही व्हीआयपी किंवा व्हीव्हीआयपी येणार नाहीत. इतर दिवशी स्नानासाठी जास्त गर्दी असणार नाही, इतर दिवशी स्नानासाठी लाखोच्या संख्येने गर्दी राहील.

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन...

पर्वनीच्या वेळी त्या ठिकाणी व्हीव्हीआयपी मुव्हमेंट होणार नाही, याची काळजी घेण्यात आली आहे. प्रदूषणाच्या बाबतीत तेथे हरितकुंभ करण्याचे जाहीर केले आहे. नाशिकमधील सर्व लोक स्वयंस्पुर्तीने कामे करीत आहेत. महाविद्यालयीन तरुण, संस्थांचे पदाधिकारी, अनेक संघटना, तालमी अशा प्रकारे सर्वपक्षीय लोकांना सोबत घेऊन प्लॉस्टीक मुक्त हरितकुंभ करण्याचे ठरविले आहे. प्लॉस्टीकमुळे त्रास होतो म्हणून गावात व शहरात प्रवेश करताना अनेक स्वयंसेवी संस्थानी कापडी पिशव्या देऊ केल्या आहेत. तेथील प्लॉस्टीकच्या पिशव्या काढून त्यांना कापडी पिशव्या कार्यकर्त्यामार्फत देण्यात येणार आहेत. त्यामुळे नाशिक शहर प्लॉस्टीकमुक्त होणार आहे. पर्यावरण व प्रदूषणाच्या दृष्टीने जेवढी काळजी घेता येईल तेवढी काळजी घेण्याचा प्रयत्न शासनातर्फे करण्यात आलेला आहे.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अतिशय सविस्तर उत्तर दिलेले आहे. माझे एक दोन प्रश्न अतिशय महत्वाचे आहेत. गोदावरी प्रदूषणाचा विषय सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी उपस्थित केला आहे. आता निसर्गाच्या कोपामुळे त्या ठिकाणी पाणी उपलब्ध नाही, त्यामुळे गोदावरी नदी शंभर टक्के प्रदूषित झाली आहे. ही बाब शासन देखील मान्य करीत आहे. मंत्री महोदयांनी गोदावरी नदी पाहिली आहे.. त्या नदीमध्ये आज देखील शहरातील ड्रेनेजचे पाणी सोडण्यात येत आहे. हे पाणी नदीत येऊ नये यासाठी महानगरपालिकेला शासनातर्फे काही विशेष सूचना देण्यात येतील काय ? नदीतील पाणी स्नान करण्यासाठी योग्य राहील याची खबरदारी शासनातर्फे घेण्यात येईल काय ?

सभापती महोदय, साधुग्रामच्या जागा दरवेळी प्रशासनातर्फे भाडेतत्वावर घेण्यात येतात. त्याबाबत महानगरपालिकेने टीडीआर संदर्भातील प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविला आहे. तो प्रस्ताव तातडीने राज्य शासन मंजूर करणार आहे काय ? शेवटचा प्रश्न असा आहे की, नाशिक शहराचे पालकमंत्री आपण आहात. नाशिक मध्ये येणाऱ्या भाविकांसाठी वाहनतळे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत, त्या वाहनतळापासून कुंभमेळा 5 ते 8 किलोमीटर अंतरावर आहे. त्या भाविकांना आणण्याकरिता प्रशासनाकडून वाहतुकीची व्यवस्था करण्यात येणार आहे काय ? त्यांची होणारी पायपीट दूर करण्यात येणार आहे काय ? त्याचप्रमाणे या ठिकाणी स्वच्छतेचा प्रश्न

....2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयवंतराव जाधव...

अतिशय महत्वाचा आहे. यासाठी महानगरपालिकेला शासनाकडून विशेष अनुदान तातडीने उलपब्ध करुन देण्यात येणार आहे काय ?

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रदूषणाबाबत प्रश्न विचारला आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, गोदावरी नदी 100 टक्के प्रदूषित आहे असे म्हणणे योग्य होणार नाही. आपल्यापेक्षा जास्त लक्ष उच्च न्यायालयाचे त्या ठिकाणी आहे. यासंदर्भात दोन रिट याचिका न्यायालयात दाखल झाल्या आहेत. याबाबत शासनाला दररोज कोर्टात म्हणणे मांडावे लागत आहे. यासंदर्भातील सर्व रिपोर्ट न्यायालयात सादर करण्यात येतात. सन्माननीय सदस्य त्या ठिकाणी परवा आले असते तर त्यांना याबाबी दिसून आल्या असत्या. आता तेथे पाऊस पडत नाही, नदीमध्ये पाणी नाही, नैसर्गिक पाऊस येत नसल्यामुळे धरणातून पाणी सोडण्यात येत आहे. 14 जुलै रोजी ध्वजारोहण करण्यात आले त्यावेळी तेथे खूप मोठी गर्दी होती. त्या दिवशी धरणातून नदीमध्ये पाणी सोडण्यात आले होते. तेथे चांगले पाणी वाहत होते. तेथे अशुध्द पाणी होते असे मला वाटत नाही. यासंदर्भातील सर्व नियोजन शासनाकडून करण्यात आले आहे. आता असे वाटले होते की, तेथे पाऊस पडेल व नदीला पूर येईल. परंतु पावसाळा लांबल्यामुळे नदीमध्ये पाणी नाही म्हणून गंगापूर धरणातून पाणी सोडण्यात आले आहे. पुढील काळात पाऊस कमी पडला तर पाणी सोडता यावे म्हणून गंगापूर धरणात 2.25 टीएमसी पाणी राखून ठेवण्यात आले आहे. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे. खूप प्रदूषण आहे व ते पाणी आंघोळ करण्यासारखे नाही अशी परिस्थिती नाही. त्या ठिकाणी एसटीपी सुरु करण्यसाठी मी स्वत: दोन तीन वेळा प्लॅन्टची पाहणी केली आहे. एका एसटीपीचे काम पूर्ण झाले असून दोन एसटीपीची कामे सुरु आहेत. नदीचे प्रदूषण हा आताच उद्‌भवलेला प्रश्न नाही. गेल्या एक वर्षापासून निर्माण झालेला प्रश्न आहे. शहरातील पाणी नदीत येऊन तेथे प्रदूषण वाढत आहे. मी तेथील पालकमंत्री आहे, त्या ठिकाणी एक वर्षाच्या कालावधीत कायमस्वस्पी व्यवस्था करण्यात येत आहे. त्यानंतर गावातील किंवा शहरातील कोणतेही प्रदूषित पाणी नदीत येणार नाही अशी व्यवस्था करण्यात येणार आहे. आज 100 टक्के पाणी येत नाही असे मी सांगणार नाही. प्रदूषणाबाबत वर्षभरात संपूर्ण व्यवस्था करण्यात येणार आहे. तेथील सर्व एसटीपी सुरु करावयाचे आहेत. गोदावरी नदीला व नाशिक शहराला प्रदूषण मुक्त करावयाचे आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन....

महोदय, त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी वाहनतळाचा विषय उपस्थित केला होता. वाहनतळ हे शहरापासून लांब आहे ही बाब खरी आहे, नाशिक शहरात येणारे लोक आता कोट्यवधीच्या संख्येने येत आहेत. आता सर्व लोक रेल्वे आणि वाहनाने येत आहेत, देशभरातून जास्त लोक वाहनाने येणार आहेत. त्यांच्या वाहनांची पार्किंग व्यवस्था नाशिक जवळ केली तर नाशिक शहरात मोठ्या प्रमाणात वाहतुकीची समस्या निर्माण होईल. नाशिक शहराच्या आजुबाजूला शेकडो एकर जागा वाहनतळासाठी घेण्यात आली आहे. त्या ठिकाणच्या जमिनी काळ्या असल्यामुळे तेथे मुरुम टाकण्यात आला आहे. पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे मरुम टाकून रोलिंग करण्यात आले आहे. रेल्वे स्टेशन व वाहनतळापासून त्या लोकांना गावात आणण्यासाठी 3000 एसटी बसची व्यवस्था करण्यात आली आहे. काही खाजगी बस मालकांनी व काही कंपनीच्या मालकांनी आम्हाला सांगितले आहे की, आम्ही दोन दिवस कंपनी बंद ठेऊन पर्वनीच्या वेळी बस देऊ. अशा प्रकारे अत्यंत चांगल्या प्रकारची व्यवस्था त्या ठिकाणी करण्यात आलेली आहे.

तिसरा प्रश्न टीडीआर संदर्भात विचारण्यात आला होता. साधुग्रामसाठी शेतकऱ्यांची जवळपास 325 एकर जागा घेण्यात आलेली आहे. त्या लोकांचे असे म्हणणे आहे की, आम्हाला जागेचा मोबदला मिळाला पाहिजे. यासंदर्भात नगर विकास विभाग विचार करीत आहे. त्यांना टीडीआर किंवा काही रक्कम देता येईल काय याबाबत संबंधितांशी दोन वेळा चर्चा करण्यात आली आहे. मुख्यमंत्री महोदयांना ते लोक भेटले आहेत. या संदर्भातील निर्णय लवकर घेण्यात येईल.

**उप सभापती** : या लक्षवेधी सूचनेवर जवळपास 40 मिनिटे चर्चा झाली आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, या विषयावर चर्चा करताना वेळ भरपूर झालेला आहे हे मी मान्य करतो. परंतु मला पालकमंत्री महोदयांना एक विनंती करावयाची आहे की, नदीच्या प्रदूषणाबाबत खूप काळजी घेऊन आपण काही योजना सांगितल्या आहेत. 3000 एस.टी.बसेस आहेत. त्या बसेस सीएनजीवर चालणाऱ्या असाव्यात अशी आमची मागणी आहे. पाण्याच्या प्रदूषणाचा प्रश्न जेवढा महत्वाचा आहे, तेवढाच हवा प्रदूषणाचा प्रश्न महत्वाचा आहे. त्यामुळे हवेच्या प्रदूषणाबाबत काय उपाययोजना करण्यात येणार आहे, त्याचा अंतर्भाव या योजनांमध्ये करण्यात येईल काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन : सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा विचार करण्यात येईल.

--------



**पृ.शी.:** विविध मार्केटिंग कंपन्याकडून शेतकऱ्यांची होत असलेली लूट

**मु.शी.:** विविध मार्केटिंग कंपन्यांकडून शेतकऱ्यांची होत असलेली लूट या संबंधी श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

***"राज्यात विशेषत: विदर्भात मोठ्या प्रमाणात मार्केटिंग कंपन्या असणे, उदा. नागपूरातील पर्णनेत्र मार्केटिंग कंपनी, नोबल एक्सप्लोकेम लिमिटेड, बायोनिक्स कंपनी व जळगांव येथील दिशा ग्रीन हाऊसिंग कंपनी इत्यादी, सदर मार्केटिंग कंपन्याकडून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक केली जात असल्याचे उघड होणे, या मार्केटिंग कंपन्या शेतकऱ्यांची शेती गहाण ठेवून त्यांना कर्ज घ्यायला लावणे, सदर कंपन्यामार्फत शेतकऱ्यांना पॉलीहाऊस शेडनेट, तर औषधी वनस्पती व्यवसाय करण्यास बांध्य करुन शेतकऱ्यांना कर्जात टाकणे, सदर कंपनी संबंधित कृषी अधिकारी व बँकाशी संधान साधून शेतकऱ्यांची फसवणूक करीत असल्याचा प्रकार उघडकीस आल्याने शेतकऱ्यांनी त्याबाबत तक्रारी सादर करणे, परंतु संबंधित कंपन्यावर कोणतीही कार्यवाही न होणे, त्यामुळे शेतकऱ्यांचे यात मोठ्या प्रमाणात होत असलेले नुकसान, विदर्भातील शेतकरी अतिवृष्टी, दुष्काळ, नापिकीच्या चक्रव्युहात सापडला असतांना सदर मार्केटिंग कंपन्या शेतकऱ्यांना लालूच दाखवून करीत असलेली लुट, त्यामुळे शेतकऱ्यांवर येत असलेली आत्महत्येची पाळी, शासनाने संबंधित बोगस कंपन्यावर कारवाई करुन शेतकऱ्यांना कर्जातून मुक्त करण्याची आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने यावर करावयाची कारवाई व उपाययोजना."***

17-07-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) D-5

VVK/ AKN/ KTG/ प्रथम श्री.बोरले.... 10:30

प्रा.राम शिंदे ( कृषी राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, हा प्रश्न शेतकऱ्यांचा आहे, नागपूर येथील पर्णनेत्र मार्केटिंग कंपनी, नोबल एक्सप्लोकेम लिमिटेड, बायोनिक्स कंपनी व जळगांव येथील दिशा ग्रीन हाऊसिंग कंपनी या चार कंपन्यानी राष्ट्रीय वनौषधी अभियान कार्यक्रमाअंतर्गत शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. असा हा महत्वाचा प्रश्न आहे. मंत्री महोदयांनी लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात ही बाब मान्य केली आहे. मे.नोबल एक्सप्लोकेम लिमिटेड कंपनी, मे.पर्णनेत्र मार्केटिंग कंपनी, नागपूर यांनी भारतीय स्टेट बँक, सावनेर व कर्नाटक बँक यांनी एकत्रितपणे फसवणूक केल्याची तक्रार केली होती. राष्ट्रीय औषधी वनस्पती अभियानाअंतर्गत शेतकऱ्यांना हरितगृह व शेडनेट उभारण्याचे काम पूर्ण करावयाचे होते. हे काम झाले किंवा नाही, हे काम योग्य आहे किंवा नाही. कंपनी बरोबर काम करते किंवा नाही यांच्या मार्गदर्शक सूचना नुसार उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी व मंडळ कृषी अधिकारी यांच्या त्रिस्तरीय समितीकडून मोका तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर लाभार्थ्यांच्या खात्यावर थेट अनुदान जमा होते. अशा प्रकारे लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे.

सभापती महोदय, प्रत्यक्षात असे आहे की, नोबल एक्सप्लोकेम लिमिटेड ही कंपनी 2007 पासून बंद आहे, असे असल्यामुळे या कंपनीमार्फत शेतकऱ्यांना हरितगृह व शेडनेट देण्याकरिता कृषी अधिकाऱ्यांनी कशी काय परवानगी दिली आहे. दुसरा प्रश्न अतिशय गंभीर आहे, मे.दिशा ग्रीन हाऊस यांनी सांगितले की, शेतकऱ्यांनीच आमची फसवणूक केली आहे.

या नंतर श्री.भोगले....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस...

शेतकरी योग्य व्यक्ती होऊ शकत नाही असे म्हणणे म्हणजे शेतकऱ्यांवर अन्याय आहे. शेतकरी हा गरीब व प्रामाणिक असतो. कंपनीने त्या शेतकऱ्यांची फसवणूक करुनही शेतकऱ्यांवर आरोप केले आहेत. कृषी अधिकाऱ्यांनी सांगितले की, या घटनेशी आमचा संबंध नाही. हे अभियान कृषी विभागाचे आहे. या चारही कंपन्यांबाबत चौकशी करुन त्यांच्याविरुध्द शासन योग्य ती कारवाई करणार आहे काय? ज्या कृषी अधिकाऱ्यांनी या घटनेकडे दुर्लक्ष केले, बँकेकडे शेतकऱ्यांचा 7/12 उतारा जमा केला, त्या 7/12 उताऱ्यावर कर्जाची नोंद केली, त्याबाबत शासन योग्य ती कारवाई करुन शेतकऱ्यांना न्याय देणार आहे काय?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित केला आहे. नागपूर विभागामध्ये या चार कंपन्यांच्या माध्यमातून पॉलीहाऊस व शेडनेटचे काम करण्याच्या संदर्भात शेतक-यांनी त्यांच्याशी संपर्क साधला होता. पर्णनेत्र मार्केटिंग, नोबल एक्सप्लोकेम, बायोनिक्स व दिशा ग्रीन हाऊसिंग नावाच्या कंपन्यांनी यामध्ये सहभाग घेतला होता. श्री.संजय सिन्हा व श्री.जपुलकर या दोन कुटुंबीयांनी या संदर्भात तक्रार केल्याचे 2014 मध्ये आढळून आले. त्या अनुषंगाने कृषी विभागाने प्राथमिक चौकशी केली. त्यामध्ये असे आढळून आले की, शासनाचे जे धोरण होते त्या धोरणानुसार केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय औषधी वनस्पती अभियानांतर्गत हा कार्यक्रम राबविला जातो. त्या अनुषंगाने शेडनेट व पॉलीहाऊस बांधून देणाऱ्या कंपन्यांनी ते बांधून द्यायचे असते. त्यात कृषी विभागाचा संबंध येत नाही. अनुदान वितरित करण्याचा किंवा तांत्रिक शेडनेट व पॉलीहाऊस उभारण्यासाठी कोणतीही तरतूद नाही, असे धोरण होते. धोरण असे होते की, राष्ट्रीयकृत बँकांनी क्रेडिट देण्याचे आणि निधी उपलब्ध करुन देण्याचे ठरविले तर क्रेडिट लिंग बँकएडेड सबसिडी असे आहे. त्यांनी क्रेडिट उपलब्ध करुन दिल्यानंतर सबसिडी सबसिडी अदा करण्यात येते.

या संदर्भात 2014 मध्ये तक्रार आल्यानंतर त्या तक्रारीची प्राथमिक चौकशी करण्यात आली. त्यातून असे निष्पन्न झाले की, कृषी विभागाने प्रस्ताव मंजूर केल्यानंतर त्यांनी शेडनेट उभारल्यानंतर त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केले. त्यानंतर माननीय मुख्यमंत्री व केंद्र सरकारकडे सुध्दा तक्रार करण्यात आली. त्या अनुषंगाने चौकशी केली गेली. त्यांची फसवणूक झाली असे

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे.....

प्रथमदर्शनी लक्षात येते. कोणत्याही स्वरुपाचा करार नसताना बँकेतून डायरेक्ट कंपनीने पैसे उचलले आणि त्यांची फसवणूक झाल्याचे लक्षात येते. त्या अनुषंगाने माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी प्रश्न विचारल्यानुसार त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करण्यात येतील.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, नोबल एक्सप्लोकेम कंपनी 2007 मध्ये बंद झाली. 2012 मध्ये त्यांनी काम केले आहे. कंपनी अस्तित्वात नसताना काम केले आहे ही मोठी फसवणूक आहे. याबाबत वेगळया पध्दतीने शासन कारवाई करणार आहे काय?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, मी यापूर्वी हेच सांगितले की, कंपनी आणि शेतकरी यांच्या दरम्यान करार होत असतो. तो करार झाल्यानंतर ते बँकेकडे ॲप्रोच होतात, बँक त्यासाठी क्रेडिट उपलब्ध करुन देते. बँकेने क्रेडिट उपलब्ध करुन दिले असा प्रस्ताव कृषी विभागाकडे आल्यानंतर सबसिडी अलॉट करण्याचा अधिकार कृषी विभागाकडे आहे. त्यांची कंपनी बंद झाली की नाही हे निदर्शनास आले नाही. पुन्हा एकदा या मुद्याचे त्यात ॲडिशन करण्यात येईल. कंपनी अस्तित्वात नसताना बँकेकडून फायदा घेण्यात आला असेल तर त्या अंतर्गत त्यांच्यावर गुन्हा दाखल करणे अपेक्षित आहे. तो गुन्हा दाखल करुन शेतक-यांना न्याय देण्याची भूमिका घेण्यात येईल.

--------

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** आदिवासी विकास महामंडळाच्या खरेदीमध्ये झालेली अनियमितता

**मु.शी.:** आदिवासी विकास महामंडळाच्या खरेदीमध्ये झालेली अनियमितता यासंबंधी सर्वश्री माणिकराव ठाकरे, संजय दत्त, भाई जगताप, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"राज्यातील आदिवासी विकास महामंडळात गेल्या १० महिन्यात मोठा भ्रष्टाचार झाला असल्याचे माहे जुलै, २०१५ दरम्यान निदर्शनास येणे, संचालक मंडळ अस्तित्वात असताना या मंडळाची मंजूरी न घेताच तेलपंप, वीजपंप, पाईप, बारदाना, नोकरभरती यामध्ये करोडो रुपयाची उलाढाल झालेली असणे, निकृष्ट दर्जाचे पाईप, तेलपंप आणि धान खरेदीमध्ये अनियमितता होणे, नेरीयन गोदाम जिल्हा भंडारा येथे धान साठविलेले असे दाखविण्यात आले असल्यामुळे देवरी येथे गोदाम उपलब्ध असताना १५० कि.मी. वरील भंडाऱ्यात गोदाम घेण्याचे कारण काय असा प्रश्न निर्माण झालेला असणे, तसेच बारदानासहित २ कोटीचा धान परस्पर विकण्यात येणे, अधिकाऱ्यांनी संगनमताने केलेल्या अपहारामुळे राज्यातील आदिवासी बांधवांत निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, यामुळे सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर करावयाची कठोर कारवाई व यावर शासनाची प्रतिक्रिया."***

श्री.विष्णू सवरा (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेला दिलेल्या निवेदनामध्ये शासनाने उत्तर देण्याचे टाळले आहे असे निदर्शनास येते. या खरेदीच्या संदर्भात ज्या तक्रारी आहेत त्याच्या प्रती माझ्याकडे प्राप्त झालेल्या आहेत. आदिवासी विकास महामंडळाच्या संचालकांनी 18.2.2014 रोजी ठराव मंजूर केला होता. त्या ठरावानुसार उत्पादक संस्थांकडून पाईप खरेदी करण्याचे ठरले होते. परंतु संचालक मंडळाची मान्यता न घेता संचालक मंडळाच्या निर्णयाविरुध्द जाऊन खरेदी करण्यात आली. मे.आशिष ट्रेडिंग कंपनी, मु.पो.घोडेगाव, ता.आंबेगाव ही उत्पादक कंपनी नसताना त्यांना पाईप खरेदीचे आदेश देण्यात आले. या संदर्भात मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

संचालक मंडळाची परवानगी का घेण्यात आली नाही? सचांलक मंडळाची परवानगी घेतली असेल तर संचालक मंडळाने उत्पादक कंपनीकडूनच खरेदी करण्याचा जो ठराव मंजूर केला होता त्या ठरावाची अंमलबजावणी का झाली नाही? संचालक मंडळ अस्तित्वात असताना मंजुरी न घेणे योग्य आहे काय? जी नोकर भरती करण्यात आली त्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली असून भरती प्रक्रियेत कोणताही गैरप्रकार झालेला नाही असे निवेदनात म्हटले आहे. या चौकशीचे स्वरुप काय होते, कोणत्या आधारे चौकशी करण्यात आली आणि चौकशीचे निष्कर्ष काय आहेत?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, तेल पंप, पाईप, वीज पंप यांची विहित पध्दत आहे त्यानुसार खरेदी करण्यात आली आहे. त्या खरेदीची ई-निविदा काढण्यात आली. लक्ष्यांक ठरविले आहे. महामंडळाच्या फक्त कार्यकारिणीची मान्यता घेण्यात येते. तेल पंप, वीज पंप, पाईप यांची खरेदी करण्यास मान्यता घेतल्यानंतरच खरेदी करण्यात आली आहे. त्यामुळे या खरेदीमध्ये मोठा गैरव्यवहार झाला असे नाही. ई-टेंडरिंगने खरेदी केलेली असून ही प्रोसेस सुरु आहे, अद्याप पूर्ण झालेली नाही. त्यामुळे यामध्ये गैरव्यवहार झाला असा आरोप आहे त्याला आधार नाही असे मला वाटते. मोघम तक्रार आहे. महामंडळामधील रिक्त पदे भरण्यात आली त्या संदर्भात सांगू इच्छितो की, शासनाने 584 पदे भरण्यास मंजुरी दिली होती. परंतु पेसा कायदा आणि इतर तांत्रिक बाबी लक्षात घेता फक्त 361 पदे भरण्याकरिता वृत्तपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागविले होते. एकूण 36,006 अर्ज प्राप्त झाले होते. 6 ठिकाणी परीक्षा घेण्यात आली. परीक्षेतील गुणवत्तेनुसार यादी प्रसिध्द केली.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नंतर एफ.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विष्णू सवरा...

एकूण 195 उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आलेल आहेत. त्यापैकी 172 उमेदवार कामावर रूजू झाले असून 23 उमेदवार अद्याप रूजू झालेले नाहीत. आपण मघाशी उल्लेख केल्याप्रमाणे यासंबंधी एक मोघम तक्रार आली होती. त्या तक्रारीची अपर आयुक्त, नाशिक यांनी चौकशीही केली आहे. त्यांनी आम्हाला यात कुठल्याही प्रकारचा गैरव्यवहार झालेला नाही अशा प्रकारचा अहवाल देखील दिलेला आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, खरेदी करण्यासंबंधात मंजुरी घेण्यात आली असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे. खरेदीसाठी 10 टेंडर्स आली तर त्याची देखील मंजुरी बोर्डामध्ये घ्यावी लागते. आदिवासी महामंडळामध्ये अशा प्रकारे खरेदी झाली होती काय ? राज्यातील एकूण बजेटपैकी 6 टक्के निधी हा आदिवासी विकास विभागासाठी दिला जातो. आदिवासी व दलित वस्तींसाठी सर्वात जास्त निधी बजेटमधून दिला जातो. आदिवासी विकास महामंडळाकडून वेगवेगळी खरेदी होत असते. अशा या आदिवासी महामंडळामध्ये एम.डी.म्हणून आय.ए.एस.अधिकारी आहे काय, असेल तर त्याने यासंबंधात कोणती कारवाई केली आहे, यासंबंधात त्याने त्याचे वैयक्तिक मत काय दिले आहे ? आपण 12.65 लक्ष क्विंटल धान खरेदी केले आहे असे उत्तरात नमूद केले आहे. हे धान्य कोणत्या वर्षामध्ये खरेदी केले आहे, सदर धान्य हे किती वर्षे गोदामामध्ये आहे ? 5.50 लक्ष क्विंटल धानाची भरडाई झाली आहे. या भरडाईमध्ये किती उतारा मिळाला आहे ? कारण बरीच वर्षे धान्य गोदामामध्ये असल्यामुळे उतारा कमी येण्याची शक्यता आहे. उतारा बरोबर आला असेल तर माझे काहीच म्हणणे नाही. आपणाला यात किती उतारा मिळाला आहे व त्याची भरपाई कशी दिली जाणार आहे, धानाची वाहतूक भंडारा येथून मोहाडी येथे केली आहे. त्याचा खर्च कोण देणार आहे ? सदर खर्च राज्य शासन देणार आहे काय, यासंबंधातील माहिती आपण द्यावी.

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न बरेच विचारले आहेत. त्यांच्या पहिल्या प्रश्नाला उत्तर आहे की, आमच्या महामंडळामध्ये आय.ए.एस.एम.डी.आहेत. ते कार्यरत देखील आहेत. ते सक्षम असून काम देखील करीत आहे. दिनांक 30 जून 2015 पर्यंत 44 टक्के भरडाई झालेली आहे. उतारासंबंधातील माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. आवश्यकता

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विष्णू सवरा...

असल्यास ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल. या धान्य खरेदीमध्ये कुठल्याही प्रकारची अनियमितता झालेली नाही. भंडारा येथे गोदाम घेतले आहे. सध्या आमच्याकडे सहा गोदामे आहेत. पावसाळ्यापूर्वी तेथील तांदूळ हलविला नाही तर त्याचे नुकसान झाले असते. त्याचे नुकसान होऊ नये म्हणून आम्ही नवीन गोदाम भाड्याने घेतलेले आहे. गोदामामधील अंतर हे जास्त आहे हे खरे आहे. तेथे गोदाम उपलब्ध नव्हते म्हणून दुसरे गोदाम आम्हाला भाड्याने घ्यावे लागले आहे. तेथे 12000 क्विंटल धान आम्ही साठवून ठेवलेले आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मी माननीय मंत्र्यांना दोन प्रश्न विचारले होते. त्याची उत्तरे मला आलेली नाहीत. त्या प्रश्नांची माहिती त्यांच्याकडे आता नसेल तर ती त्यांनी मला नंतर दिली तरी चालेल. तेच दोन प्रश्न मी त्यांना पुन्हा विचारीत आहे. संचालक मंडळाने उत्पादन न करणाऱ्या संस्था किंवा कंपनीकडून पाईप खरेदी करू नये अशा प्रकारचा ठराव केला असताना देखील मी ज्या कंपनीचा उल्लेख केला आहे त्याच कंपनीकडून पाईप खरेदी करण्यात आले आहेत. तेव्हा संचालक मंडळाच्या निर्णयाविरुद्ध जो निर्णय घेण्यात आला आहे त्यासंबंधातील माहिती आपल्याकडे आता असेल तर ती मला द्यावी. मी नोकर भरतीसंबंधात दोन प्रश्न विचारले होते. आपण सांगितले की, निनावी तक्रार प्राप्त झाली होती. मी आपल्याला तक्रारीचे स्वरूप विचारले होते. त्या तक्रारीच्या आधारावर आपण चौकशी देखील केली आहे. त्या चौकशीचे निष्कर्ष काय आहेत याची देखील मला माहिती पाहिजे आहे. ती माहिती आता आपल्याकडे नसेल तर ती नंतर दिली तरी चालेल. या दोन प्रश्नांसंबंधी मला आपल्याकडून उत्तर अपेक्षित होते. पावसामुळे धानाचे नुकसान होऊ नये म्हणून लांब अंतरावर गोदाम घेतले असे आपण सांगितले आहे. देवरी येथे गोदाम असताना तेथे आपण धान्य साठा केला नाही. तेव्हा इतर गोदामे देखील उपलब्ध होती किंवा कशी यासंबंधातील देखील आपण माहिती घ्यावी. अशा गोदामांमध्ये आपण धान्य साठा का केला नाही ? 150 कि.मी.वाहतुकीचा खर्च आपण कसा काय केला आहे ? यासंबंधातील माहिती मला आपणाकडून अपेक्षित आहे.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी गोदामासंबंधातील माहिती विचारली आहे. मी मघाशी सांगितले की, आम्ही 6 गोदामे घेतली आहेत. दुसरे गोदाम उपलब्ध नव्हते म्हणून आम्ही ते गोदाम घेतले आहे. पावसाळा जवळ आला होता. आम्ही उशीर केला असता तर ते धान्य कदाचित भिजले असते. त्याचे नुकसान झाले असते. त्याचे नुकसान होऊ नये म्हणून आम्ही तो निर्णय घेतलेला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी मघाशी उतारा संबंधातील प्रश्न विचारला होता. त्यासंबंधी मी सांगू इच्छितो की, 67 टक्के उतारा मिळालेला आहे. मी मघाशी चौकशी संबंधात देखील सांगितले आहे. अपर आयुक्तांच्या मार्फत आम्ही या तक्रारींची दखल घेण्यात आली आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मला जी अपेक्षित माहिती पाहिजे आहे ती मी मागत आहे. ती त्यांनी दिलेली नाही. जी निनावी तक्रार करण्यात आली आहे त्या तक्रारीचे स्वरूप काय आहे व त्यावर आपण कोणती कारवाई केली आहे ? आपण जी चौकशी केली आहे त्या चौकशीचा निष्कर्ष काय आहे, त्याचे निरसन कसे करण्यात आले आहे ? संचालक मंडळाने उत्पादक कंपनी नसेल तर त्याला अशा प्रकारचे काम देऊ असा निर्णय घेतला असताना आपण काम का दिले याचा तपास करून त्याची माहिती मला द्यावी.

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, ठीक आहे. याची तपासणी करून घेतो. संचालक मंडळामध्ये स्पेसिफिक अमुक ठिकाणाहून घ्यावे, जे प्रोडक्शन करीत आहे त्यांच्याकडून घ्यावे असे म्हटले असेल तर ते तपासून घेतो व आपल्याला अवगत करतो. त्याची तपासणी काय झाली, कशा पद्धतीने केली, त्यांनी कोणकोणते निकष लावले, कोणकोणत्या मुद्यांवर तपासणी केली या सर्व बाबतीत आपल्याला अवगत करण्यात येईल. ..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी सदर भरती केव्हा झाली असा प्रश्न विचारला आहे, तपासणी केल्यानंतर संबंधितांना आपण केव्हा घेतले आहे ? आदिवासी विकास आणि सामाजिक न्याय या विभागांमध्ये विशेष निधी असतो. या दोन्ही विभागांच्या अंतर्गत अनेक महामंडळे येतात. यात अनेक अनियमितता असतात. येथे आम्ही अनेक वेळा चर्चा देखील केलेली आहे. तेव्हा मागच्या अनेक वर्षांचे अहवाल मागवून चौकशी करून कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, दिनांक 31.3.2013 रोजी रिक्त असलेली 584 पदे भरण्यासाठी शासनाने आम्हाला मान्यता दिली. त्यापैकी 361 पदे भरण्यासाठी आम्ही वर्तमानपत्रात जाहिरात दिली आणि प्रक्रिया केली. त्याप्रमाणे ती पदे भरलेली आहेत. त्याचा उल्लेख मी मघाशीच केलेला आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : शासनाने महिलांना नाईट डयुटी करण्याची परवानगी दिल्यामुळे महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने निकोप वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता असणे

**मु.शी.** : शासनाने महिलांना नाईट डयुटी करण्याची परवानगी दिल्यामुळे महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने निकोप वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता असणे यासंबंधी डॉ नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय ....... मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"***राज्यातील महिलांचे प्रमाण सरासरी ५० टक्के असणे, शासकीय निमशासकीय तसेच खाजगी संस्थांमध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने वेतन देण्यात येणे, तरीही महिलांना व्यवसायांमध्ये रात्रीची ड्युटी (नाईट ड्युटी) देण्यात येत नसल्यामुळे अनेक महिला संघटनांनी पुरुषांप्रमाणे महिलांनाही नाईट ड्यूटी देण्याची शासनाकडे केलेली मागणी, राज्य शासनाने मे, २०१५ मध्ये राज्यातील महिलांना नाईट ड्यूटी करण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेणे, सदर निर्णयामुळे महिलांच्या रोजगारात वाढ होणे, सदर निर्णयामुळे महिलांना काम करण्याची समान संधी मिळणार असली तरी महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने निकोप वातावरण राज्यात निर्माण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.***"

श्री. विजय देशमुख ( कामगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, महिलांना सायंकाळी 7 ते पहाटे 5 वाजेपर्यंत काम करण्यास कायद्यान्वये प्रतिबंध होता त्या कायद्यामध्ये शासनाने काही बदल केलेले आहेत. माझा प्रश्न असा आहे की, आतापर्यंत कॉर्पोरेट ऑफिसेस, टेलिफोन, हॉस्पिटल्स,आयटी या ठिकाणी महिला काम करीत होत्या. आम्हालाही वाटते की, स्त्रियांना पुरुषांप्रमाणे समान संधी असल्यामुळे वेळ पडली तर त्यांनी सुध्दा रात्रपाळीमध्ये काम केले पाहिजे. परंतु महिला रात्रपाळीचे काम करीत असताना त्यांना सुरक्षितपणे काम करता यावे यादृष्टिकोनातून शासनाने कोणती पावले उचलली आहेत यासंदर्भात मी ही लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. हा विषय कामगार विभागापुरता मर्यादित नाही. रात्रपाळीमध्ये महिला काम करीत असताना महिलांसाठी वाहतुकीची वेगळी व्यवस्था करणे, तसेच त्यांच्यासाठी स्वच्छतागृहे उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. महिलांसाठी स्वतंत्र वाहतुकीची व्यवस्था करणे अशक्य असल्यामुळे त्यासंदर्भातील वेगळा भत्ता देणे आवश्यक आहे. या महिलांना आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात शासनाने काही मार्गदर्शक तत्वे केलेली आहेत काय ? पुण्यातील आयटी सेक्टरमध्ये महिलांसाठी वाहने उपलब्ध करुन दिली असताना व या वाहनातून रात्रपाळी महिलांची ने-आण करीत असतानाच ड्रायव्हर्सने बलात्कार केल्याच्या 6 घटना गेल्या 4 वर्षात घडलेल्या आहेत. हा विषय सुप्रीम कोर्टापर्यंतही गेलेला आहे. अनेक कंपन्या महिलांसाठी चांगली सेवा उपलब्ध करुन देत असतात. परंतु आऊट सोर्सींग मधील कंपन्यांमध्ये महिलांच्या सुरक्षिततेच्या संदर्भातील कोणताही दर्जा राखला जात नाही. त्यामुळे रात्रपाळी महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या संदर्भात शासनाने कोणत्या उपाययोजना योजलेल्या आहेत ? शासनाच्या सेवेत ज्या महिला रात्रपाळीचे काम करतात मग त्या महिला पोलीस असतील, आरोग्य सेवेमध्ये काम करणाऱ्या महिला असतील त्या जेव्हा नाईट शिफ्ट करतील तेव्हा त्यांना शासन कोणते संरक्षण देणार आहे ?

श्री. विजय देशमुख : सभापती महोदय, देशातील प्रत्येक नागरिकास समान संधी देण्याची हमी कायद्याने दिली असून अगोदर महिला कर्मचाऱ्यांना रात्रपाळीमध्ये काम करण्यास प्रतिबंध असल्यामुळे महिलांच्या अधिकारांचा संकोच होऊ शकतो त्यामुळे अनेक महिलांनी रात्रपाळीचे काम पुरुषांबरोबर करण्याची संधी मिळावी अशी मागणी केली होती. या विषयाच्या संदर्भात मद्रास उच्च

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय देशमुख ....
न्यायालयाने महिलांना रात्रपाळीचे काम करण्याची संधी मिळवून दिली आहे. महिलांना रात्रपाळीची संधी उपलब्ध करुन देत असताना मद्रास उच्च न्यायालयाने त्यासंदर्भात काही मार्गदर्शन सुध्दा केलेले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेमध्ये त्यांनी चांगल्या सूचना केलेल्या आहेत. त्यांच्या सर्व सूचनांची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने 20 मे,2015 रोजीच्या मंत्री मंडळाच्या बैठकीत रात्रपाळीमध्ये काम करणाऱ्या महिलांच्या कायद्याला संमती दिली असून या कायद्याला लवकरच सुधारणा येणार आहे. हा कायदा जेव्हा चर्चेला जाईल तेव्हा त्यावर सविस्तर चर्चा होईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, रात्रपाळी काम करणाऱ्या महिलांना सुरक्षितता उपलब्ध करुन दिली पाहिजे. परंतु रात्रपाळी काम करणाऱ्या महिलांच्या संदर्भात मद्राच उच्च न्यायालयाने जे निर्देश दिलेले आहेत त्या निर्देशाचे शासन पालन करणार आहे. रात्रपाळीमध्ये काम करणाऱ्या महिलांना पूर्ण संरक्षण मिळण्यासाठी नवीन कायद्यात फौजदारी खटला विलंब न लावता योग्य ती कारवाई केली जाणार आहे. महिलांना त्यांच्या इच्छेप्रमाणे रात्रपाळी सेवा करता येणार आहे. कारखान्यातील 1/3 महिला रात्रपाळी काम करण्यास तयार असतील तरच त्या कारखान्याला महिलांची रात्रपाळीची सेवा मिळणार आहे. महिलांकडून रात्रपाळीचे काम करुन घ्यावयाचे असेल तर प्रथम 1/3 महिलांची संमती घेणे आवश्यक आहे अशी स्पष्ट तरतूद करण्यात आलेली आहे. रात्रपाळीमध्ये काम करणाऱ्या महिलांच्या संदर्भात मद्रास उच्च न्यायालयाने अनेक नियम व अटी दिलेल्या असून यासंदर्भातील सर्व माहिती सन्माननीय सदस्यांना मी उपलब्ध करुन देऊ शकतो. रात्रपाळीमध्ये काम करणाऱ्या महिलांच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांना काही सूचना करावयाच्या असतील तर त्या सूचना ज्यावेळी बिल मांडले जाईल त्यावेळी विचारार्थ घेण्यात येतील.

श्रीमती हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, कार्पोरेट कंपन्यांमध्ये रात्रपाळीमध्ये काम करणाऱ्या महिलांच्यासंदर्भात असे प्रकार होत असतात. परंतु यापेक्षा हॉस्पिटलमध्ये रात्रपाळीमध्ये काम करणाऱ्या नर्सेस आणि महिला डॉक्टर्सवर मोठया प्रमाणात विनयभंगाचे किंवा लैंगिक

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अत्याचाराचे प्रकार घडत असतात. त्यामुळे अशा ठिकाणी काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांच्या संदर्भात कोणत्या उपाययोजना केल्या जाणार आहेत ? ...4..



श्री. विजय देशमुख : सभापती महोदय, अशा ठिकाणी काम करणाऱ्या महिलांच्या संदर्भात विनयभंगाचे किंवा लैंगिक अत्याचाराच्या घटना घडल्या तर त्यासंदर्भात संबंधित महिला फौजदारी केसेस दाखल करु शकतात. या फौजदारी खटल्यात विनाविलंब कारवाई केली जाणार आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, रात्रपाळीमध्ये काम करणाऱ्या महिलांचा विनयभंग झाल्यानंतर कारवाई केली जाणार आहे. परंतु विनयभंग होऊच नये यासाठी सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून शासन वेगळी व्यवस्था करणार आहे काय ?

श्री. विजय देशमुख : सभापती महोदय, रात्रपाळीमध्ये काम करणाऱ्या महिलांचा विनयभंग होऊ नये यासाठी वेगळी व्यवस्था केली जाणार आहे. रात्रपाळीचे काम चालणाऱ्या आयटी कंपन्या किंवा हॉस्पिटल्समध्ये सीसी कॅमेरे बसविण्यात आलेले असून त्या ठिकाणी सुरक्षा गार्डची सुध्दा व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्या ठिकाणी महिलांसाठी वेगळी चेंजींग रुमची व्यवस्था करण्यात आली आहे तसेच टॉयलेटची सुध्दा वेगळी व्यवस्था करण्यात आलेली आहे. या सर्व गोष्टीमुळे रात्रपाळीमध्ये काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षिततेची काळजी घेण्यात आलेली आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : ज्या ठिकाणी महिला रात्रपाळीचे काम करतात त्याच्या सुरक्षिततेची काळजी त्या कारखान्यांनीच करणे आवश्यक असून त्यासंदर्भात शासनाने अशा कारखान्यांना आदेश देण्याची आवश्यकता आहे.

श्री. विजय देशमुख : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात ज्या सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांचा योग्य तो विचार करुन त्या प्रमाणे संबंधितांना निर्देश देण्यात येतील.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात सन्माननीय महिला सदस्यांनी जे प्रश्न विचारले त्यासंदर्भात महिला सदस्यांची एक बैठक कामगार मंत्री महोदयांबरोबर आयोजित केली जाणार आहे काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विजय देशमुख : या प्रश्नाच्या संदर्भात ज्या ज्या महिला सन्माननीय सदस्यांनी सूचना मांडलेल्या आहेत किंवा मांडावयाच्या आहेत त्या बाबत कामगार मंत्र्यांसमवेत सन्माननीय महिला सदस्यांची लवकरच बैठक आयोजित करण्यात येईल.

----

...5...



**लक्षवेधी सूचना क्रमांक 6 च्या संदर्भात**

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, कालच्या कामकाज पत्रिकेत माझी लक्षवेधी सूचना तिसऱ्या क्रमांकावर दाखविण्यात आली होती व त्या लक्षवेधी सूचनेला माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार होते. परंतु आजच्या कामकाज पत्रिकेत माझी लक्षवेधी सूचना सहाव्या क्रमांकावर दाखविण्यात आली असून त्या लक्षवेधी सूचनेला उद्योग मंत्री उत्तर देणार आहेत अशी माहिती देण्यात आलेली आहे.

**उप सभापती** : हा विषय आपण कशाला काढता ? मला वाटले तुम्ही लक्षवेधी सूचनेवर बोलत आहात.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेत दाखविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक सहाच्या संदर्भात माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, माझ्या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भातील उत्तर मला आतापर्यंत मिळालेले नाही. दुसरा मुद्दा असा आहे की, मी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेचा विषय हा कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील पिण्याच्या पाण्याच्या टंचाईचा असून हा विषय मी गेल्या दोन वर्षापासून सतत मांडत आलो आहे. या विषयाच्या संदर्भात माननीय उप सभापती महोदयांनी तीन वेळा बैठकी बोलावली होती.

**उप सभापती** : या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय सभापती महोदयांकडे विनंती पाठवली होती व त्यांची विनंती माननीय सभापती महोदयांनी मान्य केली आहे त्यामुळे त्यावर चर्चा करण्याची काय गरज आहे ? आता जो प्रश्न सुरु आहे तो पूर्ण होऊ द्यावा.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला माननीय जलसंपदा मंत्र्यांनी उत्तर दिले पाहिजे किंवा माननीय मुख्यमंत्र्यांच्या वतीने ते दिले जावे अशी माझी विनंती आहे.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला माननीय उद्योग मंत्र्यांनीच उत्तर दिले पाहिजे. या लक्षवेधी सूचनेशी नगरविकास

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

विभागाचा तसेच जलसंपदा विभागाचाही संबंध येत नाही. याचे कारण असे आहे की, कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेला जे पाणी दिले जाते ते एमआयडीसीच्या बारवी धरणातून दिले जाते. या ठिकाणी प्रश्न पाणी पुरवठयाचा नसून धरणाची उंची वाढवण्याच्या संदर्भातील आहे. हा विषय जलसंपदा विभागाच्या अखत्यारीत येत नाही. हे धरण उद्योग विभागाच्या अखत्यारीत असल्यामुळे हा प्रश्न उद्योग विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे. ...6...



श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माझ्या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात माननीय महसूल मंत्री श्री. एकनाथराव खडसे हे टेक्नीकल मुद्दा उपस्थित करीत आहेत. मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, हा प्रश्न ....

**उप सभापती :** यासंदर्भात मी जो निर्णय देईल त्याप्रमाणे कामकाज होणार आहे. पहिली बाब अशी आहे की, या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी नोट पाठवली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या मताशी माननीय सभापती महोदय सहमत असल्यामुळे तुमची लक्षवेधी सूचना एक दोन दिवसात किंवा या अधिवेशनामध्ये घेतली जाणार असून त्यावेळी आपल्याला जे काही ऑर्ग्यूमेंट करावयाचे असतील ते त्यावेळी करावेत आता त्यावर कृपया चर्चा करु नये.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी जे काही सांगितले आहे त्यासंदर्भात मला खुलासा करणे गरजेचे आहे.

**उप सभापती** : कृपया आता यावर आपण ऑर्ग्यूमेंट करु नये.

यानंतर श्री. अजित......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सभागृहात राज्य मंत्रिमंडळातील कोणत्याही विभागाचे मंत्री उत्तर देऊ शकतात. मंत्री महोदय शासन म्हणून उत्तर देत असतात. या ठिकाणी आवश्यक आहे त्या विभागाचे मंत्री उत्तर देतील... (अडथळा)...

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी कल्याण-मोहने, टिटवाळा व डोंबिवली या भागातील पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नासंदर्भात अतिशय महत्वाची लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. माननीय जलसंपदा मंत्री श्री.गिरीष महाजन यांनी त्या संदर्भात विधान केले होते. सन्माननीय सदस्यांना अपेक्षित होते की, त्या विधानाला धरुन काही तरी प्रोग्रेस व्हावा...

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या विषयाच्या संदर्भात एक बैठक बोलाविण्यात आली होती आणि त्या बैठकीस मी देखील उपस्थित होतो.

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना जलसंपदा मंत्री महोदयांकडून उत्तर पाहिजे असेल तर ते देखील उत्तर देतील. तसेच उद्योग विभागाचा मंत्री म्हणून मी देखील उत्तर देण्यास तयार आहे. तेव्हा माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी लक्षवेधी सूचनेवर प्रश्न विचारावेत.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात निर्देश दिले की, याच अधिवेशनात ही लक्षवेधी सूचना घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी अपेक्षा व्यक्त केली की, या लक्षवेधी सूचनेवरील उत्तर माननीय मुख्यमंत्र्यांनी द्यावे. त्यांचा आग्रह देखील आपण मान्य केलेला आहे...

**उप सभापती** : या लक्षवेधी सूचनेवरील उत्तर माननीय मुख्यमंत्री देतील असे मी काही म्हटलेले नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, या प्रश्न सुटला पाहिजे असा आमचा आग्रह आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आपण जे निर्देश दिले त्याचे सन्माननीय सदस्यांनी पालन करावे अशी अपेक्षा आहे. याच अधिवेशनामध्ये ही लक्षवेधी सूचना येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी ज्या भागातील पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात लक्षवेधी सूचना विचारलेली आहे त्या भागाचा माझा देखील संबंध येतो. मला या प्रश्नाची पूर्ण जाण आहे. या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांच्यासोबत माझी अनेकवेळा चर्चा झालेली आहे. सभागृहाच्या आदेशानुसार या प्रश्नाच्या संदर्भात जी बैठक बोलाविली होती त्या बैठकीस मी देखील उपस्थित होतो. हा प्रश्न दोन विभागाशी संबंधित आहे. मागे जी बैठक झाली त्या बैठकीला उद्योग विभागाच्या मंत्री महोदयांना बोलाविण्यात आले नव्हते. ती एक त्रुटी राहिली होती. त्यावेळी असे ठरले होते की, पुढच्या बैठकीला उद्योग मंत्री महोदयांना बोलावावे आणि सर्वांनी मिळून या प्रश्नावर मार्ग काढायचा. त्या बैठकीला मी उपस्थित होतो. पालकमंत्री होते, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त तसेच त्या जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी उपस्थित होते. मला एवढेच सांगावयाचे आहे की, आपणास हा प्रश्न सोडवावयाचा आहे. तेव्हा या प्रश्नाशी जे संबंधित आहेत त्यांना आपण पुन्हा बोलावू. परंतु आताच पाहिजे असे नाही. सभागृहाने हे मान्य केलेले आहे. मी या संदर्भातील माननीय सभापतींचे आदेश सन्माननीय सदस्यांना दाखवितो. माननीय सभापतींनी दिलेल्या आदेशाचे पालन न करणे मला योग्य वाटत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माननीय सभापतींनी दिलेले आदेश आम्हाला मान्य आहे. आपण या प्रश्नाच्या संदर्भात पुन्हा एकदा बैठक बोलाविण्याबाबत सूचना करीत आहात. त्या बैठकीला माननीय जलसंपदा मंत्री, माननीय उद्योग मंत्री यांचे समवेत मुख्यमंत्री महोदयांना देखील बोलवावे, अशी माझी विनंती आहे. मुख्यमंत्री महोदयांच्या सोयीनुसार ती बैठक घ्यावी. त्याच्या सोबत बैठक घेतली तरच हा प्रश्न सुटेल.

**उप सभापती** : सर्व संबंधितांशी बोलून आपण निर्णय घेऊ.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, ही बैठक केव्हा होणार आहे ?

**उप सभापती** : मला सर्व संबंधितांशी बोलावे लागेल.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, आपण दिलेल्या निर्देशांचे मी नेहमी पालन करतो. मंत्री महोदय तेथून प्रश्न विचारा अशी खूण करीत आहेत. माझी प्रश्न विचारण्याची तयारी नाही असे रेकॉर्डवर जाऊ नये. तेव्हा आपण मंत्री महोदयांना समज द्यावी.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, बैठक घेण्याचे आश्वासन द्यावे. मी त्यांना सांगत आहे की, आपण प्रश्न विचारावेत. मी आपणास बैठक घेण्याचे आश्वासन देतो. आपण बैठक घेऊ.

डॉ.नीलम गोऱ्हे : मला सभापतींनी विचारले की, आपणास प्रश्न विचारावयाचा आहे काय म्हणून मी त्यांच्या निर्देशांचे पालन करीत आहे. मंत्री महोदय काय काय खुणा करीत आहेत त्याकडे सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त पाहत आहेत. पण मी तसे काही पाहत नाही. माननीय सभापती सांगत आहेत त्याप्रमाणे मी प्रश्न विचारत आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी एक शब्दप्रयोग वापरला की,राज्यकर्ते एकमेकांना खाणाखुणा करतात. रेकॉर्डवर चुकीचे जाऊ नये म्हणून सांगतो की, राज्य खुणांवर चालत नाही. माननीय राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील हे माझ्याकडे बघून हसत आहेत, ही खूण समजायची काय ?

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन्हा सुरु होईल.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.16 ते दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती :** प्रश्नोत्तरे.

**नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी**

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आज आम्ही राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात म.वि.प. नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली आहे. आज सकाळी पुन्हा एकदा मिरा रोड येथे तीन पत्रकारांवर हल्ला झाला. त्या भागात डान्स बार सुरु होता. त्या डान्स बारचे कव्हरेज करण्यासाठी गेलेल्या संतोष मिश्रा, शशी शर्मा आणि राघवेंद्र दुबे या पत्रकारांवर हल्ला झाला आणि त्यामध्ये राघवेंद्र दुबे नावाच्या पत्रकाराचा मृत्यू झाला. महोदय, मी विचारु इच्छितो की, या राज्यात कायदा व सुव्यवस्था उरली आहे की नाही ? काल सांताक्रुझ येथे महिला पत्रकाराला काही गुंडांनी मारहाण केली. आज तीन पत्रकारांवर हल्ला होतो आणि त्यात एकाचा मृत्यू होतो. परवा परभणी येथील बोरीला येथे कर्जाचे पुनर्गठन करण्यासाठी केलेल्या आंदोलनातील शेतकऱ्यांना पोलिसांनी बदडून काढले. सोलापूर येथे एफआरपी मिळण्यासाठी शेतकरी रस्त्यावर आले तर पोलीस त्यांना बदडून काढतात. या राज्यात पोलिसांचा गुन्हेगारांवर वचक राहिला आहे की नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अधिवेशन सुरु झाल्यापासून पत्रकारांवर दुसरा हल्ला होतो आणि त्यात एक पत्रकार मृत्युमुखी पडतो, हे गंभीर आहे. त्यामुळे आजचे सभागृहापुढील बाकीचे सर्व कामकाज बाजूला ठेवून आम्ही नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करण्यास परवानगी द्यावी आणि घडलेल्या घटनेसंदर्भात शासनाकडून तत्काळ निवेदन करण्यात यावे, अशी आमची विनंती आहे.

**सभापती** : आज दिनांक 17 जुलै, 2015 रोजी सन्माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे, सुनील तटकरे, माणिकराव ठाकरे, जयंत प्र.पाटील, हेमंत टकले, संजय दत्त, भाई जगताप, दिप्ती चवधरी, शरद रणपिसे यांनी सकाळी 9.47 वाजता "राज्यात मागील काही महिन्यात कायदा व सुव्यवस्थेची गंभीर परिस्थिती निर्माण होणे, मुंबईतील सांताक्रुझ येथे एका टोळीकडून महिला

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती**....

पत्रकाराची छेड काढून तिला मारहाण करण्यात येणे, वाशिम जिल्ह्यात दंगल उसळून एका युवकाचा मृत्यू होणे, जालना येथे पोलिसांच्या निष्काळजीपणामुळे मुलीवर दुसऱ्यांदा बलात्कार होणे, पैठण येथे उघडकीस आलेली सामूहिक बलात्काराची घटना आणि मुंबईच्या साकीनाका येथे एका मॉडेलवर झालेल्या बलात्कारात पोलिसांचा सहभाग असणे, राज्यात सगळ्याच पातळीवर गुन्हेगारीची वाढ झाल्यामुळे कायदा व सुव्यवस्था ढासळून जनतेत पोलिसांबद्दल निर्माण झालेला असंतोष आणि नागरिकांच्या मनात निर्माण झालेले भीतीचे वातावरण" या विषयाच्या बाबतीत नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. सभागृहापुढील कामकाज स्थगित करण्यासंदर्भात नियम 289 आहे. नियम 289 अन्वये, कोणत्याही सदस्यास माननीय सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्याबाबत सूचना देता येईल. यावरुन असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास आणि इतर सर्व कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या क्रमात असे काम किंवा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे. परंतु आजच्या कार्यक्रमपत्रिकेवर हा विषय समाविष्ट नाही. तथापि या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता मी या विषयावर सन्माननीय सदस्यांना दोन मिनिटे बोलण्याची संधी दिली होती. आज नियम 289 अन्वये प्राप्त झालेली सदरहू सूचना मी नाकारीत आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी, नियम 289 अन्वये दिलेल्या सूचनेवर आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी नियम 289 अन्वये सूचना दिली आहे. गेल्या काही वर्षांमध्ये राज्यात कंत्राटीकरणाची पध्दत सुरु झाली आहे. परंतु नवीन सरकार आल्यानंतर आपल्या राज्याच्या प्रशासनाचा मुख्य कणा असलेले मंत्रालयच कंत्राटी पध्दतीने देण्याचा घाट दिनांक 10 जुलै, 2015 आणि 14 जुलै, 2015 रोजीच्या शासन निर्णयाद्वारे घातला आहे. त्यामुळे सदरहू विषयाकडे मला नियम 289 अन्वये सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे आणि या विषयावर सभागृहात चर्चा झाली पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन आणि नगर विकास विभागाने काढलेल्या दोन्ही जी.आर. नुसार लिपिक, टंकलेखक, शिपाई, वाहन चालक आणि अशी शेकडो पदे कंत्राटी पध्दतीने आणि आऊट सोर्सिंगच्या माध्यमातून भरण्याचे ठरविले आहे. त्या जी.आर.मध्ये असे नमूद

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील...

केले आहे की, सर्व खात्यात अशी कोणती कामे आहेत जी अशा प्रकारे करुन घेता येतील आणि हा खर्च कमी कसा करता येईल ते पहावे. अशा प्रकारचा निर्णय घेऊन कंत्राटदारांची घरे भरली जात आहेत. अगोदर सफाई कामगारांची पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात आली आहेत. परंतु ज्या ठिकाणी गोपनीय निर्णय होतात, धोरणात्मक बाबी ठरतात, त्या मंत्रालयातील कागदपत्रे कंत्राटीकरण आणि आऊट सोर्सिंगच्या माध्यमातून दुसऱ्यांच्या हाती दिल्यास या राज्याचा कणा मोडेल आणि त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे कॉर्पोरेट आणि धनदांडग्यांना मंत्रालयात शिरण्याची चोरवाट मिळेल. एवढेच नव्हे तर शासनाच्या निर्णयांत हस्तक्षेप करण्याची सुध्दा संधी मिळेल. या निमित्ताने मी सत्ताधाऱ्यांना विचारु इच्छितो की, हे शासन तुमचे आहे, कंत्राटदारांचे आहे, बिल्डरांचे आहे की, भांडवलदारांचे आहे ? आपल्याला हे शासन त्यांच्या हातात सोपवावयाचे असेल तर खुर्ची खाली करुन अदानीला सहाव्या मजल्यावर बसवा. हा गंभीर मुद्दा आहे. सार्वजनिक सेवा असेल, शिक्षण असेल, आरोग्य सेवा असेल ही कामे अगोदरच कंत्राटी पध्दतीने करण्यास सुरुवात झाली आहे. परंतु त्या पाठोपाठ आता मंत्रालयाचे कंत्राटीकरण होत आहे, ही अतिशय गंभीर बाब आहे. या विषयावर सभागृहात ताबडतोब चर्चा झाली पाहिजे. शासनाच्या या निर्णयामुळे सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष आहे. परवा व काल मंत्रालयाच्या व्हरांड्यात या निर्णयाच्या विरोधात निदर्शने झाली. शासनाच्या निर्णयामुळे राज्यभर आग लागलेली आहे. या विषयी शासनाने ताबडतोब स्पष्टीकरण दिले पाहिजे. महोदय, माझी मागणी आहे की, मी नियम 289 अन्वये दिलेल्या विषयावर सभागृहात चर्चा झाली पाहिजे.

**सभापती** : या संदर्भातील नियम आणि परंपरा या अतिशय स्पष्ट आहेत. तसेच दुसरी बाब म्हणजे की, या विषयावर....

प्रा.जनार्दन चांदूरकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी जो विषय सभागृहाच्या निदर्शनास आणून दिलेला आहे त्या विषयावर लक्षवेधी सूचना दिलेली आहे.

**सभापती** : होय. मला या बाबत कल्पना आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी नियम 289 अन्वये दिलेली सूचना मी नाकारीत आहे. सन्माननीय सदस्यांना हा विषय लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उपस्थित करण्याची लवकरात लवकर संधी देण्यात येईल. त्यावेळी आपण या विषयावर दीर्घकाळ चर्चा करावी.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, नियम 289 अन्वयेची सूचना प्रश्नोत्तराच्या तासानंतर उपस्थित करण्याची प्रथा आहे. परंतु या सूचना प्रश्नोत्तराच्या तासापूर्वीच उपस्थित करावयास लागलो तर प्रश्नोत्तराच्या तासावर अन्याय होईल. काल शेतकऱ्यांच्या गंभीर प्रश्नाच्या बाबतीत अपवाद म्हणून सर्व कामकाज बाजूला ठेवून चर्चा करण्याचा निर्णय घेतला. माझे म्हणणे एवढेच आहे की, प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांना नियम 289 अन्वयेची सूचना मांडण्यास परवानगी द्यावी.

**सभापती** : ठीक आहे. यामध्ये प्रश्नोत्तराच्या तासातील 10 मिनिटे वाया गेल्यामुळे मी प्रश्नोत्तराच्या तासासाठी 10 मिनिटे वेळ वाढवून देत आहे. 289 च्या सूचना प्रश्नोत्तराच्या तासानंतर घेण्यात येतील.

आता प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होईल.

-------

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

**राज्यातील थोर संत व समाजसेवकांचे साहित्य प्रकाशित करण्याबाबत**

**(१) * ८२६१ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, अण्णाभाऊ साठे व बिरसा मुंडा, संत रविदास, संत सुदर्शन, संत वाल्मिकी यांचे जीवन चरित्रावरील संपूर्ण साहित्य शासनाने प्रकाशित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) राज्यातील जनतेवर थोर संताच्या व समाजसेवकांच्या प्रतिमेचा व विचारांचा प्रभाव आहे त्यांच्या विचारांचे साहित्य सर्व समाजाच्या जनतेपर्यंत अभ्यासासाठी व माहितीसाठी प्रकाशित करणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, थोर समाजसेवक व संताचे जीवन चरित्रावरील साहित्य तयार करण्यास शासन विशेष समिती गठीत करणार आहे काय,

(४) असल्यास, केव्हापर्यंत समिती गठीत करण्याचे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, अण्णाभाऊ साठे यांचे जीवन चरित्रावरील निवडक साहित्य शासनाकडून प्रकाशित करण्यात आले आहे.

(२) होय.

(३) थोर समाजसेवकांचे साहित्य प्रकाशित करण्याकरिता उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून विशेष समित्या गठीत करण्यात आल्या असून, त्यानुषंगाने महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज आणि अण्णाभाऊ साठे यांचे चरित्र प्रकाशित करण्यासाठी अनुक्रमे महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, राजर्षी शाहू महाराज चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती, पुणे अशा ४ समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. या व्यतिरिक्त अन्य थोर समाजसेवक व संतांचे जीवनचरित्रावरील साहित्य तयार करण्यासाठी अद्याप विशेष समिती गठीत करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.8261....

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नावर सभागृहात चर्चा होत आहे. या महत्त्वाच्या प्रश्नावर माननीय मंत्र्यांकडून सकारात्मक उत्तर अपेक्षित आहे. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, अण्णाभाऊ साठे, स्वर्गीय बिरसा मुंडा, संत रविदास, संत सुदर्शन, संत वाल्मिकी या थोर संत व समाजसेवकांचे साहित्य प्रकाशित करण्याबाबतचा हा प्रश्न आहे. यामध्ये अहिल्याबाई होळकर यांचे नाव समाविष्ट करावयाचे राहिले आहे. ही सर्व थोर मंडळी आहे. मी गर्वाने सांगतो की, या मंडळीचे नाव खऱ्या अर्थाने भारताच्या निर्माणामध्ये अग्रक्रमाने घेतले जाते. परंतु त्यांचे साहित्य शासनाच्या माध्यमातून प्रकाशित करण्यात आलेले नाही. मी असा लेखी प्रश्न विचारला होता की, या थोर संत व समाजसेवकांच्या जीवन चरित्रावरील संपूर्ण साहित्य शासनाने प्रकाशित केले आहे, हे खरे आहे काय ? याला माननीय मंत्र्यांनी "...जीवन चरित्रावरील निवडक साहित्य शासनाकडून प्रकाशित करण्यात आले आहे." असे लेखी उत्तर दिले आहे. निवडक साहित्य जनतेपर्यंत आणि विद्यार्थ्यांपर्यंत गेले हे खरे असले तरी संपूर्ण साहित्य हे त्यांच्यापर्यंत पोहोचले पाहिजे. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, या थोर संत आणि समाजसेवकांचे संपूर्ण साहित्य लोकांपर्यंत पोहचविण्यात येईल काय ? तसेच लेखी उत्तरात नमूद केले आहे की, साहित्य प्रकाशित करण्याकरिता चार समित्या गठीत केल्या आहेत. वास्तविक पाहता इतर थोर पुरुषांचा इतिहास लिहिण्यासाठी समिती स्थापन केलेली नाही. मी विचारु इच्छितो की, आपण यासाठी समिती स्थापन करणार काय आणि त्यासाठी किती कालावधी लागेल ?

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.8261....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्त्वाचा प्रश्न चर्चेला आणला आहे आणि महत्त्वाचे म्हणजे हा प्रश्न पहिल्या क्रमांकावर आलेला आहे. शाहू-फुले-आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव सातत्याने घेऊन, त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून काम करण्याचा आपण सर्वजण प्रयत्न करीत असतो. शासन अशा महान व्यक्तिमत्वांच्या जीवन चरित्रातील काही गोष्टी सर्वसामान्यांपर्यंत पोहचाव्यात, त्यांना साहित्य उपलब्ध व्हावे यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे. 4 थोर समाजसेवकांच्या साहित्यांच्या संदर्भातील समित्या प्रत्यक्षात गठीत करण्यात आलेल्या आहेत. त्या समित्या त्यांच्या संदर्भातील कोणते साहित्य जनतेपर्यंत गेले पाहिजे हे पाहतात. शासन त्यासाठी प्रयत्न करीत आहे. पूज्यनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्याच्या 2,88,930 प्रती जनतेपर्यंत गेलेल्या आहेत, महात्मा फुले यांच्या समग्र साहित्याच्या 10,08,448 प्रती जनतेपर्यंत गेलेल्या आहेत. शाहू महाराजांच्या साहित्याच्या पुस्तकांची विक्री झालेली आहे आणि आता नववी आवृत्ती पुन्हा निघणार आहे. साहित्य लोकांपर्यंत मोठ्या प्रमाणात पोहचण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्यांनी महान व्यक्तिमत्वांची नावे सुचविली, त्यामध्ये बिरसा मुंडा, संत रोहिदास, संत सुदर्शन, संत वाल्मिकी आहेत. सन्माननीय सदस्यांनी आता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे नावही सुचविले आहे. सदर विषयाचा संबंध समजाकल्याण विभागाशी देखील येतो. सदर बाबतीतील निधी समाजकल्याण विभाग देत असतो. माझ्याकडे उच्च व तंत्र शिक्षण विभाग आहे, समिती वगैरेचा विषय आहे. महान व्यक्तिमत्वांचे साहित्य अधिक प्रमाणात लोकांपर्यंत जाणे आवश्यक आहे. मी समाजकल्याण विभागाशी चर्चा केली की, आपण अशा काही समित्या गठीत करून लोकांपर्यंत साहित्य पोहचावयाचे आहे.

सभापती महोदय, आपण साहित्य तयार केल. परंतु ते साहित्य घेण्यासाठी मरिन लाईन्स येथे असलेल्या मुद्रणालयात लोकांना यावे लागत आहे. साहित्य मोठ्या प्रमाणात बाहेर उपलब्ध झाले पाहिजे. अनेक साहित्य बाहेर उपलब्ध होण्याच्या संदर्भातील रचना सरकारमार्फत होऊ शकते, याचा विचार होत आहे. सन्माननीय सदस्यांच्या मनात कल्पना आहे त्या पध्दतीने सर्व संत, महात्म्यांच्या साहित्याच्या बाबतीतील विचार सकारात्मकपणे करीत आहोत.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.8261....

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सदर प्रश्न अतिशय महत्वाचा असून त्या अनुषंगाने मला 2 उप प्रश्न विचारावयाचे आहेत. शासनाकडून 4 थोर व्यक्तिमत्वांच्या साहित्याच्या संदर्भात 4 समित्या गठीत केलेल्या आहेत. समाजकल्याण विभाग व उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी अनेक थोर विभूतींची अनेक पुस्तके, साहित्य यापूर्वी सुध्दा प्रकाशित केलेली आहेत. ते कदाचित 4 समित्यांच्या अंतर्गत येणार नाही. परंतु आता ही पुस्तके उपलब्ध नाहीत. प्रबोधनकार ठाकरे यांचे साहित्य पूर्वी प्रकाशित झाले होते. परंतु ते आता उपलब्ध नाही. पूर्वी शासनाने पुस्तके प्रकाशित केलेली आहेत. परंतु त्यांच्या आवृत्त्या संपल्या असल्यामुळे पुस्तके उपलब्ध नाहीत. त्यामुळे ती पुस्तके उपलब्ध करून देण्यासाठी पावले उचलण्यात येतील का ?

सभापती महोदय, प्रबोधनकार ठाकरे यांचे साहित्य उपलब्ध नाही. शासन त्याच्या साहित्याच्या आवृत्त्या प्रकाशित करेल का. समिती गठीत केलेल्या आहेत. मला त्या अनुषंगाने असे सांगावयाचे आहे की, समितीचे निकष, कालावधी, उपलब्ध रिसोर्सेस काय आहेत हे समजले तर बरे होईल. कारण सन्माननीय सदस्यांना बऱ्याचशा सूचना करावयाच्या असतात. आपण सभागृहाच्या पटलावर ठेवले, उपलब्ध करून दिले तर ते काम अधिक सकसपणे व्हायला मदत होऊ शकेल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सरकार सर्व विषयांवर सकारात्मक आहे असे मी सांगितले आहे. प्रबोधनकार ठाकरे यांचे विचार सुध्दा समाजाला अत्यंत उपयुक्त राहिले आहेत. त्यामुळे त्यांच्याही साहित्याबाबत शासन नक्की सकारात्मक राहील. समितीचे निकष, काम या विषयीची माहिती केवळ पटलावर ठेवण्याऐवजी विधानमंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांपर्यंत पत्राने पोहचेल याची व्यवस्था करण्यात येईल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी उत्तरामध्ये उच्च व तंत्र शिक्षण व समाजकल्याण विभागाचा उल्लेख केला. मी सांगू इच्छितो की, आम्ही हा प्रश्न मराठी भाषा विभाग म्हणून विचारलेला आहे. साहित्याच्या किती प्रती खपल्या, साहित्य चांगल्या पध्दतीने उपलब्ध

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

होण्यासाठी काय उपाययोजना करणार आहेत हेही माननीय मंत्र्यांनी सांगितले आहे. आपल्या कौशल्यामुळे हे सर्व होत आहे. आपण पुस्तकांच्या पलीकडे जाऊन विचार केला पाहिजे.

..3



ता.प्र.क्र.8261....

श्री. हेमंत टकले ....

साहित्याच्या सीडी बनविणे गरजेचे आहे. चांगला वाचक, चांगले बोलणारे आहेत त्यांच्या आवाजात ऑडिओ कॅसेट करू शकलो आणि त्या सर्व शाळांत पाठवू शकलो तर त्याचा प्रसार अधिक चांगल्याप्रकारे होण्याची शक्यता आहे. आपल्याला मराठी भाषा विभाग म्हणून कामगिरी करायची आहे. समाजसेवकांचे कार्य भारताच्या इतर भाषांमध्येही जायला हवे. आपण साहित्यांचे भाषांतर करण्यासाठी एखादी समिती गठीत करावी आणि सर्व समाजसेवकांचे साहित्य भारतातील इतर भाषांमध्येही भाषांतर करून भारतभर पोहचविले तर बरे होईल. आपण अशी योजना करू शकाल काय ?

**सभापती** : माननीय मंत्री महोदय, मी या विषयावर माझे स्वत:चे म्हणणे मांडत आहे. माझे म्हणणे असे आहे की, सर्व थोरपुरूष हे समाजाचे धन आहेत, त्यांचे साहित्य, विचार पुढील पिढीपर्यंत जाणे अत्यावश्यक आहे. पुढील पिढी सक्रीय कशी होईल हे आपण पाहिले पाहिजे. आपण त्यांच्या दृष्टीने काय बरे आहे, काय स्वीकार्ह आहे हे पाहिले पाहिजे. आपण शाळेच्या करिक्युलममध्ये या संदर्भात एखादा तास टाकता आला तर ते योग्य होईल. आपण त्याप्रमाणे कार्यवाही करावी असे माझे निर्देश आहेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझ्याकडे मराठी भाषा विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग आहेत. सदर विषयांत मला नेहमी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांचे मार्गदर्शन लाभत असते, त्यांच्या सूचना सजेशन फॉर ॲक्शन नक्की राहतील. सभापती महोदय, मी आपलेही मन:पूर्वक अभिनंदन करतो. कारण सभागृहात आजपासून वायफाय सेवा सुरू केलेली आहे. सीडीचा उल्लेख करण्यात आला. सीडी किंवा ऑडिओ बूक या पध्दतीने नेटवर देखील साहित्य कसे उपलब्ध होईल याचा विचार करण्यात येईल. साहित्य वेगवेगळ्या भाषांमध्ये भाषांतर होऊ जाण् गरजेचे आहे. आंबेडकर फाऊंडेशन केंद्र सरकारचे आहे. पूज्यनीय डॉ. बाबासाहेब

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आंकेडकर यांच्या साहित्याविषयी त्यांनी अनुमती मागितली होती. 60 वर्षे व्हायचे आहेत. त्यामुळे त्यांचे कॉपीराईट आंबेडकर कुटुंबियांकडे आहे. कॉपीराईटचे मानधन सन 1997 पासून दिले गेले

..4



ता.प्र.क्र.8261....

श्री. विनोद तावडे ....

नव्हते. माझ्या ते लक्षात आले आणि मी ते ताबडतोब देण्याची व्यवस्था केली. (अडथळा) ते पैसे द्यायचे राहिले होते. शाहू-फुले-आंबेडकर यांच्या नावाने राज्य करीत होता. आम्ही ते पैसे दिले. त्याच्यापुढे करार नव्याने होऊन सर्व होईल. त्यामुळे इतर भाषांत भाषांतरित करण्यास गती येऊ शकते. माननीय सभापतींनी सूचना केली आहे. मला सांगावयाचे आहे की, बऱ्याचशा अभ्यासक्रमात काही महान पुरुषांचे धडे आहेत.

**सभापती** : माझे म्हणणे वेगळे आहे. आम्ही शाळेत असताना देखील थोरपुरुषांचे धडे वाचले आहेत. माझे म्हणणे हेच आहे की, आपण काही गोष्टी बंधनकारक करतो, जसे की, पीटी. त्याप्रमाणे या संदर्भात महिन्यातून एखादा तास विद्यार्थ्यांनी ऐकलायच पाहिजे, त्या तासाला उपस्थित राहिले पाहिजे अशा पध्दतीची काही सिस्टिम करता आली तर जास्त योग्य होईल. मुलांपर्यंत ते डायजेस्ट झाले पाहिजे अशी सिस्टिम करावी एवढी सूचना आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी तेच वाक्य पूर्ण करीत होतो.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.8261.......

श्री.विनोद तावडे........

शालेय अभ्यासक्रमांत या महापुरुषांवर धडे असले तरी आपण आता मूल्यवर्धित शिक्षण प्रणाली तयार करीत आहोत. त्यासाठी या सर्व संत, महात्म्यांच्या जीवनावरील साहित्याचा निश्चितपणे उपयोग करुन घेऊ. तसेच, आपण म्हणता आहात त्याप्रमाणे या गोष्टी आग्रही पध्दतीने कशा करता येतील, हे देखील बघू.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, एक अतिशय महत्वाचा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी उपस्थित केला असून या चर्चेच्या माध्यमातून आपणही सरकारला काही मौलिक सूचना केल्या आहेत.

सभापती महोदय, या प्रश्नाला स्पष्टपणे उत्तर देण्याचे मंत्री महोदय का टाळत आहेत, हे आम्हाला कळत नाही. यापूर्वी काही समित्या सरकारने गठीत केल्या आहेत. त्या व्यतिरिक्त इतर महात्म्यांचे सर्व साहित्य प्रकाशात यावे, या दृष्टीने हा प्रश्न विचारलेला आहे. समिती गठीत केल्याशिवाय या थोर पुरुषांच्या साहित्याचा अभ्यास होऊ शकणार नाही व त्यांच्या साहित्याला न्याय मिळणार नाही. त्यामुळे अन्य महापुरुषांच्या साहित्याच्या बाबतीत एखादी समिती शासन नियुक्त करणार आहे का ?

सभापती महोदय, या पुरोगामी महाराष्ट्रासाठी आपण एक अतिशय मौलिक अशी सूचना सरकारला केली आहे. परंतु, सन्माननीय शिक्षण मंत्री श्री.विनोदजी तावडे यांना शिक्षण क्षेत्राच्या संदर्भात नागपूरहून येणाऱ्या सूचनांमध्ये आपली सूचना बसेल का, हा खरा प्रश्न आहे. म्हणून मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, सामाजिक दृष्टीकोनातून आपण केलेल्या स्पष्ट सूचनेचे तंतोतंत पालन मंत्री महोदय करणार आहेत का, कोणाच्याही दबावाखाली न येता त्यास मान्यता देणार आहेत का आणि याबाबत शासनाची धोरणात्मक भूमिका काय आहे ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, नागपूरहून काय सूचना येतात, हे विदर्भात राहून सन्माननीय सदस्यांना माहीत नसेल तर ते दुर्दैवी आहे. संघाच्या शाखेतील प्रात:स्मरणात जी नावे घेतली जातात ती सर्व नावे या तारांकित प्रश्नात आलेली आहेत. उलट काही नावे राहून गेली

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.8261.......

श्री.विनोद तावडे........

आहेत. ही सर्व नावे प्रात:स्मरणात घ्यावीत, असे नागपूरचे आदेश सन 1925 पासूनचे आहेत. परंतु, ते सन्माननीय सदस्यांना माहीत नाहीत. एकदा त्यांनी माझ्याबरोबर संघ शाखेत यावे, प्रात:स्मरण म्हणावे. म्हणजे मग "अरेच्चा, हे संघ शाखेच्या प्रात:स्मरणात होते, आम्हाला माहीतच नाही", अशी प्रतिक्रिया ते देतील. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझ्याबरोबर संघ शाखेत यावे, असे आदेशच आपण त्यांना द्यावेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी अतिशय चांगली सूचना केली आहे. त्यांनी आपल्या नेत्यांच्या राजकारणाचा भाग सोडून द्यावा. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी या सर्व साहित्याचा अभ्यास झाला पाहिजे, अशी मनापासून सूचना केली आहे. मघाशी मी आग्रहाने याचा उल्लेख केला. परंतु, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी ते ऐकले नाही. हे काम सामाजिक न्याय विभाग अधिक सक्षमपणे करु शकेल. त्यामुळे त्या विभागाशी बोलून सामाजिकदृष्ट्या अशा समितीचा विचार करु.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, प्रश्न विचारण्यामागील मूळ उद्देश मंत्री महोदयांच्या लक्षात आलेला नाही. मी एकदा एका इंग्रजी शाळेमध्ये गेलो होतो. तेथील एका विद्यार्थीनीला मी असे विचारले की, "सावित्रीबाई फुले कोण आहेत ?" तेव्हा त्या विद्यार्थीनीने असे उत्तर दिले की, "मला माहीत नाही." या राज्यातील ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या शाळांमधील, इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले माहीत नाही तर त्यांना अहिल्याबाई होळकर कोठुन माहीत असणार ?

सभापती महोदय, या प्रश्नाचा रोख हा आहे की, राज्यातील सर्व विद्यार्थ्यांपर्यंत या थोर महापुरुषांचा खरा इतिहास गेला पाहिजे. यासाठी शासनाने या सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांची एक समिती गठीत करावी, त्याचे नियम आणि निकष मंत्री महोदय ठरवतील आणि त्यानंतर या प्रश्नाला न्याय मिळेल, असे मला वाटते. या सदनातील सर्व पक्षीय, सर्व समाजाच्या सन्माननीय सदस्यांची समिती गठीत केली पाहिजे. कोणी महात्मा फुल्यांना मानतो, कोणी छत्रपती शिवाजी

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.8261.......

श्री.प्रकाश गजभिये......

महाराजांना मानतो, कोणी शाहू, आंबेडकरांना मानतो. अशा प्रकारे विविध महापुरुषांना मानणारे सन्माननीय सदस्य या सभागृहात आहेत. उद्या काय होईल, हे सांगता येणार नाही. त्यामुळे मंत्री महोदयांनी या सदनाच्या सन्माननीय सदस्यांची एक समिती गठीत करण्याबाबत आजच सभागृहात घोषणा करावी, अशी माझी मागणी आहे. ही मागणी मंत्री महोदय पूर्ण करतील काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या मूळ तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने त्यांनी इतर उपप्रश्न विचारले असले तरी प्रश्नाच्या मूळ गाभ्याकडे ते आता वळले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये हे सामाजिक चळवळीतील एक प्रामाणिक कार्यकर्ते आहेत. त्यांनी आणि सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव जाधव यांनी मागणी केली आहे. सी.बी.एस.ई., आय.सी.एस.ई. अंतर्गत येणाऱ्या शाळा अभ्यासक्रमात त्या त्या राज्यातील संत, महात्म्यांच्या जीवनचरित्रांचा समावेश कसा करता येईल, याबाबत मी केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री महोदयांशी चर्चा करीन.

-----------

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**इयत्ता १ ली, ५ वी व ८ वी चे प्रवेश केंद्रीय पद्धतीने करण्याबाबत**

**(2) * ७२८९ श्री.नागो गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) इयत्ता १ ली, ५ वी व ८ वी चे प्रवेश केंद्रीय पद्धतीने करण्याबाबत नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास शासनास पत्र पाठवून केंद्रीय पद्धतीने इयत्ता १ ली, ५ वी व ८ वी चे प्रवेश देण्यास विनंती केली, हे खरे आहे काय,
(2) राज्यात दिनांक १ एप्रिल, २०१० पासून बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ च्या कायद्याची अंमलबजावणी करण्यात येत असून अधिनियमातील तरतुदीनुसार सी.बी.एस.ई.अभ्यासक्रमाच्या शाळेत व इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेत २५ टक्के प्रवेश आर्थिकदृष्टया दुर्बल कुटुंबातील बालकांसाठी राखीव करण्यात आले, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, या तरतुदीनुसार १ कि.मी. व ३ कि.मी. अंतराच्या अटीवर तसेच १ लाख रु.वार्षिक उत्पन्न मर्यादेच्या अटीवर देण्याचे निर्देश शासनाने दिले आहे, हेही खरे आहे काय,
(4) परंतु यामुळे शाळांमध्ये स्पर्धा वाढून पालकांकडून वेगवेळी अमिषे दाखवून ५ ते १० हजार रुपयांची मागणी करण्यात येत आहे शिक्षकांना दारोदार भटकावे लागत असल्याने त्यांची प्रतिमा मलीन होऊन त्यांचा सन्मान संपुष्टात आला आहे, हेही खरे आहे काय,
(5) असल्यास, विद्यार्थ्यांना घटनात्मक अधिकार प्रदान करण्यासाठी व शिक्षकांचा सन्मान राखण्यासाठी इयत्ता १ ली, इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी चे केंद्रीय पद्धतीने प्रवेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.
(2) हे खरे आहे.
(3) हे खरे आहे.
(4) हे खरे नाही.
(5) शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे.
(6) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.नागो गाणार : सभापती महोदय, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, 2009 या कायद्याची अंमलबजावणी राज्यात दिनांक 1 एप्रिल, 2010 पासून करण्यात येत आहे. या नुसार सी.बी.एस.ई. अभ्यासक्रमाच्या शाळेत व इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेत 25 टक्के प्रवेश आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील बालकांसाठी राखीव

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ठेवण्यात आले आहेत. पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना 1 कि.मी.च्या परिसरात आणि सहावी ते

...5....



ता.प्र.क्र.7289

श्री.नागो गाणार.......

आठवीच्या विद्यार्थ्यांना 3 कि.मी.च्या परिसरात शिक्षण व्यवस्था उपलब्ध करुन देणे ही शासनाची जबाबदारी आहे. त्यानुसार शासनाने सी.बी.एस.ई. व कॉन्व्हेंट शाळांमधील 25 टक्के प्रवेश केंद्रीय प्रवेश पध्दतीने करण्याची योजना सुरु केली आहे. अशासकीय अनुदानित शाळांमध्ये मात्र पहिली, पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांना केंद्रीय प्रवेश पध्दतीने प्रवेश दिला जात नाही. माझा प्रश्न असा आहे की, अशासकीय अनुदानित शाळांमध्ये पहिली, पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांना केंद्रीय प्रवेश पध्दतीने प्रवेश देण्याची योजना सरकार अमलात आणणार आहे का आणि ती केव्हा आणणार आहे ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, शिक्षण हक्क कायद्याप्रमाणे 25 टक्के प्रवेशासाठी ठराविक शाळांमध्ये गर्दी होते. काही शाळांमध्ये प्रवेश घेण्यास पालक उत्सुक नसतात. त्या शाळांमध्ये प्रवेश घेण्यास ते उत्सुक नसतात याचे कारण असे आहे की, त्या शाळांचा शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा चांगला नसतो. दर्जा चांगला नसला तरी 1 कि.मी.च्या आत त्या शाळा असल्यामुळे पालकांनी आपल्या पाल्यांचा त्या शाळांमध्येच प्रवेश घ्यावा, असे बंधन आपल्याला आणता येणार नाही. तशी मागणी सर्व शिक्षक आमदारांनी आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी केल्यास माझी तयारी आहे.

सभापती महोदय, एखाद्या पालकाला आपल्या पाल्यास चांगल्या दर्जेदार शाळेत पाठवायचे असेल तर त्याला तो पर्याय उपलब्ध असला पाहिजे. हा त्या पालकाचा अधिकार आहे. तेथील शाळा योग्य पध्दतीने चालविली जात नसताना केवळ शिक्षकांच्या नोकऱ्या जाऊ नयेत म्हणून जबरदस्तीने पाल्यांना त्या शाळांमध्ये पाठवावे, त्यांचे आयुष्य धोक्यात घालावे, असा निर्णय सरकार कसा घेऊ शकेल ?

सभापती महोदय, हे खरे आहे की, शाळांनी मुलाखत न घेता किंवा कोणतीही परीक्षा न घेता विद्यार्थ्यांना प्रवेश दिला पाहिजे. समजा एखाद्या शाळेत उपलब्ध संख्येपेक्षा जास्त विद्यार्थ्यांचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रवेशासाठी अर्ज आले तर चिठ्ठया टाकून प्रवेश द्यावा, असे अभिप्रेत आहे आणि त्याचे तंतोतंत पालन झाले पाहिजे, हे नक्की आहे.

...6....



ता.प्र.क्र.7289

श्री.विनोद तावडे.......

सभापती महोदय, खरे पाहिले तर काही संस्था चालक आपल्या शाळेत विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला पाहिजे, यासाठी शिक्षकांना राबवितात. म्हणून शिक्षकांनी सरकारविरुध्द संघर्ष करण्याऐवजी या संस्था चालकांविरुध्द संघर्ष केला पाहिजे. शिक्षकांनी या संदर्भातील तक्रारी सरकारकडे केल्यास आम्ही संबंधितांविरुध्द कारवाई करु परंतु, वेगळी विनंती करुन पालकांवर आणि पाल्यांवर अन्याय करीत आहोत की काय, याचाही विचार आपण केला पाहिजे. तथापि, त्यांची तशीच मागणी असेल आणि सर्व शिक्षक आमदारांनी लिहून दिले तर ती मागणी मान्य करण्याची आमची तयारी आहे.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, मंत्री महोदयांना मला दोन उपप्रश्न विचारावयाचे आहेत. गेल्या दोन-तीन वर्षांपासून खाजगी शाळांमध्ये विशेषत: इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रवेश दिला जातो.

यानंतर श्री.बोरले.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7289..........

डॉ.सुधीर तांबे..........

परंतु, मागील दोन वर्षापासून फीची प्रतिपूर्ती झालेली नसल्यामुळे संस्था चालक किंवा शाळा चालक अशा विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देण्यासाठी टाळाटाळ करतात आणि त्यामुळे पालकांना एक प्रकारे अवमानित व्हावे लागते. माझा प्रश्न असा आहे की, हा निधी तातडीने देण्यात येईल काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, ज्या अनुदानित शाळा आहेत त्यांना आपण खाजगी शाळा असे संबोधतो. परंतु, त्या खाजगी शाळा नाहीत. त्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी 25 टक्के जागा आरक्षित ठेवण्याची आवश्यकता आहे काय याबाबत मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे साहेबांनी माननीय श्री.दर्डा साहेब शिक्षण मंत्री असताना हा प्रश्न विचारला असता तर काही तरी फायदा झाला असता. मागील 3 वर्षापासून 137 कोटी रुपये केंद्र शासनाकडून मिळाले नव्हते. आम्ही ते केंद्र शासनाकडून मिळविले.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझी हरकत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, जी वस्तुस्थिती आहे ती मी सांगावयाची नाही काय ? खरे म्हणजे, प्रश्नोत्तराच्या तास सुरु असताना हरकत घेता येत नाही. आपण नियमाचे पुस्तक वाचावे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप, मी आपल्याला नंतर उप प्रश्न विचारण्याची संधी देतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांचा माननीय श्री.दर्डा साहेबांचे नाव घेण्याला आक्षेप असेल तर मी माझे शब्द मागे घेतो. सभापती महोदय, आपण याबाबत निर्णय घ्यावा. माझी त्याला हरकत नाही. माझा म्हणण्याचा उद्देश असा आहे की, जागरुक लोकप्रतिनिधी डॉ.सुधीर तांबे साहेब अतिशय प्रखरपणे विषय मांडतात. त्यांनी मागील 3 वर्षात हा विषय मांडता असता तर हा प्रश्न सुटला असता. परंतु, त्यांनी मागील 3 वर्षात हा विषय मांडला नाही. मी स्वत: दिल्ली येथे जाऊन केंद्र शासनाच्या विभागाबरोबर चर्चा करुन 137 कोटी

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7289..........

श्री.विनोद तावडे.........

रुपये आणले आणि ते खाली कसे निर्गमित होतील हे बघितले. शेवटी, केंद्रीय मनुष्यबळ विभागामार्फत फी निश्चित केली जाते. आपण त्यांना माहिती कळवितो. त्यानंतर ते फी निश्चित करतात आणि शिक्षण हक्क कायद्याप्रमाणे त्यांच्याकडून फीची रक्कम मिळते. परंतु, मागील 3 वर्षापासून ती फीची रक्कम मिळाली नव्हती, आम्ही ती मिळविली. त्यामुळे या विषयाबाबत आता तक्रार तशी कमी राहील. दुसरे म्हणजे, खाजगी शाळांमध्ये प्रवेशाचे निर्बंध आहे काय, तर शिक्षण हक्क कायद्याप्रमाणे ते आहे.

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, लेखी उत्तरात असे नमूद केलेले आहे की, इयत्ता 1 ली, इयत्ता 5 वी व इयत्ता 8 वीचे वर्ग केंद्रीय पद्धतीने करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे. ही कार्यवाही नेमकी कोणत्या टप्प्यावर आहे ? त्याच प्रमाणे, सदर कार्यवाही होऊन शासन निर्णय निर्गमित करण्याची अंदाजित तारीख शासन जाहीर करणार आहे काय ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, जो निर्णय दिनांक 1 एप्रिल, 2010 पासून लागू केलेला आहे त्या दृष्टीने सीबीएसई अभ्यासक्रमाच्या शाळेत व इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेत 25 टक्के प्रवेश आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील बालकांसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. मात्र त्याचा आढावा शासनाने घेतलेला आहे काय, असल्यास त्याची माहिती घेऊन ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणार आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नागो गाणार साहेबांची हा प्रश्न विचारण्यामागची प्रामाणिक भावना अशी होती की, आपण जर ठराविक किलो मीटर अंतरावरील ऑनलाईन केले तर खऱ्या अर्थाने ज्युनिअर के.जी, पूर्व प्राथमिक किंवा इयत्ता 1 लीच्या प्रवेशासाठी सर्व शाळांमध्ये विद्यार्थी पोहोचू शकतात. मग तसे करता येऊ शकते काय ? आपण इयत्ता 11 वीचे प्रवेश ऑनलाईन केलेले आहेत त्या प्रमाणे करता येईल काय, याबाबत माहिती घेण्याची कार्यवाही आम्ही शासन स्तरावर करीत आहोत. मला असे वाटते की, महाराष्ट्रातील जी 50-60 ठिकाणे अर्बनाईज्ड आहेत त्यासाठी हा प्रश्न अधिक महत्वाचा आहे. त्यामुळे हे प्रत्यक्ष

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7289..........

श्री.विनोद तावडे.......

अंमलात आणणे, यातील फायदे-तोटे काय आहेत, याबाबतची कार्यवाही आम्ही करीत आहोत. दुसरा मुद्दा असा आहे की, सीबीएसई, आयसीएसई शाळांच्या संदर्भातील जो 25 टक्क्याचा मुद्दा आहे त्याचा आढावा आपणही घेतो आणि केंद्र शासन देखील घेत असते. या विषयातील आपला परफॉर्मन्स काय आहे, हे शासन घोषित करीत असते. त्याचे अहवालही प्रकाशित होतात. त्या अहवालाची प्रत आपल्याला देण्यात येईल. (...अडथळा...) मी सांगितले की, याबाबत आपणही आढावा घेतो, केंद्र शासनामार्फत देखील आढावा घेतला जातो आणि त्याचा अहवाल प्रकाशित केला जातो. आपण तो अहवाल वाचला नसेल तर तो आपल्याकडे पाठविण्यात येईल.

**सभापती** : आपण तो अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवावा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, वायफाय असल्यामुळे मी तो दाखवू शकतो.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, आपण शिक्षण हक्क कायद्याच्या अंतर्गत दारिद्र्य रेषेखालील मुलांना शाळांमध्ये 25 टक्के आरक्षित जागांवर ॲडमिशन देतो. परंतु, अनेक शाळांमध्ये शिक्षण हक्क कायद्याच्या अंतर्गत सिट्स रिकाम्या आहेत आणि त्यांना अजूनही जिल्हापरिषदेकडून किंवा योग्य त्या शासकीय एजन्सीकडून कळविले जात नाही. पालकांना तेथे ॲडमिशन घ्यायचे आहे. परंतु, त्या सिट्स अडविल्या गेल्या आहेत. आपण या संदर्भात शाळांना कळविणार आहात काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण शासनामार्फत शिक्षण हक्क कायद्याच्या अंतर्गत 25 टक्के आरक्षित जागांची माहिती विद्यार्थी, पालकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करतो. परंतु, सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे ज्या आदिवासी, डोंगराळ प्रदेशाचे प्रतिनिधित्व करतात त्या भागात अशा प्रकारचे कोठे राहिले असेल तर आपण तेथे अधिक प्रयत्न करू.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, शिक्षण हक्क कायद्याच्या अंतर्गत सिट्स भरलेल्या आहेत. परंतु, त्यानंतर जर काही सिट्स शिल्लक असतील तर त्या सिट्स इतर ॲडमिशनसाठी आपण ओपन करणार आहात काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7289..........

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, शासनाने शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. परंतु, दुर्दैवाने त्या शासन निर्णयाविरुद्ध संस्था चालकच कोर्टात गेलेले आहेत आणि संस्था चालकांना त्यातून राहत मिळण्यापेक्षा शासन निर्णयामुळे जे बरे होणार होते त्यापेक्षा त्यांना यावर्षी नुकसानच झाले आहे. त्यामुळे कोर्टाचा जो निर्णय येईल त्याप्रमाणे आपल्याला पुढील कार्यवाही करावी लागेल. आम्ही तीन फेऱ्या केल्यानंतर ओपन केले होते.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नागो गाणार सरांच्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री महोदयांनी सांगितले की, 1 ते 3 किलो मीटर अंतरावरील विद्यार्थ्यांची सोय करण्याचे शासनाचे धोरण आहे. दिवसेंदिवस विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी होत आहे आणि जे गरीब विद्यार्थी आहेत त्यांना आर्थिकदृष्ट्या वाहतुकीची व्यवस्था परवडत नसल्यामुळे त्यांना त्या ठिकाणी जाणे अशक्य होते. सन्माननीय सदस्य श्री.नागो गाणार यांनी शाळेत शिक्षक कसा राहील आणि ती शाळा कशी जीवंत राहील या दृष्टीने प्रश्न विचारला आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य आरोप करीत आहेत. त्यांनी शैक्षणिक गुणवत्तेवर प्रश्न विचारला आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हे माझे मत आहे. मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरात त्याबाबतचा खुलासा करावा. राज्य शासन एका वर्षाला एका शिक्षकासाठी 1 ते 2 लाख रुपये खर्च करते. म्हणजे आपण जवळपास 7-8 लाख रुपये खर्च करतो. त्याच्या 25 टक्के पैसे या गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी जी फी खाजगी शाळा आकारतील त्याचे धोरण राज्य शासन गंभीरपणे याचा विचार करुन राबविण्याचा प्रयत्न करील काय ? ज्या एक शिक्षकी शाळा आहेत आणि 5 विद्यार्थी आहेत, परंतु त्या ठिकाणी विद्यार्थ्यांची पटसंख्या पूर्ण होऊ शकत नाही. त्या विद्यार्थ्यांची वाहतुकीची तरी सोय राज्य शासन करणार आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, शिक्षण हक्क कायद्याच्या अंतर्गत अशा प्रकारची व्यवस्था आहे आणि या विषयाबाबत आपण निर्णय घेत आहोत. त्यामध्ये आपण अशा प्रकारची व्यवस्था करीत आहोत.

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7289..........

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नागो गाणार यांचा प्रश्न विचारण्याचा मूळ हेतू असा होता की, आपण शिक्षण हक्क कायद्याच्या अंतर्गत ही व्यवस्था केलेली आहे. आपण सध्या इयत्ता 1 लीच्या वर्गासाठी ही व्यवस्था केली तर इयत्ता 5 वी आणि 8 वीचा विषय त्यांनी यासाठी विचारला की, कदाचित आपल्याला ते फिजिबल नसेलही. परंतु, अन्य देशांमध्ये नेबरहुड स्कूल ही संकल्पना आहे. आपण व्यक्ती स्वातंत्र्याचा किंवा पालकांच्या मताचा विचार करतो. पालकांना आपल्या मर्जीनुसार कोणत्याही शाळेत मुलाचे ॲडमिशन घेण्याचा हक्क आहे, हे आम्ही मान्यच करतो. परंतु, भविष्यात केव्हा तरी मंत्री, नगरसेवक, शिक्षक किंवा सफाई कामगारांची मुले त्या परिसरातील शाळेत येऊ शकतील काय, या दृष्टीकोनातून विचार होण्यासाठी नेबरहुड स्कूल ही संकल्पना शासन भविष्यात केव्हा तरी मान्य करण्याचा विचार करणार आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ज्या देशांमध्ये नेबरहुड स्कूल सुरु आहे त्या देशात एकच शैक्षणिक पॅटर्न सुरु आहे. आपल्या देशात एसएससी, सीबीएसई, आयसीएसई, आजीएसई बोर्डाच्या शाळा आहेत आणि त्या शाळांचे वेगवेगळे उपक्रम असतात. ज्या देशांमध्ये नेबरहुड स्कूल सुरु आहे तेथील शिक्षणाचा पॅटर्न समान आहे. त्यामुळे तेथे शिक्षणाच्या बाबतीत फारसे अंतर पडत नाही. आपल्याकडे पालकांना वेगळ्या पद्धतीच्या शाळेत मुलाचे ॲडमिशन घ्यायचे असते. मग अशा वेळी शासनाने अशा प्रकारची जबरदस्ती करणे किती उपयुक्त राहू शकते ? गरीब विद्यार्थी असो किंवा श्रीमंत विद्यार्थी असो त्याला जवळपास चांगली शाळा मिळाली पाहिजे, हा प्रश्नाचा मूळ गाभा आहे. आपण सुरुवातीच्या प्रवेशाच्या वेळी 1 किलो मीटर 3 किलो मीटरचा निकष पाळतो.

--------

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालाबाबत**

**(3) * ७५०६ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते, श्री.सुनील तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.संदिप बाजोरिया, श्री.धनंजय मुंडे, श्री.अनील तटकरे, श्री.प्रकाश बिनसाळे, ॲड.निरंजन डावखरे:** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) शासनाने शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांच्या ाअध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीने सादर केलेल्या दिनांक १० एप्रिल, २०१५ च्या अहवालात माध्यमिक शाळेतील इयत्ता ९ वी व १० वी च्या प्रत्येक वर्गामध्ये ४० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असेल तर ती माध्यमिक शाळा बंद करण्यात येईल अशी शिफारस केली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, ४० पेक्षा कमी संख्या असलेल्या इयत्ता ९ वी व इयत्ता १० वीचे वर्ग असलेल्या शाळांची महसूल विभागनिहाय एकूण संख्या किती आहे,
(3) असल्यास, या अहवालासंदर्भात शिक्षक लोकप्रतिनिधीनी सादर केलेल्या दुरुस्ती संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) उपरोक्त प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
(2) इयत्ता ९ वी, इ. १० वी चे वर्ग असलेल्या एकूण शाळा ६६ असून त्यांची महसूल विभागनिहाय संख्या पुढीलप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| कोकण | - | २० |
| नाशिकक | - | ६ |
| पुणे | - | ९ |
| औरंगाबाद | - | १७ |
| नागपूर | - | ११ |
| अमरावती | - | ३ |

(3) प्रधान सचिव (शा.शि) यांच्या समितीने शासनास सादर केलेला अहवाल विभागाच्या संकेतस्थळावर जनतेच्या अवलोकनार्थ व अभिप्रायार्थ प्रसारित करण्यात आला होता. त्यावर सूचना व हरकती मागविण्यात आल्या होत्या. राज्यातील विविध संघटना, संस्था नागरिक, लोकप्रनिनिधी यांच्याकडून हरकती व सूचना प्राप्त झ ााल्या आहेत. बहुवर्ग बहुस्तर अध्यापन पध्दती, विद्यार्थ्यांचे समाजिकरण विद्यार्थ्यांचे समायोजन, अतिरिक्त शिक्षकांचे/ मुख्याध्यापकांचे पद निर्माण करणे, नवीन शाळा सुरु करणे आणि शाळांमध्ये संरचनात्मक बदलांबाबतचा प्रस्ताव मंत्री मंडळासमोर सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने तारांकित प्रश्नाच्या उत्तरात दुरूस्ती करतो. लेखी उत्तरात क्रमांक (1) येथे होय, 'हे खरे आहे', या ऐवजी 'हे खरे नाही' व क्रमांक (2) मध्ये इयत्ता

....2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7506...

श्री.विनोद तावडे...

9 वी व 10 वी मध्ये प्रत्येक वर्गाची पटसंख्या 20 पेक्षा कमी केली आहे. अनेक आमदार महोदयांनी 40 पटसंख्येची सूचना केली होती ती मी 20 केली आहे. मी आणखी शाळा टिकविण्याचा प्रयत्न केलेला आहे. 20 संख्या झाल्यास त्या विद्यार्थ्यांचे इतर जवळच्या शाळेत समायोजन करण्यात येईल. आमदार महोदयांनी जे सूचविले होते त्यापेक्षा शासनाने लवचिक धोरण स्वीकारले आहे.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, या प्रश्नाला मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. परंतु मुळातच आदिवासी भागात 15 मुलांच्या पटसंख्येची रचना पाहिजे होती. ग्रामीण भागात 20 पटसंख्या व शहरी भागामध्ये पटसंख्येची मर्यादा 20 मुलांची असायला पाहिजे होती. ही बाब आता मंत्रिमहोदयांनी मान्य केली आहे. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, पहिले ते चौथीच्या शाळेत आता पाचवीचा वर्ग जोडण्यात येणार आहे. ज्या शाळेत सातवीपर्यंत शाळा असेल तेथे आठवीचा वर्ग जोडावयाचा आहे. त्या शाळेत ऑलरेडी पाचवीचा वर्ग असताना अशी रचना केली तर शासनाचा विनाकारण खर्च वाढेल. प्रधान सचिव पातळीवर जी समिती स्थापन करण्यात आली होती, त्या समितीने अशा प्रकारची शिफारस केली आहे काय ? इयत्ता चौथीपर्यंत जिल्हापरिषदेची शाळा असेल व तेथे हायस्कूल म्हणून दुसरी शाळा असताना तेथे पाचवीचा व आठवीचा वर्ग सुरु करण्याचा शासनाचा विचार आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझी नम्र विनंती आहे की, जनतेच्या सूचनांसाठी आम्ही शालेय शिक्षण विभागाच्या वेबसाईडवर हे परिपत्रक टाकलेले आहे. माझी किमान अपेक्षा अशी आहे की, सन्माननीय सदस्यांनी तरी ते वाचले पाहिजे. ज्या बाबी आज या प्रश्नात व उप प्रश्नांमध्ये विचारण्यात आल्या आहेत, त्या सर्व बाबींचा उल्लेख परिपत्रकात करण्यात आलेला आहे. याबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी आम्हाला पत्र लिहून काही बदल सूचविले आहेत. काही चांगले बदल स्वीकारुन सकारात्मक दृष्टीने विचार करुन नवीन परिपत्रक तयार करण्यात येणार आहे. याबाबत सन्माननीय सदस्यांकडून लेखी सूचना मागवून त्यांचा देखील विचार करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी आता जो प्रश्न उपस्थित केला आहे. शिक्षक हक्क कायद्याप्रमाणे पाचवीचा वर्ग जोडावा लागणार आहे. पाचवीचा वर्ग जोडत असताना मुंबईच्या शाळांचा विचार

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7506...

श्री.विनोद तावडे....

केला तर पाचवीच्या सात डिव्हीजन म्हणजे सात वर्ग बसविण्यासाठी त्यांना आता लगेच जागा मिळणार नाही. त्यामुळे याबाबत थोडे लवचिक धोरण स्वीकारुन ज्या शाळांमध्ये अशा प्रकारच्या मुलभूत सोई सुविधांची अडचण होणार नाही. त्या ठिकाणी पाचवी व आठवीचे वर्ग सुरु करण्याचे काम पहिल्या टप्प्यात करण्यात येणार आहे. कायद्याचे पालन आपणा सर्वांना करावेच लागणार आहे. टप्प्या टप्प्याने याबाबत अंमलबजावणी करण्यात येईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा व संवेदनशील प्रश्न आहे, प्रश्नाच्या उत्तरात विभागवाईज शाळांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. यामध्ये जास्तीत जास्त शाळा कोकणातील आहेत. कारण तेथील भौगोलिक परिस्थिती तशी आहे. कोकणात मुंबई व ठाणे शहर आहे. आता ठाणे शहराचा व एमएमआरडीएचा प्रसार पनवेल-पेणपर्यंत गेला आहे. त्यामुळे कोकणातून शहरात येणाऱ्यांची संख्या जास्त असल्याकारणाने मुलांच्या पटसंख्येबाबत मंत्री महोदयांनी जी शिथिलता केली आहे. त्याबाबत मंत्री महोदयांनी चांगल्या केलेल्या कामाचे आम्ही नेहमी स्वागत करतो. मी तुमचे स्वागत व आभार करण्यासाठी उभा आहे. शिक्षणासारख्या मूलभूत गरजांमध्ये काळानुसार कोणतेही सरकार बदल करीत असेल, मुलांचे भविष्य उज्जव करण्यासाठी प्रयत्न करीत असेल तर त्याचे आम्ही स्वागतच करणार. यामध्ये आणखी एक गोष्ट मला सूचवाशी वाटते की, पाचवी ते आठवीचे वर्ग जोडत असताना नववी व दहावीसाठी फिडबॅक नसेल तर जी पटसंख्या 40 वरुन 20 करण्यात आली आहे ती कदाचित आणखी खाली जाण्याची शक्यता आहे. या राज्यात एक व दोन विद्यार्थी व एक शिक्षक असणाऱ्या देखील शेकडो शाळा आहेत, माझ्या गावात एकेकाळी सावतीपर्यंत असणारी शाळा आता चौथीपर्यंत आहे. चौथीपर्यंत एकूण विद्यार्थी फक्त 18 आहेत, अशी वस्तुस्थिती आहे. मंत्री महोदयांचे स्वागत करीत असताना एक दीर्घकालीन धोरण करताना विभागवाईज विचार करण्याची गरज आहे. प्रत्येक विभागाच्या वेगळ्या गरजा आहेत, त्यामुळे या अहवालाबरोबर या बाबींचा देखील शासनातर्फे विचार करण्यात येईल काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप हे नेहमीच चांगल्या गोष्टीचे कौतुक सभागृहात व वाहिन्यांवर देखील मोकळेपणाने करतात. त्यामुळे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7506...

श्री.विनोद तावडे....

कोकणातील गुण हा त्यांच्यामध्ये सकारात्मक दृष्टीकोनातून दिसून येतो. डोंगराळ व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या संख्येमुळे त्या विद्यार्थ्यांवर अन्याय होणार नाही अशा बाबी नवीन परिपत्रकात नमूद करण्यात येणार आहेत. कोणत्याही विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा हक्क डावलला जाणार नाही असे मी आश्वासन देऊ इच्छितो.

**सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांना माझी सूचना आहे की, स्पेसिफिक प्रश्न विचारावेत व मंत्री महोदयांनी स्पेसिफिक उत्तर द्यावे. त्यामुळे आपणाला जास्त तारांकित प्रश्नांवर चर्चा करता येईल.

----------

....5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**ठाणे (पूर्व) येथील कोपरी भागातील अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या गोदामाची जागा नागरी सुविधासाठी देण्याचा घेतलेला निर्णय**

**(4) * ६७४२ डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) ठाणे (पूर्व) येथील कोपरी भागातील अन्न व नागरी पुरवठा विभागाची सुमारे ३ हजार चौरस मीटर गोदामाची जागा नागरी सुविधांसाठी देण्याच्या संदर्भात मा.ठाणे पालकमंत्री व अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांची दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास बैठक झाली, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या बैठकीत कोणते निर्णय घेण्यात आले आणि या निर्णयाच्या अंमलबजावणीमध्ये कोणती उपाययोजना आखण्यात आली आहे वा येत आहे ?
**श्रीमती विद्या ठाकूर, श्री. गिरीश बापट, यांच्याकरिता :** (१) होय, दिनांक १२ मे, २०१५ रोजी मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांच्या अध्यक्षतेखाली कोपरी (जि.ठाणे) येथील शासकीय गोदामाची जागा ठाणे महानगर पालिकेस हस्तांतरीत करण्याबाबत मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) तथा पालक मंत्री, ठाणे यांच्या उपस्थितीत बैठक झाली आहे.
(2) या संदर्भात या बैठकीमध्ये ठाणे महानगरपालिकेला विहित प्रस्ताव पाठविण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, क्रमांक दोनचा उप प्रश्न मी विचारला होता, यामध्ये मी अशी विचारणा केली होती की, या बैठकीत कोणते निर्णय घेण्यात आले आहेत. व या निर्णयांच्या अंमलबजावणीसाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे. माझ्या माहिती प्रमाणे ठाणे महानगरपालिका अन्न व नागरी संरक्षण विभागाला काही जागा देणार आहे. त्या ठिकाणी कोणते उपक्रम घेतले जाणार आहेत. वर्षानुवर्षे ही गोदामे वापरात नव्हती. त्यामुळे ठाणे महानगरपालिका ती गोदामे आमच्याकडे द्यावीत अशी मागणी करीत होते. कारण त्यांची विकास कामे अडली आहेत.ठाणे महानगरपालिका जी जागा देणार आहे त्याचा उपयोग कशा प्रकारे करण्यात येणार आहे. याबाबत मंत्रिमहोदया खुलासा करतील काय ?

श्रीमती विद्या ठाकूर : सभापति महोदय, दिनांक 12 मई को अन्न पुरवठा विभाग के मंत्री सम्माननीय श्री गिरीष बापट साहब और थाना के पालक मंत्री सम्माननीय एकनाथ शिंदे साहब तथा अन्य उच्च अधिकारियों के साथ एक बैठक हुई. उस बैठक में यह निर्णय हुआ कि थाना और मुंबई में, कोपरी में शासन के जो गोडावून हैं, महानगरपालिका को अगर गोडावून चाहिए, तो थाना महानगरपालिका ने एक जनरल बॉडी में एक ठराव पास करके शासन को प्रस्ताव भेजना चाहिए. वह प्रस्ताव अब तक शासन के पास नहीं आया है. मीटिंग में उनको सूचना भी दी गई थी.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

उसके बावजूद उनकी तरफ से शासन के पास अब तक कोई भी प्रस्ताव आया नहीं है.

....6...



ता.प्र.क्र.6742...

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, शासन ही गादामे महानगरपालिकेला देऊ इच्छित आहेत. माझा प्रश्न असा आहे की, ज्या गोदामांचा वापर होत नाही अशी किती गोदामे अन्न व नागरी पुरवठा विभागाकडे आहेत. असे किती अन्न धान्य आहे की, ते गोदामा विना खराब होत आहे. याची माहिती मंत्री महोदया देतील काय ?

श्रीमती विद्या ठाकूर : सभापती महोदय, सदर माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

-------

....7....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मॅगी या खाद्यपदार्थाच्या तपासणीत कर्करोगाला कारणीभूत ठरणारा घटक गरजेपेक्षा जास्त प्रमाणात असल्याबाबत**

**(5) * ७०६० श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मॅगी या खाद्यपदार्थाच्या तपासणीत मॅगीमध्ये मोनोसोडियम ग्लुटोमेट (अजिनोमोटो) हा कर्करोगाला कारणीभूत ठरणारा घटक गरजेपेक्षा जास्त प्रमाणात असल्याचे उघडकीस आलेले असून ही बाब राज्यातील अन्न व औषध प्रशासनाच्याही निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आहे,

(3) असल्यास, सदर बाब गंभीर असून जनतेच्या आरोग्याशी संबंधित असल्यामुळे या प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(4) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती विद्या ठाकूर, श्री. गिरीश बापट, यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही.

मॅगी अन्न पदार्थाच्या लेबलवर No Added MSG असे लिहिलेले असून देखील मोनोसोडीयम ग्लुटामेट आढळून आले आहे. परंतु मोनोसोडीयम ग्लुटामेट कर्करोगास कारणीभूत असल्याबाबत कोणताही वैज्ञानिक पुरावा उपलब्ध नाही.

(2) देशभरात मॅगी नुडल्यची नमुन्यांमध्ये शिसाचे प्रमाण मर्यादेपेक्षा जास्त आढळले. या धर्तीवर महाराष्ट्रात प्रारंभी घेतलेल्या मॅगीच्या २० नमुन्यांच्या अहवालापैकी ०५ नमुन्यांमध्ये शिसाचे प्रमाण निश्चित केलेल्या प्रमाणापेक्षा जास्त आढळल्याने असुरक्षित घोषित करण्यात आले व सर्व नमुने MSG आढळून आल्याने मिथ्याछाप घोषित केले आहेत. सदर सर्व अहवाल दिनांक ५ वव ६/६/२०१५ रोजी प्राप्त झाले असून त्यानुषंगाने दिनांक ६/६/२०१५ रोजी अन्न व औषध प्रशासनाने मॅगीच्या उत्पादन, साठा, वितरण व विक्रीवर बंदीचे आदेश जारी केले आहेत. याव्यतिरिक्त विश्लेषणास घेतलेल्या मॅगीच्या ४६ नमुन्यांपैकी ०४ नमुने असुरक्षित तर २२ मिथ्याछाप घोषित केले आहेत.

(3) अन्न सुरक्षा मानके प्राधिकरण नवी दिल्ली यांनी दिनांक ०५/०६/२०१५ रोजी मॅगी विषयी बंदी आदेश जारी केला आहे व मॅगी संदर्भात महाराष्ट्रातील दि. ५ व ६ जून २०१५ रोजी प्राप्तत असुरक्षित घोषित विश्लेषण अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने देखील मॅगी नुडल्सच्या उत्पादन, साठा, वितरण व विक्रीवर दि. ०६ जून, २०१५ पासून बंदी घातली आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, हा प्रश्न राज्यातील व देशातील अत्यंत महत्वाचा आहे. हा प्रश्न इंटरनॅशनला झाला आहे, त्यामुळे इंटरनॅशनल लोक आपणाला लुटायला निघाले आहेत. माझा प्रश्न असा आहे की, जे एमएसजी म्हणजे मोनोसोडियम ग्लुटोमेट यामुळे कॅन्सर



ता.प्र.क्र.7060...

श्री.शरद रणपिसे...

होत नाही असे उत्तरात नमूद केले आहे. असे वैज्ञानिकदृष्ट्या सिध्द झालेले नाही. अजिनोमोटोमुळे माणसाच्या शरीरातील हाडे ठिसूळ होतात काय ? हाडे ठिसूळ झाल्यामुळे अनेक रोग उद्‌भवतात काय असा प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, चायनामध्ये जे अजिनोमोटो खाल्ले जाते ते नैसर्गिक असते. आपल्याकडे जे अजिनोमोटो आढळले आहे, ते केमिकल आहे काय ? केमिकल असेल तर ते कोणते केमिकल आहे, ते शरीराला घातक आहे काय ? तिसरा प्रश्न असा आहे की, अशाच प्रकारची अनेक उत्पादने अनेक इंटरनॅशनल व भांडवलदार कंपन्या सर्वसामान्य माणसाचे शोषण करतात. त्यामुळे सर्व प्रकारच्या पॅकबंद उत्पादनावर शासन बंदी घालणार काय ?

यानंतर श्री.भोगले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7060.....

श्रीमती विद्या ठाकूर : सभापति महोदय, एमएमजी शरीर के लिए नुकसानदेह नहीं है. उससे कैंसर या हड्डी की दूसरी कोई भी बीमारी होती है ऐसा मेडिकल प्रू नहीं हुआ है. लेकिन इसका अधिक सेवन करने से, अधिक खाने से पेट में दर्द हो सकता है, चक्कर आ सकती है. उल्टी हो सकती है. इससे कैंसर या किडनी फेल्युअर होता है ऐसा मेडिकल प्रू नहीं हुआ है. हो सकता है कि कोई बीमारी हो सकती होगी, लेकिन मेडिकल प्रू नहीं है.

श्री.शरद रणपिसे : यामुळे हाडे ठिसूळ होतात का?

श्रीमती विद्या ठाकूर : नाही.

श्री.शरद रणपिसे : अजिनोमोटो केमिकल मेड आहे का, असेल तर ते केमिकल शरीराला हानीकारक आहे का?

श्रीमती विद्या ठाकूर : सभापति महोदय, उसके अंदर केमिकल नहीं है. ते नैसर्गिक आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, आज आपण पाहतो की, प्रोसेस फूड प्रॉडक्ट फार मोठया प्रमाणात शहरांमधून विकले जात आहेत. त्या पदार्थाच्या निर्मिती प्रक्रियेत काय आहे याबद्दल आठ दहा दिवसापूर्वी मुंबईमध्ये एक सविस्तर अहवाल आला होता. जीवनाचा वेग वाढल्यामुळे बरेच लोक तयार खाद्य पदार्थाकडे आकर्षित होत आहेत. त्यामुळे तयार खाद्य पदार्थाची विक्री मोठया प्रमाणावर होत आहे. यामुळे अन्न व औषध प्रशासनाची जबाबदारी वाढली आहे. या गोष्टीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि तयार खाद्य पदार्थांमध्ये आरोग्याला अपायकारक गोष्टी येणार नाहीत याची काळजी घेण्यासाठी जी यंत्रणा आहे ती अपुरी पडणार आहे. यंत्रणेमध्ये खूप मोठा बदल घडविण्याची आवश्यकता आहे. विभागाकडे मोठया प्रमाणात प्रयोगशाळा असण्याची आवश्यकता आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाची या निमित्ताने पुनर्रचना करण्याची गरज आहे. मॅगीच्या विक्रीला आपल्या देशामध्ये परवानगी नाकारली गेली. परंतु इतर देशामध्ये मॅगी विकण्यास अनुमती आहे. त्यामुळे आपल्या देशातील साठा परदेशात पाठविण्यास सुरुवात झाली आहे. या विषयाच्या अनुषंगाने हायकोर्टात एक याचिका दाखल झाली, त्या प्रकरणात हायकोर्टाने मॅगीचा साठा नष्ट करण्याच्या सूचना दिलेल्या असताना कंपनीकडून त्या सूचनेचे पालन केले जात नाही. या संदर्भात विभाग कोणती कारवाई करणार आहे?

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7060....

श्रीमती विद्या ठाकूर : सभापति महोदय, मॅगी का जो विषय है, इस समय मॅगी का विषय कोर्ट में है, आज उसकी सुनवाई है. मॅगी के ऊपर भी महाराष्ट्र सरकार ने बैन किया हुआ है. उसकी सॅम्पलिंग ली है, सीजर ॲक्शन हुए है. सारा माल रिकॉल किया गया है. महाराष्ट्र एफडीए ने ऑर्डर भी किया है कि इसके अंदर जो भी सामान है उसको आप पूरा डिस्ट्रॉय कर दीजिए. सेंट्रल की हमारी जो कमिटी है, उस कमिटी को भी बताया गया है, उसमें एक कड़क नियम है, जिसके कारण यह जो बेचा जाता है, वह बेचा न जाए. सेंट्रल ने भी महाराष्ट्र सरकार को बताया है कि बाकी की जो कंपनियां है, उनके भी सॅम्पल्स लीजिए, उनके भी सीजर कीजिए, उन पर भी एक्शन लीजिए. अलग अलग कंपनियों के भी सॅम्पल्स लिए जा रहे है.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मॅगीचा विषय आंतरराष्ट्रीय बनलेला आहे. अन्न व औषध प्रशासनाकडे अशा प्रकारच्या तयार खाद्य पदार्थांची चाचणी करण्यासाठी पुरेसा स्टाफ नाही. मी हा विषय अनेकदा सभागृहात मांडला आहे. आज अन्न व औषध प्रशासनाकडे पुरेसे अन्न निरीक्षक नाहीत. मुंबई शहरासाठी फक्त 17 अन्न निरीक्षक आहेत. मी मागच्या वेळी सभागृहात हेच सांगितले होते. अन्न सुरक्षा मानके प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी मॅगीविषयी बंदी आदेश जारी केला आहे असे उत्तरात नमूद केले आहे. महाराष्ट्रामध्ये मॅगी असुरक्षित असल्याचा अहवाल मिळाला आहे. असे अनेक तयार खाद्य पदार्थ असुरक्षित असल्याचे अहवाल आलेले आहेत. मॅगीवर बंदी घालण्यासाठी सरकार जेवढे कार्यक्षम दिसले त्याच पध्दतीने अहमदनगर येथील सूर्यकांता चिक्कीची तपासणी करण्यात आली, जी चिक्की लहान मुलांना खाण्यासाठी दिली जाते त्या चिक्कीबाबत अन्न व औषध प्रशासनाने अहवाल दिलेला आहे. त्या अहवालाच्या आधारे सूर्यकांता चिक्कीवर बंदी घालण्याबाबत कार्यक्षमता दिसून येईल काय? ही चिक्की लहान मुलांना खाण्यासाठी दिली जाते. दूरदर्शनच्या माध्यमातून आम्ही पाहिले की, त्या चिक्कीमध्ये पत्र्याचे तुकडे आढळून आले. मॅगीच्या संदर्भात कार्यक्षमतेने ॲक्शन घेतली. त्यापेक्षा जास्त गांभीर्य सूर्यकांत चिक्कीच्या तपासणीतून आलेल्या अहवालामध्ये दिसून आले आहे. सूर्यकांता संस्थेने उत्पादन केलेल्या चिक्कीच्या उत्पादन, साठा, वितरण व विक्रीवर तातडीने बंदी घालणार आहात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

काय, असलेला चिक्कीचा साठा नष्ट करणार आहात काय? ही चिक्की वेगळया पध्दतीने दुसरीकडे पुरविली जाऊ शकते. 260 कोटी रुपयांचा साठा आहे. रिप्लेसमेंट करुन ती चिक्की विकली जाऊ शकते. शासन या संदर्भात तातडीने ॲक्शन घेणार आहे काय?

..3...



श्रीमती विद्या ठाकूर : सभापति महोदय, चिक्की का जो विषय है, वह इस प्रश्न से अलग विषय है. आपने कर्मचारियों के बारे में जो बताया, वह सत्य परिस्थिति है कि कर्मचारी कम है. जितनी भी प्रयोगशालाएं है, उसको आधुनिक ढ़ंग से बनाने की हमारी कोशिश जारी है.

**सभापती** : मला स्वतःला असे वाटते की, मॅगी आणि तत्सम लाईफ रिलेटेड गोष्टी आपल्यासमोर आलेल्या आहेत, माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी सांगितले की, अन्न व औषध प्रशासनाकडे चाचणी करण्यासाठी पुरेसा स्टाफ नाही. मॅगीच्या विक्रीवर आपल्या देशामध्ये परवानगी नाकारली, परंतु परदेशामध्ये परवानगी दिली गेली आहे. माझ्या माहितीप्रमाणे अमेरिकेची अन्न व औषध प्रशासन ही संस्था नियमाचे पालन करण्याच्या अनुषंगाने अत्यंत कडक आहे. मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, या विषयावर सभागृहात अधिक चर्चा करण्यापेक्षा माननीय सदस्यांच्या ज्या शंका आहेत त्यांचे निरसन करण्यासाठी मी माझ्या दालनात बैठक बोलावतो. माननीय सदस्यांनी मॅगी किंवा अन्य विषयाच्या संदर्भातील त्यांच्या शंका त्या बैठकीमध्ये मांडाव्यात, जेणेकरुन त्या शंकाचे निरसन करता येईल.

श्रीमती विद्या ठाकूर : मान्य आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, आपण आपल्या दालनामध्ये बैठक घ्यावी.

**सभापती** : मी सांगितले आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, अयोग्य चिक्कीचा साठा नष्ट करणार का या प्रश्नाला मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले नाही.

**सभापती :** मंत्री महोदया, माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी जी मागणी केली आहे ती बाब आपण तपासून घ्यावी, आपल्याला साठा योग्य आढळून आला नाही तर मागे घेण्यात यावा.

श्रीमती विद्या ठाकूर : मान्य आहे.

--------------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**ठाणे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागातील गैरप्रकारांबाबत**

**(६) * ८०६७ श्री.रामनाथ मोते, डॉ.अपूर्व हिरे, श्री.नागो गाणार:** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागातील कर्मचारी शिक्षणाधिका-यांच्या बनावट सह्या करुन पत्र करीत आहेत असे नोव्हेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) मा.शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई यांना याबाबत चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश दि.११ नोव्हेंबर, २०१४ रोजी दिले होते हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतचा अहवाल शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडून केंव्हा प्राप्त झाला आहे,
(४) शिक्षणाधिकाऱ्यांची बनावट सही करुन पत्र करणा-या व जाणीवपूर्वक प्रकरणे आर्थिक मागणीच्या अपेक्षेने दाबून ठेवणा-या कर्मचाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली आहे,
(५) नसल्यास, गैरप्रकार करणा-या व शासनाची दिशाभूल करुन फसवणूक करणा-या कर्मचा-यांना पाठिशी घालण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) खरे आहे.
(३), (४) व (५) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना चौकशी करण्याबाबत कळविलेले आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील शिक्षण विभागातील अनागोंदी कारभाराबाबतचा हा प्रश्न आहे. मी असा लेखी प्रश्न विचारला होता की, शिक्षणाधिकाऱ्यांच्या बनावट सह्या करून ठाणे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाकडून उपसंचालक किंवा अन्य कार्यालयात प्रस्ताव जातात का, गेलेले आहेत का? या प्रश्नाला मंत्री महोदयांनी 'हे खरे आहे' असे लेखी उत्तर दिलेले आहे. त्यांनी असे प्रकार घडल्याचे मान्य केलेले आहे.

नंतर ओ.1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.8067....

श्री.रामनाथ मोते...

सभापती महोदय, ही बाब शिक्षण उप संचालक, मुंबई विभाग, मुंबई यांच्या निदर्शनास आली आहे. त्यांनी दिनांक 11.11.2014 म्हणजे जवळ जवळ नऊ महिन्यापूर्वी संबंधित शिक्षणाधिकारी यांना पत्र लिहिले होते की, या बनावट सह्या आहेत. तातडीने या प्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर करावा. त्याचा अहवाल अद्यापही सादर केलेला नाही. हे दोन्ही प्रश्न बरोबर आहेत असे मला शासनाच्यावतीने माननीय मंत्र्यांनी कळविलेले आहे. हे प्रकरण शिक्षण विभागानाचे उघडकीस आणले आहे. तेव्हा अशा अधिकाऱ्यांच्या, कर्मचाऱ्यांच्या विरोधात चौकशी करून कोणती कारवाई करण्यात आली आहे ? मला असे उत्तर देण्यात आले आहे की, याबाबत चौकशी करण्याबाबत शिक्षणाधिकारी, प्राथमिक यांना कळविलेले आहे. प्रश्न ठाणे जिल्ह्यातील प्राथमिक विभागाचा आहे आणि चौकशी करण्याचे आदेश प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकाऱ्याला दिलेले आहेत. म्हणजे चोर,चोर मौसेरे भाई असे व्हायचे. हे प्रकरण फार गंभीर आहे. It is a tip of iceberg. गेल्या अनेक वर्षापासून या विभागात गैरप्रकार होत आहेत. ठाण्याच्या शिक्षण विभागात प्रस्ताव घेण्यासाठी पैसे घेतले जात आहेत. आठ-आठ महिने प्रस्ताव पाठविले जात नाहीत. तेव्हा या सगळ्या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. नऊ महिने चौकशी झाली नाही. शिक्षणाधिकारी म्हणतात मी नवीन आहे. पण मी दोन महिन्यापूर्वी येथे प्रश्न सादर करयापूर्वी संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांना उप शिक्षण संचालकांनी मला दिलेली कागदपत्रे त्यांच्याकडे देऊन सांगितले की, चौकशी करून मला काही तरी कळवावे. त्यांनी अद्याप पर्यंत मला काहीही कळविलेले नाही. त्यामुळे शिक्षणाधिकारी कार्यालयातील कर्मचारी, अधिकारी यांची चौकशी त्यांनी करता कामा नये. या गंभीर प्रकरणाची आयुक्त किंवा कलेक्टर यांच्या मार्फत तसेच गेल्या 2-3 वर्षापासून आता पर्यंतच्या सर्व प्रकरणांची चौकशी करण्याचे आश्वासन मला मंत्री महोदय देणार आहेत काय ?

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते सरांनी मांडलेला प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. मी हा चौकशी अहवाल पूर्ण का मानला नाही ? वरकरणी ज्या अधिकाऱ्या मार्फत केल्याचे दिसते त्याच्या पेक्षा त्याच्या हाता खालचे बरेच काही करीत आहेत. एकावर कारवाई झाली की, बाकीचे सगळे सुटतात. सध्या मी मंत्रालयात असा अनुभव घेत आहे की, अशा चौकशा नेमल्या की निवृत्तीला चार महिने असताना त्यासंबंधीचे अहवाल येतात. असे अहवाल पोस्ट-पोन करण्यासंबंधात मंत्रालयामध्ये एक मोठे रॅकेट चालते आहे. जेथे चुकीचे चालले आहे त्यावर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न आपण सर्व लोकप्रतिनिधींनी किंवा सामान्य नागरीकांनी आर.टी.आय.च्या माध्यमातून केला पाहिजे. हे शिक्षण विभागातच नव्हे तर वेगवेगळ्या विभागात वर्षानुवर्षे सुरू आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते सरांचे स्वागत करतो. या प्रकरणी जो जो गुंतलेला असेल मग तो मदत करणारा असेल, अहवाल लांबविणारा असेल अशांवर कडक कारवाई करण्यासाठी बाहेरील विभागातील उच्च अधिकाऱ्याची नियुक्ती करून पुढील दोन महिन्याच्या आत चौकशी पूर्ण करण्यात येईल आणि या सर्व प्रकरणातील जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, हा प्रश्न खऱ्या अर्थाने गंभीर आहे. आपण म्हणाल्या प्रमाणे It is a tip of iceberg. यात माननीय मंत्र्यांचा प्रथमदर्शी प्रामाणिकपणा दिसत आहे. परंतु, आपल्या उत्तरातच अहवालाचा संदर्भ देऊन एक गोष्ट मान्य केली आहे की, अशा प्रकारच्या घटना घडलेल्या आहेत. कदाचित त्या घटनेमध्ये खूप जण सहभागी असतील. त्यांची आपल्याला चौकशी करावी लागेल. त्यांची चौकशी आपण करू शकता. पण जे नजरेस आलेले आहेत त्यांच्यावर आपण तात्काळ कारवाई केली पाहिजे. तरच एक प्रकारचा मेसेज जाईल. आपण म्हणता ते खरे आहे. आताच ज्येष्ठ सन्माननीय सदस्य 'टाईम बाऊंड' म्हणजे 'रिटायर्ड होण्यास दोन महिने असेपर्यंत' असे म्हणाले. तेव्हा असा टाईम बाऊंड राहता कामा नये. आपण दोन महिन्याचा कालावधी दिला आहे तो दोन महिनेच ठेवावा. ज्यांच्या बाबतीत अहवालात प्रथमदर्शनी दोष



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.8067....

आढळून येतील त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी व बाकीच्यांच्या बाबतीत अहवाल तयार करावेत आणि मग उरलेले मासे गाळाला लावावेत त्याला हरकत काय आहे ? अहवालानुसार आपल्या निदर्शनास आले काय, त्यास होय असे उत्तर दिलेले आहेत. जे आपल्या नजरेस आले आहेत त्यांना आपण तात्काळ निलंबित करावे आणि आपली चौकशी सुरू ठेवावी. तसे आपण करणार आहात काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा उद्देश सफल करावयाचा असेल तर सगळे एकत्र करायला पाहिजे. आपण कोकणातील आहोत. पाण्यात जाळे टाकले आणि एक मासा सापडला व लगेच जाळे काढले तर बाकीचे पळून जातील. तेव्हा या जाळ्यात सगळेच अडकू द्या. मग जाळे काढू या. मग सगळे नीट सापडतील. या कार्यपद्धतीने मी काम करीत आहे.

**सभापती :** श्री.तावडे साहेब डिपार्टमेंटच्या बाहेरचे जाळे वापरा आणि सगळे मासे गळाला लावा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी पक्के कडक जाळे वापरतो.

**सभापती :** ठीक आहे. आता मी पुढील प्रश्न पुकारतो.

.......

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मुंबईतील बोरिवली येथील जेबीसीएन इंटरनॅशनल शाळेतील २४ विद्यार्थ्यांना फी न भरल्याचा शेरा दिल्याने अन्य शाळांनीही प्रवेश नाकारल्याबाबत**

**(7) * ६६६२ श्री.धनंजय मुंडे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सुनिल तटकरे, श्री.विजय गिरकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.किरण पावसकर, श्री.महादेव जानकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्ततःत** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय

(1) मुंबईतील बोरिवली येथील जेबीसीएन इंटरनॅशनल शाळेतील २४ विद्यार्थ्यांना फी न भरल्याचा शेरा दिल्याने अन्य शाळांनीही त्यांना प्रवेश नाकारल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर शाळेतील २४ मुलांना शाळेतून काढून तर टाकलेच पण या मुलांना अन्य शाळेत प्रवेशही मिळु नये अशी व्यवस्था शाळा प्रशासनाने केली असल्याने या मुलांचे भवितव्य अंधारात गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(3) तसेच, सदर प्रकरणात उपरोक्त शाळेकडून इमारतीचे बांधकाम चालू असताना विद्यार्थ्यांकडून प्रवेशासाठी वार्षिक ६८,००० इतकी फी आकारली असून याच इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर इतर विद्यार्थ्यांकडून १,१७,००० रुपये फी आकारण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, या विद्यार्थ्यांच्या पालकांनी शालेय शिक्षण विभागाकडे दाद मागूनही त्यांना न्याय मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(5) असल्यास, उक्त प्रकरणी ाचौकशी करण्यात आली आहे काय,
(6) असल्यास, शासनाने संबंधित शाळेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?
u
**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.
(3) अंशतः खरे आहे.
(4), (5) व (६) याप्रकरणी पालकांशी व व्यवस्थापनाशी चर्चा करण्यात येवून त्याअनुषंगाने शाळा व्यवस्थापनाला सूचना देण्यात आल्या. तदनंतर पालकांनी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. सदर याचिकेमध्ये मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने १२ विद्यार्थ्यांना त्याच शाळेत प्रवेश देण्यात आला आहे.

-----------------

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मुंबईतील बोरिवली येथील जेबीसीएन इंटरनॅशनल शाळेतील 24 विद्यार्थ्यांना फी न भरल्याचा शेरा दिल्याने अन्य शाळांनीही प्रवेश नाकारल्याबाबतचा हा प्रश्न आहे. मला आपल्या माध्यमातून एवढेच विचारावयाचे आहे की, माझ्या 1 व 2 लेखी प्रश्नाला "हे खरे नाही" असे उत्तर दिलेले आहे. पण प्रश्न क्रमांक 3 ला "अंशतः खरे आहे" असे उत्तर करण्यात आले आहे, तर 4, 5 व 6 या प्रश्नाला "उच्च न्यालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने 12 विद्यार्थ्यांना त्याच शाळेत प्रवेश देण्यात आला आहे" असे उत्तर दिले आहे. या सर्व उत्तरावरून असे लक्षात येते की, 24 पैकी 12 विद्यार्थ्यांना न्यायालयाच्या आदेशानुसार प्रवेश देण्यात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.6662....

श्री.धनंजय मुंडे....

आला आहे. याचाच अर्थ माझा पहिला प्रश्न बरोबर विचारला होता. माझा पहिला प्रश्न चुकीचा आहे असे म्हणत आहात तर मग 12 विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश कसा काय दिला आहे ? त्यामुळे माझी या उत्तरालाच हरकत आहे. तेव्हा याबाबत प्रथम माननीय मंत्र्यांनी स्पष्टीकरण द्यावे. या विद्यार्थ्यांना प्रवेश न देण्याचे कारण काय आहे ? विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश नाकारणाऱ्या गंभीर प्रकाराची शासनाने चौकशी केली आहे काय, फी च्या कारणांवरून विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारणाऱ्या या शाळेवर कारवाई करणार आहात काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे साहेबांनी ज्या शाळेसंबंधी प्रश्न विचारला आहे ती शाळा माझ्या मतदार संघातील आहे. या शाळेतील पालकांसमवेत माझ्या पाच बैठका झाल्या. पालक आणि संस्था चालक यांच्या सोबत तीन बैठका झाल्या. या राज्याचा मंत्री म्हणून सुद्धा आणि त्या भागातील आमदार म्हणून सुद्धा आणि पालकमंत्री म्हणून सुद्धा आणि शिक्षणाची कळकळ असणारा मंत्री म्हणून सुद्धा माझ्या बैठका झाल्या. यासंबंधी मी सन्माननीय विरोधी पक्षांना एवढे सांगू इच्छितो की, यात मी सुरूवातीलाच तोडगा काढला होता. या पालकांना मी सुरूवातीलाच आधी फी भरावी असे सांगितले होते. सुरूवातीला 24 मुलांचे पालक कोर्टात गेले होते. सीनिअर के.जी. आणि पहिलीची फी यात पालकांचा गैरसमज झाला होता. शिक्षण शुल्क कायद्यानुसार पहिलीतून दुसरीत जाताना शिक्षण शुल्कामध्ये 15 टक्के वाढ होते. तसे कायद्यातच आहे. सीनिअर के.जी. मधून पहिलीत जाताना किती फी आकरावी हे कायद्यातच नाही. त्यावर ते अडून राहिले होते. ज्या पालकांना पटले त्यांनी प्रवेश घेतले.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.:6662.......

श्री. विनोद तावडे ......

24 विद्यार्थी तयार नसल्यामुळे ते कोर्टात गेले. त्यानंतर कोर्टाने शाळेकडे फी जमा करण्याचे आदेश दिले तसेच शाळेलाही कोर्टाने फी घेण्याचे आदेश दिल्यानंतर 24 विद्यार्थ्यांपैकी 12 मुलांनी त्या शाळेत प्रवेश घेतला व उरलेल्या अन्य विद्यार्थ्यांनी आसपासच्या शाळेमध्ये प्रवेश घेतला.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, प्रश्न क्रमांक 1 व 2 ला मंत्री महोदयांनी "नाही" असे उत्तर दिलेले आहे. नंतर हेच 24 विद्यार्थी कोर्टात गेल्यानंतर त्यातील 12 विद्यार्थ्यांना त्या शाळेत प्रवेश दिला गेला आणि त्यावरच माझी हरकत असल्यामुळे सन्माननीय मंत्र्यांनी त्यासंदर्भातील उत्तर देण्याची आवश्यकता आहे. जर शाळेने असे प्रकारे केले असेल तर सन्माननीय मंत्र्यांनी या शाळेची चौकशी लावावी. शेवटी शाळेपेक्षा मंत्री महोदय त्या भागाचे प्रतिनिधी आहेत. मंत्री महोदयांनी पालकांची तेवढीच काळजी घेणे आवश्यक आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी त्या पालकांची अधिक काळजी घेत असल्यामुळेच अधिकचा वेळ या विषयात दिलेला आहे. 24 विद्यार्थ्यांना फी न भरण्याचा शेरा दिल्यामुळे त्या विद्यार्थ्यांना अन्य शाळेने प्रवेश देण्यास नकार दिला होता. यातील 12 विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला आहे.

**सभापती** : आपल्याला चौकशी पाहिजे असेल तर चौकशी करुन घ्या. आता सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी प्रश्न विचारल्यानंतर प्रश्नोत्तराचा संपेल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, अशा प्रकारच्या अनेक शाळा मुंबई आणि इतर शहरात आहेत. एकूण किती विद्यार्थ्यांनी फी भरली होती ? तिसऱ्या प्रश्नाच्या उत्तरात सांगितले आहे की, "अंशतः खरे आहे". याचा अर्थ फी घेतली आहे असा त्याचा अर्थ होतो. ज्या पालकांची फी भरण्याची अडचण असल्यामुळे ते पालक कोर्टात गेले असणार आणि अशा प्रकारे मनमानी फी घेऊन पालकांची पिळवणूक करणाऱ्या शाळांवर शासनामार्फत कारवाई केली जाणार आहे काय ? शाळेने मनमानी फी आकारणे किंवा डोनेशन घेणाऱ्या शाळेवर सरकार कारवाई करणार आहे काय तसेच फी भरणाऱ्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या किती आहे ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मनमानी फीच्या संदर्भात शिक्षण शुल्क नियंत्रण

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.:6662.......

श्री. विनोद तावडे ......

कायदा अस्तित्वात आलेला असून त्यानुसार कारवाई केली जात असते. डोनेशन तसेच कॅपिटेशन फी च्या संदर्भात सुध्दा कारवाई केली जाते. सुमारे 127 विद्यार्थी आणि पालक या विषयाच्या संदर्भात मला भेटले होते. 24 विद्यार्थी वगळता बाकीच्या विद्यार्थ्यांनी फी भरली होती.

**सभापती :** प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

-----

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:**लेखी उत्तरे

**मु.शी.:** तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे.

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने गुरुवार दिनांक 16 जुलै,2015 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवीत आहे.

**सभापती** : गुरुवार दिनांक 16 जुलै, 2015 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

---

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:**कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाचा सन 2013-14 या वित्तीय वर्षातील योजनेत्तर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, विधानपरिषदेच्या सन 2015 च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात दिनांक 9 मार्च, 2015 ते 10 एप्रिल, 2015 या कालावधीत मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री महोदयांनी विधानपरिषद सभागृहात दिलेल्या एकूण 1033 आश्वासनांची यादी, तसेच सन 2015 च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, पूर्तता करण्यात आलेल्या एकूण 239 आश्वासनांच्या पूर्ततेसंबंधीच्या विवरणपत्रांची यादी" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** आश्वासनांच्या पूर्ततेसंबंधीच्या विवरणपत्रांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

श्री. चंद्रकांत बावनकुळे (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

(क) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचा सन 2013-2014 या वर्षाचा नववा वार्षिक अहवाल.

(ख) महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांचा सन 2013-2014 या वर्षाचा नववा वार्षिक अहवाल.

(ग) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा सन 2013-2014 या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल.

**सभापती :** वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

---



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

**<u>शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात</u>**

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, काल आपले ठरल्याप्रमाणे शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची चर्चा आपल्याला कंटीन्यू ठेवायची असून बाकीचा कोणताही विषय किंवा लेईंग घेतले तर नियम 260 च्या प्रस्तावाचे गांभीर्य निघून जाईल. आज शुक्रवार असल्यामुळे हा विषय आजच्या आज संपला पाहिजे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीला प्रथम प्राधान्य दिले जावे व त्या शिवाय दुसरा कोणताही विषय चर्चेला घेतला जाऊ नये अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**सभापती :** माझ्या दालनात जी चर्चा होते त्या चेर्चवर सभागृहात चर्चा केली जात नाही. माझ्या दालनात आज जी चर्चा झाली होती त्या चर्चेच्या वेळेस आपण उपस्थित नव्हता. परंतु तेथे एक सहमती झाली होती की, औचित्य व विशेष उल्लेख घेऊन नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाला सुरुवात केली जाणार आहे. माझ्या दालनातील बैठकीमध्ये आज विधेयके सुध्दा घ्यावयाची आहेत असे ठरले होते. त्यामुळे पाच मिनिटात हे सर्व उरकून टाकू.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, कर्जमाफीच्या संदर्भात दोन्ही सदनात साडेतीन दिवस गोंधळ झाला होता. आपले सदन तर सलग तीन दिवस बंद होते. हा विषय अतिशय गंभीर असून सत्ताधारी व विरोधी पक्षाचे दोन्ही प्रस्ताव आपण एकत्रित केलेले आहेत. या प्रस्तावावर गांभीर्याने चर्चा व्हावी व ही चर्चा झाल्यानंतर सभागृह संपण्याच्या अगोदर 10 मिनिटांमध्ये बाकीचे कामकाज घेण्याबद्दल आमची काही अडचण नाही. परंतु कर्जमाफीच्या संदर्भातील चर्चा अगोदर सुरु करावी अशी विनंती आहे.

**सभापती :** आता आपण जे काही सूचवित आहात त्यानुसार नियम 260 च्या प्रस्तावाला सुरुवात करण्यात येईल व शेवटच्या 10 मिनिटात ठरल्या प्रमाणे कामकाज करुन टाकू. आता नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाची सुरुवात सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी करावी.

---

...6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मुस्लीम आरक्षणाच्या अशासकीय विधेयकाबाबत**

श्री. शरद रणपिसे : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या मुद्यावर बोलण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, मागच्या अधिवेशनामध्ये मुस्लीम आरक्षणाचे विधेयक लॅप्स होऊ नये म्हणून मी अशासकीय विधेयक आणले होते. रात्री जवळ जवळ 9.30 वाजेपर्यंत मी या सभागृहात बसलो होतो. परंतु सत्ताधारी पक्षाने गोंधळ घालून मुस्लीम आरक्षणाचे विधेयक लॅप्स केले.माझा मुद्दा असा आहे की, नियम 260 चा प्रस्ताव महत्वाचा आहे. परंतु माझे जे मुस्लीम आरक्षणाचे अशासकीय बील आहे ते कमीत कमी पुर:स्थापनाला तरी घ्या.

**सभापती :** माननीय रणपिसे साहेब आपले ठरल्याप्रमाणे आजच्या शेवटच्या 10-15 मिनिटात आपले अशासकीय विधेयक निश्चितपणे पुर:स्थापन केले जाईल एवढे मी आपल्याला आश्वासन देतो. आता नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाच्या चर्चेला सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित हे सुरुवात करतील.

-----------

...7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने भूजल पातळीत कमालीची घट होऊन दुबार पेरणीचे निर्माण झालेले संकट

**मु.शी.:** राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने भूजल पातळीत कमालीची घट होऊन दुबार पेरणीचे निर्माण झालेले संकट या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, अमरसिंह पंडित, संजय दत्त, हेमंत टकले, भाई जगताप, जयंतवराव जाधव, जयंत पाटील, शरद रणपिसे, कपिल पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु.......

श्री.अमरसिंह पंडित(विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 260 अन्वयेच्या अतिशय महत्वाच्च्या प्रस्तावावर मला माझे मत मांडण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो.

नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव वाचत असताना सत्ताधारी आणि विरोधी पक्षाचा प्रस्ताव क्लब करण्याची माहिती सत्ताधारी पक्षाकडून दिली गेली व मला आश्चर्य वाटले की, सत्ताधारी पक्षाचा जो नियम 260 चा प्रस्ताव आहे त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर, सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे,सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते,सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस तसेच सन्माननीय सदस्य श्री. नागो गाणार यांची नावे दिली गेली. भारतीय जनता पक्षातील शेतकऱ्यांचे नेते म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते, ते माननीय श्री.भाऊसाहेब फुंडकर यांचे नाव प्रस्तावात नव्हते की, वगळले गेले याचे आम्हाला आश्चर्य वाटते.

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित.....

या प्रस्तावामध्ये त्यांचे नाव नसावे यापेक्षा दुसरे दुर्दैव काय आहे ? शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर बोलणार आहेत. मी त्यांचे भाषण ऐकणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.नागो गाणार हे शिक्षकांचे प्रतिनिधी आहेत ते शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर काय बोलणार आहेत, त्यांचे भाषण देखील मी ऐकणार आहे. तसेच सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते हे शिक्षक मतदार संघाचे नेते आहेत, त्यांचे नाव या प्रस्तावामध्ये आहे, परंतु ज्येष्ठ सन्माननीय सदस्य भाऊसाहेब फुंडकर यांचे नाव का वगळले ? हा त्यांचा विषय आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांची कर्जमाफी, शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या, एमआरईजीसमधील कामे, असे अनेक विषय या प्रस्तावामध्ये आहेत.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आपण नियम 260 अन्वये शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या विषयावर येथे चर्चा करीत आहोत. सभागृहाचे नेते आणि मदत व पुनर्वसन मंत्री येथे उपस्थित नाहीत. मदत व पुनर्वसन विभागाचे राज्यमंत्री देखील सभागृहात उपस्थित नाहीत, मग आम्ही सभागृहात चर्चा कशी करायची ? सभागृहात अतिशय गंभीर विषयावर चर्चा सुरु आहे. या प्रश्नावर विरोधी पक्षाचे सदस्य अतिशय तळमळीने मुद्दे मांडत आहेत आणि सरकार आमची चर्चा ऐकण्यास देखील तयार नाही. सरकाच्या बाजूने मदत आणि पुनर्वसन विभागाशी संबंधित कोणीही मंत्री येथे उपस्थित नाहीत, हे बरोबर नाही. आज तडफडत असणाऱ्या शेतकऱ्यांच्या बाबतीत सरकारला काही देणेघेणे नाही, असा याचा अर्थ होतो. माझी आपणास विनंती आहे की, संबंधित विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित होईपर्यंत सभागृह स्थगित करावे.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, विधानसभा सभागृहात लक्षवेधी सूचना सुरु आहे. मी सभागृहाचा उपनेता आहे. मी कालपासून ही सर्व चर्चा ऐकत आहे. सन्माननीय सदस्य जे काही बोलले ते मी जसेच्या तसे मांडू शकतो इतक्या गांभीर्याने मी ही चर्चा ऐकत आहे. सभागृहाने व्यक्त केलेल्या भावना सभागृहाच्या नेत्यांकडे नव्हे तर मुख्यमंत्री महोदयांकडे मी पोहोचवितो.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, या सभागृहात मागील चार दिवसांपासून गांभीर्याने चर्चा सुरु आहे. माननीय मुख्यमंत्री फक्त पहिल्या दिवशी शोक प्रस्तावाच्या वेळी आले आणि नंतर निघून गेले. चार दिवस कोणी आले नाही. खरे म्हणजे या गंभीर विषयावर चर्चा सुरु होत असताना चर्चेच्या सुरुवातीला माननीय मुख्यमंत्र्यांनी उपस्थित राहणे आवश्यक होते. पण ते उपस्थित राहिले नाहीत. तसेच अधिकारी गॅलरीमध्ये संबंधित विभागाचे सचिव देखील उपस्थित दिसत नाहीत. आपण त्यांना अदृश्य म्हणत असलो तरी सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची ते नोंद घेत असतात. माननीय मंत्री श्री.चंद्रकांत पाटील हे निश्चितपणे गांभीर्याने विचार करीत आहेत. या प्रश्नावर काय करावे यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु सदन म्हणून माननीय मुख्यमंत्री तसेच विभागाच्या सचिवांची काही जबाबदारी आहे की नाही ? अधिकारी गॅलरीमध्ये अधिकाऱ्यांनी उपस्थित असणे आवश्यक आहे.

**सभापती** : अधिकारी गॅलरीमध्ये एकाही विभागाचे सचिव दिसत नाहीत.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सभागृहात संबंधित विभागाचे एकही मंत्री उपस्थित नाहीत. आम्हाला माननीय मंत्री श्री.चंद्रकांत पाटील यांच्याबद्दल आदर आहे. परंतु प्रथा आणि परंपरेनुसार...

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षाच्या सदस्यांकडून मांडलेला प्रत्येक मुद्दा मी लिहून घेत आहे. मी या विषया संदर्भात कालही आणि आजही मुख्यमंत्री महोदयांशी बोलत आहे. या प्रश्नावर काही ना काही सोल्यूशन काढण्याचा प्रयत्न आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी हा प्रतिष्ठेचा प्रश्न करु नये. विधानसभा सभागृहातील लक्षवेधी सूचना संपल्यानंतर मंत्री महोदय येथे उपस्थित होतील.

**सभापती** : मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, मी देखील मंत्री म्हणून बरीच वर्षे काम केलेले आहे. अधिकारी गॅलरीमध्ये संबंधित विभागाचे सचिव उपस्थित असले पाहिजेत आणि ती आवश्यक बाब आहे, असे माझे स्वत:चे मत आहे. कारण सन्माननीय सदस्यांकडून काही मागणी झाली, ती मागणी धोरणात्मक बदलाची असेल किंवा अत्यावश्यक असेल आणि त्याचे ब्रिफिंग मंत्री महोदयांना झाले नसेल तर त्यांनी तेथून माहिती पुरवावी, ही परंपरा गेली कित्येक

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती......**

वर्षे आपण येथे पाहत आहोत. विधानसभा सभागृहात लक्षवेधी सूचना सुरु असेल आणि त्यामुळे सभागृहाच्या नेत्यांना येथे उपस्थित राहता येत नसेल किंवा मुख्यमंत्री महोदयांना येथे उपस्थित राहता येत नसेल तर संबंधित विभागाच्या राज्यमंत्री महोदयांनी येथे उपस्थित रहावे आणि या गोष्टीसाठी मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.25 ते 1.40 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.बोर्डे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती प्रा.जनार्दन चांदूरकर)**

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सभागृहाचे नेते सन्माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे हे सभागृहात आल्यामुळे मी त्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, दुष्काळ केवळ मराठवाड्यातच आहे असे नाही तर, संपूर्ण महाराष्ट्राला या दुष्काळाने ग्रासलेले आहे. शिवाय मराठवाड्यासाठी दुष्काळ नवीन नाही. गेले तीन वर्षे मराठवाडा दुष्काळाला सामोरा गेला आहे. आता चौथ्यांदा दुष्काळ पडला आहे. मराठवाड्यात पाऊस न पडल्यामुळे दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. परंतु शेतकऱ्यांमध्ये दुबार पेरणी करण्याची ऐपत राहिली नाही. शासनाने शेतकऱ्यांना दुबार पेरणीसाठी मदत करण्याचे ठरविले तरी, दुबार पेरणीने मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या परिस्थितीत फारसा काही फरक पडेल असे वाटत नाही. विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्षाने नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावातील विषय थोड्याफार प्रमाणात सारखाच असल्यामुळे ते दोन्ही प्रस्ताव क्लब करण्यात आले आहेत. या प्रस्तावांमध्ये शेतकरी आत्महत्या, एमआरईजीएसची कामे, पीक विमा योजना, जलयुक्त शिवार अभियान इत्यादी अनेक विषय आहेत. त्यामुळे मी प्रत्येक विषयावर दोन-दोन मिनिटे माझे विचार मांडणार आहे.

सभापती महोदय, शेतकरी आत्महत्यांच्या बाबतीत सांगू इच्छितो की, मराठवाड्यामध्ये जानेवारी ते जून-2015 या सहा महिन्यांच्या कालावधीत एकूण 513 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यातील सर्वाधिक म्हणजे 125 आत्महत्या एकट्या बीड जिल्ह्यातील आहेत. मी सरकारला विचारु इच्छितो की, शेतकऱ्यांवर अशा प्रकारे आत्महत्या करण्याची वेळ का येते, किंबहुना अशा प्रकारची परिस्थिती निर्माण का होते ?

सभापती महोदय, मला आठवते की, मागच्या अधिवेशनात दुष्काळ आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या बाबतीत सभागृहात प्रस्तावाच्या माध्यमातून चर्चा झाली होती. त्यावेळी सभागृहाचे नेते माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी सांगितले होते की, आपण सर्व पर्याय करुन बघितले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या वारंवार होणाऱ्या आत्महत्या थांबविण्यासाठी अजून वेगळे काय करता

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

येईल ? माझे त्यावेळी तेच उत्तर होते आणि आजही ते उत्तर आहे. विद्यमान सरकारने शेती

..2..



श्री.अमरसिंह पंडित....

मालाच्या संदर्भातील धोरण बदलविल्याशिवाय शेती मालाचे भाव वाढणार नाहीत. तसेच दुसरी बाब म्हणजे जोपर्यंत मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या नशिबी शाश्वत शेती येत नाही तोपर्यंत हे चित्र बदलूच शकत नाही.

सभापती महोदय, 2012-13 या वर्षात कापसाला प्रती क्विंटल 6800 ते 7200 रुपये भाव होता. साधारणत: तीन महिने हा भाव मिळाला. त्यानंतर तो भाव 5500-6000 रुपयापर्यंत खाली आला. आजच्या घडीला त्याच कापसाचा भाव केवळ 3700-3800 रुपये आहे. शिवाय त्याला रोखीचा भाव मिळत नाही. कापूस वेचणीला प्रती क्विंटल 5 रुपये मजुरी द्यावी लागते. परंतु 5 रुपयात वेचणीला मजूर येत नाही. कारण पूर्वी एकरी 10-12 क्विंटल कापसाचे उत्पादन येत होते, ड्रीपवरील शेतीमध्ये एकरी 24 क्विंटल कापसाचे उत्पादन येत होते. परंतु आज त्या ठिकाणी एकरी 50 ते 70 किलो कापूस येत आहे. जर कापसाची 10 क्विंटल उत्पादनाप्रमाणे सरासरी काढली आणि 3700-4000 रुपये भाव गृहीत धरला तर शेतकऱ्यांच्या हातात 40,000 रुपये येत होते. परंतु आज शेतीमध्ये एकरी 50-52-60 किलोच्या पलीकडे उत्पादन येत नाही. इतर भागात सुध्दा यापेक्षा वेगळे चित्र असणार नाही. सन्माननीय राज्यमंत्री प्रा.राम शिंदे हे बीड जिल्ह्याच्या नजीक असलेल्या जामखेड येथील आहेत. त्यांना या बाबतची माहिती आहे. शेतीमध्ये 200 रुपये मजुरीप्रमाणे मजूर येतात. 3700 रुपयांचा कापूस ज्यावेळी पदरात पडतो तेव्हा 3000-3200 रुपयांपेक्षा जास्त भाव मिळत नाही. हा भाव शेतकऱ्यांना कसा परवडणार आहे ? 2012-13 मध्ये सोयाबीनचा भाव प्रती क्विंटल 4200 रुपयांपर्यंत गेला होता. परंतु आजच्या घडीला तो भाव 3000-3200 रुपयांपर्यंत आला आहे. पूर्वी साखरेचे दर प्रती क्विंटल 3400 रुपयापर्यंत गेले होते. आज साखरेचा दर 1860 रुपये आहे. सन्माननीय राज्यमंत्री श्री.विजयकुमार देशमुख खाली बसून जे काही बोलत आहेत ते मला ऐकू आले. त्यांचे म्हणणे आहे की, या किंमती आंतरराष्ट्रीय बाजारपेठेवर अवलंबून आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, केंद्र सरकारचे शेती विषयक धोरण जोपर्यंत बदलत नाही, शेतकऱ्यांच्या सोयीचे धोरण जोपर्यंत आणले जात नाही, तोपर्यंत या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

उत्पादकाच्या पदरात काही पडणार नाही. माननीय राज्यमंत्री यांची आपसात कुजबुज सुरु आहे

..3..

17-07-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) R-3

SJB/ MMP/ पूर्वी श्री.अजित.... 13:40

श्री.अमरसिंह पंडित....

की, सरकारने 30 टक्के उत्पादकांचा विचार करावा की 70 टक्के ग्राहकांचा विचार करावा ? मी आपणास सांगतो की, 30 टक्के उत्पादक कोलमडला तर हे सरकार कोलमडायला सुध्दा वेळ लागणार नाही. 70 टक्के असलेल्या ग्राहकांची आणि 30 टक्के उत्पादकांची उत्पादन क्षमता आपण पहावी. खेड्यामध्ये एका हॉटेलमध्ये दीड रूपयांचा चहा घेऊन 5 रूपये किंमतीचे वर्तमानपत्र 100 लोक वाचतात. परंतु शहरी भागातील लोक 25-50 रूपये किंमतीचे टाईम्स ऑफ इंडिया किंवा बिझनेस टाईम्स हे वर्तमानपत्र वाचतात. खेड्यामध्ये दूध उत्पादकांना प्रती लीटर 16-18 रूपये भाव मिळतो. परंतु शहाचे बॉटलमधील पॅकबंद असलेले दूध 85 रूपये लीटरने मिळते. खेड्यातील माणूस 5 रूपयांचा चहा पितो आणि शहरातील ग्राहक 50 रूपयांचा चहा पितो. त्यामुळे उत्पादक आणि ग्राहक या दोन्ही वर्गाची उत्पादन क्षमता आपण पहावी. पाण्याची एक लीटरची बॉटल 20 रूपयाला मिळते आणि एक लीटर दुधाची किंमत केवळ 16 ते 18 रूपये आहे. त्यामुळे या तफावतीचा आपण विचार करणार आहात की नाही ?

सभापती महोदय, पूर्वी ज्वारीचा भाव 2200-2500 रूपयापर्यंत गेला होता. सन्माननीय राज्यमंत्री प्रा.राम शिंदे साहेब, मी आपल्या भागातील खर्डा या गावी अंकुश नावाच्या चेअरमनची ड्रीपची ज्वारी पहावयास गेलो होतो. त्या ज्वारीचा भाव 2400 रूपयांपर्यंत गेला होता. परंतु आज त्याच ज्वारीचा भाव प्रती क्विंटल 1450-1500 रूपयापर्यंत खाली आला आहे.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमरसिंह पंडित ....

मी तुम्हाला दाव्याने सांगतो की, कडबा फेब्रुवारी, मार्च महिन्यामध्ये 2500 रूपयांच्या खाली जाणार नाही. ज्वारी 1450-1500 रूपये आहे. कडबा 2500 रूपयांना चालला आहे. आपणच पहा की, ही तफावत किती झाली आहे. आज बाजारात कडबा येत नाही. आज बाजारात वैरण म्हणून ऊस चालला आहे. ऊसाला पाणी नसल्यामुळे वैरण म्हणून बाजारात ऊस चालला आहे. परंतु हा कडबा फेब्रुवारी, मार्च महिन्यामध्ये 2500 रूपयांना जाईल आणि एप्रिल महिन्यामध्ये 3000 रूपयांपर्यंत जाईल. त्यामुळे आपणाला शेतीचे धोरण बदलावे लागणार आहे. शेतीचे धोरण बदलले नाही तर शेतकऱ्यांच्या पदरात काही तरी पडेल असेही मला वाटत नाही. शेतकऱ्यांना जाचक अटी लावल्या आहेत. त्यामुळे तो आत्महत्या करीत आहे. प्रत्येक वेळी कॅरि-फॉरवर्ड करण्याची बैठक येते. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली या संदर्भात एक समिती गठीत केली आहे. ही समिती महिन्यातून एकदा बैठक घेते. नेमके त्या दिवशी एखाद्या व्हीआयपीचे मूव्हमेंट आले तर बैठक देखील पुढे जाते. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याच्या पात्र कुटुंबाला 2-3 महिने मदत मिळणार नसेल तर त्यांनी काय करायचे ? आपण त्यांना जी मदत करीत आहात ती सुध्दा केल्यासारखी त्या शेतकऱ्याच्या कुटुंबाला वाटत नाही. परवा वृत्तपत्रांत वाचले की, विषारी दारूमुळे मरण पावलेल्या व्यक्तींचा आकडा शंभर पर्यंत गेला. आपण त्या मरण पावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना भरीव मदत करीत आहात आणि त्याच्या कुटुंबियांतील कोणाला तरी नोकरीसुध्दा देणार आहात असेही मी वृत्तपत्रांत वाचले आहे. माझ्याकडे ते वृत्तपत्र आहे. आपण एक लाख रूपयांची मदत करीत आहात. शेतकरी त्रासून, वैतागून गेला आहे आणि आत्महत्या करीत आहे. तो हौसेने आत्महत्या करीत नाही तर त्याच्याकडे दुसरा पर्याय उपलब्ध नाही म्हणून आत्महत्या करीत आहे. परिस्थितीची अपरिहार्यता आहे. विषारी दारू पिऊन मरण पावलेल्यांना परिस्थितीची काय अपरिहार्यता होती ? हौसेने पिण्यासाठी गेले, त्यामध्ये चुकीचे इनग्रेडिएन्ट्स मिसळले होते, ते प्यायले आणि मरण पावले. हे वाईट आहे, ही गोष्टच चुकीची आहे. विषारी दारू पिऊन मरण पावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांची परिस्थिती काय आहे आणि शेतकरी आत्महत्यांना सामोरे जात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमरसिंह पंडित ....

आहेत त्यांच्या कुटुंबियांची परिस्थिती काय आहे हे आपणच पहा. आपण दोघांच्याही कुटुंबियांना 1 लाख रुपये देता. आपल्या भाषणात या संदर्भातील उत्तराची अपेक्षा आहे. आपण 1 लाख रुपयांची मदत देत आहात. परिस्थितीची अपरिहार्यता आहे. शेतकऱ्यांच्या पुढे दुसरे साधन किंवा मार्ग शिल्लक राहिलेला नाही. पर्याय न राहिलेल्या, आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांना देण्यात येणारी मदत दुप्पटीने करणार आहत का, 1 लाख रुपयांऐवजी 2 लाख रुपयांची मदत देणार का ? मला हेच आपल्या उत्तरातून अपेक्षित आहे. मी आपल्याला या संदर्भात विनंती करतो.

सभापती महोदय, मी आता कर्जमाफीच्या संदर्भात बोलत आहे. शासन कर्जमाफीच्या संदर्भात हे शक्य नाही असे म्हणत आहे. मी आजही दैनिक सामनामध्ये वाचले की, माननीय मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे की, कर्जमाफी देणे शक्य नाही. तुमच्या अडचणी असतील त्याबाबत माझे दुमत नाही. माझे माफक 2-3 प्रश्न आहेत. (अडथळा) मी चुकीचे बोलणार नाही. आज दैनिक सामनामध्ये ती बातमी आहे. शेतकरी कर्ज हौसेने घेत नाहीत. 3 वर्षे चालत आले आहे. पुनर्गठण होत नाही. तुम्ही पुनर्गठण करताना सहकारी बँकांना प्रवृत्त करू शकाल, त्यांना आदेशाने बांधून घ्याल. पण आमच्याकडे सहकारी बँका सुरु नाहीत. आमच्याकडे सर्वाधिक कर्ज वितरण करणाऱ्या राष्ट्रीयकृत बँका आहेत. त्यांना तुम्ही दिलेले आदेश लागू होत नाहीत. आम्ही बीएलबीसीच्या बैठकीत पाहतो. डीएलबीसीच्या ....

श्री. चंद्रकांत पाटील (बसून) : 2300 कोटी रुपयांमधील 1500 कोटी रुपयांचे कर्ज राष्ट्रीयकृत बँकेकडून आहे.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, तसे नही. तुम्ही काही ठिकाणचे सांगत आहात. आपण मराठवाड्यातील राष्ट्रीयकृत बँकांचे कर्जाचे पुनर्गठण पाहिले तर दिसेल की, ते 23 टक्क्यांचा आकडा सुध्दा पार करू शकलेले नाही. आपण बीएलबीसीमध्ये पाहत आहोत. डीएलबीसीमध्ये जिल्हाधिकारी यांना बैठक घ्यायला लावली. आम्ही तुमचे एसएलबीसीचे मिनटस मागितले तर त्यामध्ये सुध्दा असे असेल. आम्ही आज वृत्तपत्रांमध्येसुध्दा वाचतो की, आरबीआयचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमरसिंह पंडित ....

गव्हर्नर स्टेटमेंट करू लागले आहेत की, You can't make it mandatory upon these people here, तुम्ही राष्ट्रीयकृत बँकांना बळजबरी कसे करू लागला आहात ? पुनर्गठण झाले नाही तर नव्याने कर्ज मिळण्यासाठी तो पात्र ठरत नाही. त्यामुळे या संदर्भातील सुध्दा निर्णय घेणे गरजेचे आहे. बीडमधील परिस्थिती वेगळी आहे. मला आपल्याकडे नम्रपणे एक मुद्दा मांडावयाचा आहे. ॲक्सिस, आयसीआयसीआय, एचडीएफसी, बँक आहे. आता बँक ऑफ इंडिया नव्याने आली आहे. 7-8 बँकांतील शेतकऱ्यांचे डिपॉझिट एकूण 973 कोटी रूपये झाले आहे. पीक कर्ज वितरण 0.72 टक्के आहे, म्हणजे एक टक्का सुध्दा नाही. 900 कोटी रूपये डिपॉझिट म्हणून घ्यायचे आणि महानगरात वितरित करायचे. याला सीडी रेश्यो लागू नाही का, आपण डिपॉझिट घेता तेथे कर्ज वितरण करणार नाही का ? तुम्ही घर बांधायला, गाडी घ्यायला कर्ज देतो असे म्हणता. पण ज्या शेतकऱ्यांनी पैसे ठेवले आहे, त्यांना कर्ज नाही का ? ॲक्सिस बँकेमध्ये बऱ्यापैकी व्याज मिळते. अर्ध्या टक्क्याच्या लालसेने पैसे ठेवतात. मात्र डिपॉझिटला पावणे नऊ टक्के व्याज दिले जाते. तुमच्याकडे पीक कर्ज मागतो, तेव्हा माझ्या पीक कर्जाला इंटरेस्ट सबवेंशन क्लॉज लागू नाही असे सांगता. केंद्र शासनाला इंटरेस्ट सबवेंशन क्लॉज लागू नाही आणि त्यामुळे शेतकऱ्यांना देण्यात येणारे कर्ज 14 टक्क्यांनी मिळते. मी माझे पैसे साडे अकरा-बारा महिन्यांत भरले तरी मला इंटरेस्ट सबवेंशन क्लॉज लागू नाही. शेतकऱ्यांना शून्य, 2-3 टक्क्यांनी कर्ज द्यायचे आहे. शेतकरी कापसाचे, ऊसाचे, भूईमुगाचे, साखरेचे पैसे भरतात, त्यांना आपण पावणे-नऊ टक्के व्याज देता आणि कर्ज साडे चौदा टक्क्यांनी देता. कारण इंटरेस्ट सबवेंशन क्लॉज खाजगी बँकांना लागू होत नाही. सदर बाबतीत धाडसी निर्णय घेऊन सभागृहाचा ठराव करून मायबाप सरकारला कळवावा. जो शेतकरी पैसे भरतो, पीक कर्ज देताना इंटरेस्ट सबवेंशन क्लॉज त्याला सुध्दा लागू करावा. पंजाबराव देशमुख व्याज दर अनुदान सवलत योजनेतील व्याजाची सूट मिळून जर तो 11-12 महिन्यांच्या आत पैसे भरतो तर त्याला शून्य टक्के व्याजदराने पैसे मिळाले पाहिजेत, कर्ज मिळाले पाहिजे. आपला या संदर्भातील निर्णय उत्तराच्या भाषणातून अपेक्षित आहे. मी काल सभागृह स्थगित

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

17-07-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) S.4

MSK/ MMP/ पूर्वी श्री. बोर्डे 13:50

श्री. अमरसिंह पंडित ....

होताना दादांना म्हटले होते की, पीक कर्जाच्या संदर्भातील निर्णय करावा. मी नम्रपणे विनंती करतो. उद्या जर पीक कर्जाच्या हप्त्यांचे व्याज पुनर्गठण करणार असाल तर शेतकऱ्यांना मदत होऊ शकणार नाही. कारण असे की, एमटीओचे कर्ज त्याच्या सात-बारावर शिल्लक दिसते. बँकेचे बेबाग पुनर्गठण केल्यानंतर सुध्दा निघणार नाही. कारण त्यावर त्याचे एमटीओचे कर्ज दिसते. तुम्ही काल म्हणालात की, तुम्ही घर कर्ज म्हणाल, पण तसे नाही. मी नम्रपणे विनंती करतो. विहीर मोटार, पाईपलाईन, शेतजमीन दुरूस्त करणे, चढ उतार असलेली जमीन दुरूस्त करणे यासाठी दिलेले एमटीओचे कर्ज पुनर्गठणामध्ये घ्यावे. आपण एमटीओच्या कर्जाचे पुनर्गठण केले नाही तर तो शेतकरी कर्ज घेण्यासाठी पात्र होणार नाही. ही परिस्थिती सर्वांकडे सारखीच आहे. आपण एमटीओच्या संदर्भात सुध्दा तो निर्णय घ्यावा अशी मी विनंती करीत आहे.

सभापती महोदय, आता मी जलयुक्त शिवाराच्या संदर्भात सांगत आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी माहे जून महिन्यात औरंगाबादला बैठक घेतली आणि त्यामध्ये 10,678 कामे प्रगतीपथावर असल्याचे सांगितले. मराठवाड्यातील 92 गावांत कामेच सुरू झालेली नसल्याचा धक्कादायक अहवालही त्याच बैठकीत तुमच्यासमोर आला.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित.......

ही प्रशासकीय स्तरावरील उदासीनता आहे. प्रत्यक्षात बीड जिल्ह्यात 300 सिमेंट बंधाऱ्यांच्या कामांना आपण मंजुरी दिली. त्यापैकी आजतागायत 145 कामे सुरु होऊ शकली. अन्य कामांबाबत काय अडचण आली, माहीत नाही. पण अशीच उदासीनता असेल तर आपल्याला काम करणे अतिशय अवघड होऊन बसेल. बीड जिल्ह्यातील शासन एवढे गतिशील झाले आहे की, बीड जिल्ह्यातील काही उदाहरणे मी कामासहीत आपल्याला देऊ शकेन. एक अहवाल आपल्याकडे आलेला आहे. बीड तालुक्यातील दिमाखवाडी येथील एक बंधारा 7 जूनला पडलेल्या पावसामध्ये वाहून गेला. वाहुन गेलेल्या बंधाऱ्याचे फोटो काढून ते जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले, तक्रार करण्यात आली. येथे नवीन बंधाऱ्याचे काम सुरु करावे, असे आदेशित करण्यात आले. तो बंधारा बांधून पूर्ण झाला. परंतु, त्या ठिकाणी बंधारा वाहून गेल्याची घटनाच घडली नाही, असा अहवाल तयार करण्यात आला. फोटो देण्यात आले होते, गावकऱ्यांनी तक्रार केलेली आहे, ग्रामसभेमध्ये ठराव करण्यात आला आहे. आता आपण नव्याने जलयुक्त शिवार योजना सुरु केली आहे व त्यामध्ये असे म्हटले आहे की, गावकऱ्यांना, ग्रामस्थांना, ग्रामसभेला विश्वासात घेऊन जलयुक्त शिवारची कामे करावयाची आहेत. कालच्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये त्या गावात भारतीय जनता पक्षाच्या उमेदवाराला 245 मते अधिकची मिळाली आहेत. ही राजकारण करण्याची त्यांची कोणती मानसिकता आहे ? त्या ठिकाणी पिण्याचे पाणी नाही. ते राजकारण कशासाठी करतील ? पण तक्रारच घ्यायची नाही म्हटले आणि तक्रार केली तर त्याला केराची टोपली दाखवायची म्हटले तर त्या ग्रामस्थांसारखे अन्य कोणाचे दुर्दैव असणार नाही. आपण या योजनेमधील बरे काय बोलावे ?

सभापती महोदय, श्री.शरदचंद्र पवार साहेब दिनांक 31 मे, 2015 रोजी बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. बीड जिल्ह्यात प्रवेश करण्यापूर्वी, मला वाटते आम्ही जालना भागातच होतो, माझ्यासमोर गाडीतूनच त्यांनी फोन केला. विरोधी पक्षनेतेही गाडीत होते. मला आज संध्याकाळपर्यंत बीड जिल्ह्यातील मनरेगात आजपर्यंत एकूण किती मॅनडेज दिला आहे, मजुरी किती दिली आहे, ही माहिती कळवावी, असे त्यांनी सांगितले. ही सर्व माहिती घेत असताना, या दुष्काळी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित.......

परिस्थितीला सामोरे जात असताना एवढा प्रखर दुष्काळ की, बीड जिल्ह्यातील जवळपास 95 टक्के गावे 50 पैशांपेक्षा कमी आणेवारीचे आहेत. त्या बीड जिल्ह्यात आपण या पूर्ण दुष्काळात केवळ 29 हजार मंजुरांना कामे देऊ शकलो आहोत. कायदा काय सांगतो ? कायदा असे सांगतो की, मनरेगाची कामे ब्लॉकने मंजूर करावीत. एखाद्या गावाची मागणी आली की, मागणी नोंदविल्यानंतर त्या गटविकास अधिका-याने किंवा तहसीलदाराने त्या गावाला व्हिजिट करुन कामे मंजूर करावीत. आमच्याकडील प्रशासन एवढे मस्तीत आहे, आमच्याकडील उप जिल्हाधिकारी, एमआरईजीएस आणि जिल्हाधिकारी, एमआरईजीएस यांनी "हमें पूछे बगैर कुछ भी नहीं करना है, जो भी करना है वह हमारे पास आयेगा और हमारे पास आने के बाद हम बताएंगे कि काम करना है या नही.", असे तोंडी आदेश दिले आहेत. लेखी पत्र दिले नाही, तोंडी आदेश दिले. तोंडी आदेश दिल्यानंतर बी.डी.ओ.ची, तहसीलदाराची हिंमत होणार आहे का ? अशा प्रतिकूल परिस्थितीत सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या विहिरींची कामे 7 जूनला पाऊस पडल्यानंतर बंद झाली. मी अनेक सन्माननीय सदस्यांच्या भाषणात ऐकतो आहे की, 27 दिवस झाले, 32 दिवस झाले. आमच्याकडे पाऊस पडून आता 45 दिवस होत आलेले आहेत. पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष खूप आहे व ते भविष्यात मोठ्या प्रमाणात जाणवू लागेल. परंतु, 7 जूनला पडलेल्या पावसामुळे शासन दप्तरी अजूनही 'पाऊस काळ', आहे असे समजून "अभी बरसात में हम इसे मंजूरी नहीं देते हैं." असा नकारात्मक दृष्टीकोन या अधिकाऱ्यांचा असेल तर या मागासलेल्या मराठवाड्यात, जो मराठवाडा दुष्काळाने अक्षरशः होरपळून चाललेला आहे, त्याबाबत आपण काही निर्णय करणार आहात की नाही ? त्या भागाला न्याय देण्याच्या हेतूने काही बोलणार आहात का ? वर्तमानपत्रात आम्ही रोज वाचतो आहोत की, विदर्भातील अमूक एक प्रकल्प आम्ही चार महिन्यात पूर्ण करणार आहोत, विदर्भातील मेट्रो प्रकल्प आम्ही तीन वर्षात पूर्ण करणार आहोत. कधी तरी एकदा जिभेवर येऊ द्या की, मराठवाड्यात आम्ही अमूक, अमूक करणार आहोत, मराठवाड्यात तमूक करणार आहोत. मराठवाड्याच्या संदर्भात एका शब्दाने उल्लेख होत नाही. जी चिक्की दिली आहे, ती तरी चांगली द्या.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

17-07-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) T-3

SRR/ MMP/ KTG/ प्रथम श्री.मंगेश..... 14:00

श्री.अमरसिंह पंडित.......

सभापती महोदय, मनरेगाच्या कामांबाबत मी असे म्हणणार नाही की, शासनाचे फेल्युअर आहे. पण आज अतिशय जबाबदारीने सांगेन की, मनरेगाच्या कामांच्या संदर्भात अशीच परिस्थिती राहिली तर निश्चितरित्या डिस्ट्रिक्ट ॲडमिनिस्ट्रेशनचे एक फार मोठे फेल्युअर आहे आणि कालानुरुप ते तुमच्यावर आदळल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, पीक विम्याच्या संदर्भात मी अधिक बोलणार नाही. कारण, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्यांचे मत मांडले आहे. सहकार मंत्री महोदय या ठिकाणी उपस्थित आहेत. मला नम्रपणे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, पीक विम्याचे 251 कोटी रुपये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला आले होते. माझा मुद्दा फक्त एकच आहे. आपण गुंतवणूक करीत असताना सह निबंधक, सहकारी संस्था यांची परवानगी घेत असतो. पण पीक पिम्याचे जिल्हा बँकेला आलेले 251 कोटी रुपये म्युच्युअल फंडात गुंतविण्यात आले. त्याला आपण चिट फंडच म्हणू या. ही जी काही ट्रेडिंग आहे त्याबाबत मला सांगावयाचे आहे की, चिटफंडाच्या ट्रेडिंगमध्ये दिवसभरात रेशिओ कमी-जास्त होत असतो. चुकून जर का अमूक एका चिट फंडाला लॉस आला असता, जे पैसे आपण सह निबंधकांची परवानगी न घेता गुंतविले आहेत, त्या होम ट्रेडिंगमध्ये जर लॉस आला असता तर या शेतकऱ्यांचे 251 कोटी रुपये उद्या 225 किंवा 200 कोटी रुपयांपर्यंत आले असते. याला कोण जबाबदार राहणार होते ? जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाने ठरावही केलेला नाही. सह निबंधकांनी लेखी दिलेले आहे. म्हणून आज अतिशय विनम्रपणे विनंती करतो की, उत्तर देत असताना ज्यांनी विनापरवाना अशा प्रकारच्या गुंतवणुका केलेल्या आहेत आणि शेतक-यांच्या जिवाशी खेळण्याचा त्यांनी जो काही प्रयोग आणि प्रयत्न केलेला आहे, त्या संचालक मंडळावर आपण गुन्हे नोंदविणार आहात का ? आज कोणी धाडस करता कामा नये. उद्या समजा माननीय विरोधी पक्षनेत्यांनी बीडला येऊन प्रेस कॉन्फरन्स घेतली आणि सांगितले की, असे, असे पैसे आपण इन्व्हेस्ट केलेले आहेत. काय लुज टॉक करायचे ? त्याऐवजी सांगा ना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

की, उद्या आम्ही करतो, उद्या त्याचे वाटप करतो, हे करतो. पण "ज्यांनी जिल्हा बँक बुडविलेली

..4....



श्री.अमरसिंह पंडित.......

आहे, त्यांना या जिल्हा बँकेबद्दल बोलायचे काम नाही", असे बोलले जाते. मंत्री महोदयांना मी अतिशय जबाबदारीने सांगतो की, मी त्या बँकेचा चेअरमन होतो. मला अजूनही आश्चर्य वाटते, आजचे विरोधी पक्ष नेते आणि त्यावेळचे त्या सूत गिरणीचे नुकतेच संचालक झाले होते, तीन महिन्याअगोदर, कशामुळे गुंतविले आणि काय केले मला तर अजूनही फार मोठा प्रश्न आहे. आम्ही असलो असतो तर समजू शकलो असतो. कारण, मी त्या जिल्हा बँकेचा चेअरमन होतो. पण आजही जर का मी माझे तोंड उघडले आणि माझ्याकडील त्या फाईल जर दाखविल्या आणि माझ्या मोबाईलमधील त्यावेळच्या क्लिप जर का वाजविल्या तर खरा गुन्हेगार या सभागृहात बाहेर निघेल. सह्या केलेल्या आहेत, सह्या. कोणत्या तोंडाने म्हणायला लागला आहात. आज नव्याने संचालक मंडळाची निवडणूक आली. विरोधी पक्षनेते केवळ एवढेच बोलले की, पीक विम्याचे वितरण करा. म्हणजे तुमच्या बाबतीत आम्ही बोलायचेही नाही. विरोधी पक्षनेते म्हणून आमचे काय काम आहे ? त्यांचे काम काय आहे ? तुम्ही आम्हाला धमकी द्यायला लागला की, तुमच्यावर गुन्हे नोंदवू, तुम्हाला अटक करू. तुमच्यात हिंमत असेल ना तर एकदा करुन दाखवा. ज्या ज्या लोकांनी या वर्तमानपत्रात बातम्या द्यायला लागले आहेत ते मायचे पूत असतील ना तर त्यांनी करुन दाखवावे आणि एकदा या विरोधी पक्ष नेत्यांच्या विरोधात वॉरंट काढा आणि त्यांना अटक करण्याची हिंमत असेल तर तुम्ही दाखवा, तुम्हाला मानले आम्ही. आम्ही शेतकऱ्यांबाबत बोलत आहोत. तुम्हाला त्यामध्ये राजकारण दिसते. केवळ तो पीक विम्याचा पैसा परत वाटा, असे म्हटले. त्यात तुम्हाला राजकारण दिसते. यापेक्षा दुर्दैव काय असू शकते.

सभापती महोदय, एक अतिशय महत्वाचा पीक विम्याच्या संदर्भातील मुद्दा मला मांडावयाचा आहे. या पीक विम्याच्या संदर्भात कापसाची संरक्षित रक्कम सन 2014 ला साधारणपणे 2110 होती.

यानंतर श्री.बोरले....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित..........

त्यावेळी प्रिमियम अमाऊंट 2200 रुपये होती. समजा तुम्हाला पीक विमा मिळाला तर एका हेक्टरसाठी तो 4,010 रुपये मिळत होता. आता ती प्रिमियमची रक्कम 4700 रुपये केलेली आहे. आज प्रिमियमचे 4700 रुपये भरण्यासारखी शेतकऱ्यांची परिस्थिती नाही. आपण एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रिमियम वाढविल्यामुळे ज्या शेतकऱ्यांना प्रिमियम भरावयाचा आहे, ते प्रिमियमची रक्कम भरु शकणार नाहीत. कारण, आपण मोठ्या प्रमाणावर प्रिमियमची रक्कम वाढविली आहे. आपण प्रिमियमची रक्कम 4700 रुपये केलेली आहे आणि त्या शेतकऱ्याला फक्त 4 हजार रुपये देणार आहात ? जो प्रिमियम पूर्वी अल्प भूधारक शेतकऱ्यांसाठी 2200 रुपये होता, तो तुम्ही 4700 रुपये केलेला आहे. परंतु, जी मिळणारी संरक्षित रक्कम आहे ती 4 हजार रुपयांपेक्षा जास्त दिली जात नाही. यावर्षी दुष्काळ पडू शकतो, अशी परिस्थिती आहे. मग अशा प्रतिकूल परिस्थितीत आम्ही प्रिमियम भरावयाचा म्हटले तर ती रक्कम दुप्पट केलेली आहे. आपण जर प्रिमियमची रक्कम दुप्पट केली तर मग संरक्षित रक्कम का दुप्पट केली नाही ? आपण प्रिमियमची रक्कम 4700 रुपये करता, मग संरक्षित रक्कम देखील 10 हजार रुपये करावी. परंतु, आपण तसे करीत नाही.

सभापती महोदय, पीक विमा देताना उंबरठा उत्पन्न काढले जाते. मला हे गणित कळले नाही. मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात याचा उल्लेख करावा, अशी माझी विनंती आहे. आपण तीन वर्षाचे उंबरठा उत्पन्न काढता. आमच्या भागात 50 पैशापेक्षा कमी आणेवारी आहे. मग जेथे पेरलेच नाही, तेथे उगवेल कसे ? पेरले नाही तर, विकले नाही आणि विकले नाही, तर पदरात पडले नाही. मग उंबरठा उत्पन्न कशाचे काढले ? ज्या ठिकाणी 50 पैशापेक्षा कमी आणेवारी आहे ती तहसीलदारांनी तुम्हाला कळविली आहे. उंबरठा उत्पन्न काढलेले आहे. पीक विम्याची जी आकडेवारी आलेली आहे ती माझ्याकडे आहे. ती आडेवारी आश्चर्यकारक आहे. ज्या भागात, गावात शंभर टक्के पेरणी झालेली नाही त्या भागातील कापसाचे नुकसान 12 टक्के, 14 टक्के, 16 टक्के, 29 टक्के दाखविले आहे. मग पेरलेच नाही तर 12 आणि 14 टक्के नुकसान कसे काय आले ? एका महसूल मंडळात 12 टक्के आणि 14 टक्के नुकसान दाखविले आहे. मग

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित..........

जेथे पेरलेच नाही, तेथे 12 टक्के आणि 14 टक्के नुकसान कोठून झाले ? या कॉलममध्ये तसे नमूद केलेले आहे. आम्ही साधारणत: 150 टक्के प्रिमियम भरलेला आहे. समजा आमची प्रिमियम अमाऊंट 1 रुपया असेल तर आम्ही 1.5 रुपया प्रिमियम भरलेला आहे. म्हणजे, आम्ही 150 टक्के प्रिमियम भरलेला आहे. परंतु, तुमचे 12 टक्के नुकसान झाले असे म्हणून आम्हाला बाजूला सारण्यात आले. आमच्याकडे तहसीलदारांचे प्रमाणपत्र आहे, उंबरठा उत्पन्न आहे. तिन्ही वर्षाचे प्रमाणपत्र तहसीलदारांनी, कृषी अधिकाऱ्यांनी दिलेले आहे. परंतु, दाद ना फिर्याद, मग मायबाप सरकारला, इन्शूरन्स कंपनीला कोणी बोलावे ? जेथे पोट आणि पाठ एक झालेली आहे, आमच्या अंगात दाद मागण्याची क्षमता राहिलेली नाही, मग आम्ही दाद, फिर्याद कोणाकडे मागावी. ही पद्धत काय आहे, याचे सूत्र काय आहे, हे आपण आम्हाला एकदा जरूर समजावून सांगावे.

सभापती महोदय, आपण इन्शूरन्स काढतो. जनरल इन्शूरन्स, लाईफ इन्शूरन्स आहे. आपण मोटर सायकलचा इन्शूरन्स काढतो. समजा 1 हजार रुपये प्रिमियम असेल तर आपण त्याचे डेप्रिसिएशन काऊन्ट करतो. काही रबर पार्टस इन्शुअर्ड नसतात. परंतु, आपल्याला मोटर सायकलचा अपघात झाल्यानंतर हे कळते. इन्शूरन्स कंपनीवाले सांगतात की, अमूक रबर पार्टस इन्शुअर्ड नाहीत. ते त्यामध्ये गृहीत धरलेले नाहीत. मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटते की, हे सर्व सामान्य लोकांना कळते, तर मग इन्शूरन्स कंपनीने कोठे अकलेचे तारे तोडले हे देवच जाणो. आम्हाला आता सांगितले जाते की, अमूक महसूल मंडळात तूर पिकासाठी विमा लागू होत नाही. अमूक महसूल मंडळात मूग पिकासाठी विमा लागू होत नाही. अमूक महसूल मंडळात तिळ पिकासाठी विमा लागू होत नाही. अमूक महसूल मंडळात सोयाबीन पिकासाठी विमा लागू होत नाही. दादा, आपण पीक विम्याचा हप्ता भरतो. आपण तलाठ्याकडे जातो आणि पेरा लिहून घेतो. तेथे गेल्यानंतर तो सांगतो की, तुम्हाला काय काय करावयाचे आहे ? त्यावेळी तुमच्या महसूल मंडळात कापूस, तूर, मूग, तिळ पीक नाही. त्याचा प्रिमियम भरु नका, असे त्यावेळी कोणी सांगतले काय ? आमच्याकडून सरसकट प्रिमियम घेतला आणि आता या कॉलममध्ये नमूद केलेले आहे की, महसूल मंडळात तूर पिकाचा विमा लागू नाही. तुम्हाला तूर पिकाची नुकसान भरपाई मिळणार



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित..........

नाही. धनराई भागात मूग पिकाची नुकसान भरपाई मिळणार नाही. तलवाडा, जातेगाव भागात अमूक पिकाची नुकसान भरपाई मिळणार नाही. पाचेगाव भागात सोयाबीन पिकाची नुकसान भरपाई मिळणार नाही. मग तुम्ही आमच्याकडून प्रिमियम कशासाठी घेतला आणि तो देखील दुष्काळी परिस्थितीत ? तुम्ही या बखाडीमध्ये आमच्या खिशातून पैसे काढून घेतले आणि ते पैसे घेतल्यानंतर आज तुम्ही सांगत आहात की, अमूक पिकाच्या संदर्भात हे लागू होत नाही, ते लागू होत नाही. आमच्याकडून मोठ्या प्रमाणावर प्रिमियम घेतलेला आहे. एका जिल्हापरिषदेच्या महसूल मंडळातील जे शेतकरी पात्र होणारे आहेत त्यांना साधारणत: 2 कोटी 10 लाख रुपये तूर पिकाची नुकसान भरपाई मिळावयास पाहिजे होती. त्यांच्याऊन 36 लाख रुपये प्रिमियम घेतलेला आहे आणि आता त्यांना स्पष्टपणे सांगण्यात आले की, आम्ही तुम्हाला तूर पिकाची नुकसान भरपाई देऊ शकत नाही. हे सूत्र तुम्ही बदलू शकणार नाही ? शेतकऱ्यांच्या खिशातून पैसे काढणे एवढे सोपे वाटत आहे ? प्रिमियम भरलेला आहे. मग आता प्रिमियमची रक्कम कोणाकडे मागावयाची ? नुकसान भरपाई मिळण्याचा तर विषयच नाही. परंतु, प्रिमियमची रक्कम देखील गेली आणि नुकसान भरपाई देताना तुम्ही कोणते सूत्र वापरले ? तीन वर्षाची सरासरी काढून उंबरठा उत्पन्न काढले जाते. परंतु, पेरणीच झालेली नाही. तहसीलदार, कृषी अधिकाऱ्यांनी सांगितले की, पेरणी झालेली नाही. माननीय कृषी राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, परवा माननीय केंद्रीय मंत्री श्री.अरुण जेटली साहेबांचे एका कॉन्फरन्सच्या निमित्ताने स्टेटमेंट आले होते की, आम्ही पीक विम्याच्या संदर्भात नवीन ड्राफ्ट तयार करीत आहोत. यदाकदाचित पीक विम्याच्या संदर्भात नवीन ड्राफ्ट तयार होणार असेल तर आपण शेतऱ्यांच्या हिताचा ड्राफ्ट तयार करावा. फुकट कोणालाही देऊ नका. परंतु, तुम्ही आमच्याकडून प्रिमियमची रक्कम घेता आणि नुकसान भरपाई मात्र देत नाही. तुम्ही आम्हाला जी नुकसान भरपाई देता त्याबाबत कोणतीही दाद-फिर्याद नाही, कोणताही फोरम नाही. पीक विमा कंपनीच्या संदर्भात चुकीच्या पद्धती किंवा चुकीचे निर्णय झाल्यानंतर शेतकऱ्यांनी त्यांच्या समोर येऊन दाद, फिर्याद

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित..........

मागावी, असे एक तरी फोरम आहे काय ? असे फोरम कोठेही नाही. कोणी याबाबत निर्णय घेऊ शकत नाही.

सभापती महोदय, या संदर्भातील आकडेवारी किती भयानक असू शकते हे लक्षात यावे यासाठी मी काही आकडेवारी वाचून दाखवितो. त्यावरुन आपल्याला याचा अंदाज येईल. गेवराई तालुक्यात पीक विम्यामध्ये सहभागी झालेले एकूण शेतकरी 93,242 आहेत आणि विम्यासाठी पात्र ठरलेले शेतकरी 57154 आहेत. म्हणजे एकूण शेतकऱ्यांपैकी पात्र शेतकरी निम्मे आहेत. गेवराई तालुक्यातील पीक विम्याची संरक्षित रक्कम 70 कोटी 85 लाख रुपये होती. आम्हाला फक्त 20 कोटी रुपयांचा विमा प्राप्त झालेला आहे आणि आमच्याकडून 3.25 कोटी रुपये विम्याचा हप्ता घेतलेला आहे. तुम्ही आम्हाला विम्यापोटी फक्त 17 कोटी रुपये देत आहात. तुम्ही 57 हजार शेतकऱ्यांना फक्त 17 कोटी रुपये देत आहात. हा निर्णय अजूनही तुम्हाला राजकीय वाटतो ?

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित...

आपण या शेतकऱ्यांना काय देत आहात, हा शेतकरी हवालदील झालेला आहे. त्यामुळे त्याच्यापुढे आत्महत्या करण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय राहिलेला नाही. हीच विम्याची रक्कम घेऊन पुढील विम्याचा हप्ता म्हणून भरावी लागणार आहे. उरलेल्या दोन पाच हजार रुपयांमध्ये वर्षभर जीवनाचा रथ ओढावा अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. हे शासन म्हणते की, 30 टक्के उत्पादक व 70 टक्के ग्राहक आम्हाला सांभाळावयाचे आहेत. 30 टक्के उत्पादकांना कपाळावर घेऊन नाचायचे काय ?....अडथळा.... सन्माननीय मंत्री महोदय श्री.दीपक कांबळे साहेब आपण एकदा बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर या. आपल्या पक्षाला विचारुन या. आपण भडक स्टेटमेंट करीत जाऊ नका नाही तर आपणावर पक्षातर्फे कारवाई हाईल.

सभापती महोदय, मराठवाड्यातील खरीपाचे सन 2014 चे 341.16 कोटी रुपयांचे अनुदान अद्याप वाटप झालेले नाही. विभागीय आयुक्तांनी शासनाकडे मागणी केलेल्या निधीचा हा आकडा आहे. औरंगाबाद 48 कोटी रुपये, जालना 49 कोटी रुपये, परभणी 38 कोटी रुपये, हिंगोली 22 कोटी रुपये, नांदेड 53 कोटी रुपये, बीड 58 कोटी रुपये, लातूर 41 कोटी रुपये व उस्मानाबाद जिल्ह्यासाठी 19 कोटी रुपयाचे अनुदान प्रलंबित आहे, प्रत्यक्षात हा आकडा वाढेल, हा आकडा कमी होण्याचे काहीही चिन्ह दिसत नाहीत.

सभापती महोदय, आमच्या भागात महावितरण कंपनीची परिस्थिती अत्यंत दुर्दैवी झालेली आहे. आमच्या भागात ट्रान्सफार्मर मिळत नाही, नवीन एसआयची कामे होत नाहीत. लाईन पेट्रोलिंकची कामे होत नाहीत, याचे कारण असे आहे की, महावितरणच्या देखभाल व दुरुस्ती हेडसाठी शून्य पैसे आले आहेत. जिल्ह्याचे अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता आणि शाखा अभियंता यांच्याकडून अधिकृत माहिती मिळालेली आहे. शून्य तरतूद असल्यामुळे आमच्या भागात विजेची जोडणी दिली जात नाही. वीज जोडणीची परिस्थिती अत्यंत वाईट झाली आहे. एकट्या बीड जिल्ह्यात 7758 शेतकऱ्यांनी अनामत रक्कम भरुन त्यांना वीज जोडणी मिळालेली नाही. बीड जिल्ह्यातील ही परिस्थिती आहे, महावितरण कंपनीकडील कर्मचाऱ्यांकडून सातत्याने या शेतकऱ्यांना छळण्याचे काम होत आहे. अशा या प्रतिकूल परिस्थितीमध्ये कोणी तरी ट्रान्सफार्मर मागण्यासाठी येतो, त्याचे बील क्लिअर असते, त्या व्यक्तीला देखील सांगण्यात येते की, तुझे एकट्याचे बील

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित...

कसे काय क्लिअर आहे ते आम्ही पाहतो, मग त्या अधिकाऱ्यांना काही तरी चिरिमिरी द्यावी लागते. ही चिरिमिरी नसून एक 100 के.व्ही.चा ट्रान्सफार्मर बसविण्यासाठी आमच्या भागात 30 हजार रुपये घेतले जातात. 20 हजार रुपये दिले तर 63 के.व्ही.चा ट्रान्सफार्मर बसविला जातो. ही मराठवाड्यातील व बीड जिल्ह्याची शोकांतिका आहे. मोठ्या उमेदीने देशातील व महाराष्ट्रातील जनतेने आपणाला विरोधातून सत्तेत बसविले आहे, काही तरी धाडसी निर्णय घेण्याची गरज आहे. खालच्या सभागृहात विद्यमान मुख्यमंत्री माननीय श्री.देवेंद्र फडणवीस विरोधी पक्षात असताना बोलले होते की, शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत, त्याबाबत सदोष मनुष्यवधाचा गुन्हा कलम 302 अन्वये आघाडी सरकारवर दाखल करावा. हे आम्ही गॅलरीत बसून ऐकले आहे. माननीय मंत्री श्री.चंद्रकांत पाटील साहेब आता आपण सांगा की, गुन्हा कोणावर नोंदवायचा ? कलम 302 चा गुन्हा या सरकारमधील कोण-कोणत्या मंत्री महोदयांवर नोंदवावा हे आपण आपल्या उत्तरात सांगावे. मी राजकारण म्हणून हे बोलत नाही. मराठवाड्यात आता अतिशय भयानक परिस्थिती निर्माण झालेली आहे.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर मराठवाड्यातील नसल्यामुळे व त्यांना पुढील काळात लाल दिवा मिळणार म्हणून आज ते हसत आहेत. सन्माननीय सदस्यांनी एकदा मराठवाड्यात यावे. मराठवाड्यातील जनतेला सामारे जाण्याचे सामर्थ आपणामध्ये आहे काय ते आम्हाला पहावयाचे आहे. मराठवाड्यात एमआरईजीएसची कामे होत नाहीत.

महोदय, टँकरची जीपीएस सिस्टीम मी परवा दिवशी चेक केली. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्टेटमेंट आहे, वडवली येथे एक टँकर जिल्हा परिषद अध्यक्षांनी थांबविला होता. त्या टँकरची जीपीएस सिस्टीम चेक केली होती, तो टँकर तेथे बंद पडला होता. तो टँकर वडवली पासून 15 किलोमीटर अंतरावर होता. वडवली तहसीलदार यांना जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांनी विचारले की, अमुक अमुक क्रमाकांचा बायगव्हाण येथील टँकर आता कोठे आहे तो लोकेट करावा. तीन दिवसापासून तो टँकर एकाच ठिकाणी बंद पडला आहे. जीपीएस सिस्टीममध्ये ते दाखवित होते की, हा टँकर बायगव्हाण येथे पाणी उतरवीत आहे. ही कला आपल्याशिवाय कोणीही जमू शकणार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नाही. हे सरकार पारदर्शक कारभार करणार असे सांगितले होते, ई-टेंडर आहे, अमुक आहे, तमुक आहे, ई-टेंडरचे धिंडवडे तुमच्या सरकारने उडविले आहे. यामध्ये मी काही नव्याने

...3...



श्री.अमरसिंह पंडित...

सांगण्याची गरज नाही. हे मॅटर सबज्यडिस असल्यामुळे त्याबाबत मी काही बोलणार नाही. आपल्या सरकारची पारदर्शकता कोठे गेली आहे ? गेवराई तालुक्यात 50 टँकरची लाईन पाणी भरण्यासाठी एकाच ठिकाणी लागली आहे. एका नळाच्या तोटीतून कोठे तरी थोडे फार पाणी पडते. एक टँकर भरण्यासाठी 3 ते 4 तास लागतात, मग 153 टँकर कधी भरतील. 153 फेऱ्या केंव्हा पूर्ण होतील. आता पावसाळ्यात ही परिस्थती निर्माण झाली आहे. आणि पुढील काळात आपणाला कोणत्या परिस्थितीला सामोरे जाण्याची वेळ येईल, याचा विचार न केलेला बरा असे मला वाटते. आज हा विषय नसला तरी तो मी नंतर मांडणार आहे. ही दाहकता किती भयानक आहे, याचा विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, परवाच्या दिवशी एका कर्मचाऱ्यांने ज्या मुलीवर अत्याचार केला त्या मुलीला मी भेटावयास गेलो होतो. ती मुलगी कोठे आहे म्हणून मी त्या मुलीला तिच्या घरी भेटावयास गेलो होतो. धाकपुरी येथे एका सरकारी कर्मचाऱ्याने साडेचार वर्षाच्या मुलीवर अत्याचार केला होता. त्या मुलीला तिचे वडील बोलवित होते मी म्हटले बोलवू नका. ती आल्यावर देखील मी म्हटले तिला नका बोलवू ते मला म्हणाले हे बघा इथे ती मुलगी बसली आहे. अत्यंत छोटीसी मुलगी होती. राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती किती ढासळली आहे हे यावरुन दिसून येते. प्रशासनाचा धाक राहिला नाही, टँकरचे पाणी मिळत नाही, अशा प्रकारचे उद्योग काही लोक करीत असताना सरकार उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. ही सर्व परिस्थिती मी मांडलेली आहे माझ्यावर विश्वास ठेवा. यामध्ये कोणतेही राजकारण किंवा राजकीय हेतूने मी हे मांडलेले नाही. गेल्या 24 वर्षापासून मी एका पंचायत समितीचा कारभार सांभाळित आहे. ग्रामपातळीवर काय होते हे स्वत: आम्ही अनुभवत आहोत.

सभापती महोदय, जायकवाडी धरणातील पाणी शून्य किंवा मायनस झाले आहे, त्यामुळे तेथून पाणी मिळणार नाही. याबाबत कोणत्याही उपाययोजना केल्याचे ऐकिवात येत नाही. अमुक एका धरणातील पाणी राखीव ठेवा, कारण आपणाला अमुक ठिकाणी ते द्यावे लागेल. या सर्व बाबी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आपण अनुभवल्या आहेत, मंत्रिमंडळातील तुमच्या अनेक सहकाऱ्यांनी अनुभवले असेल, गेल्या पाच वर्षात अशा प्रकारचे धाडसी निर्णय होत होते. पहिल्यांदा आपण पिण्याच्या पाण्याच्या संदर्भातील निर्णय करु असे निर्णय होत होते. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी काल

....4...



श्री.अमरसिंह पंडित...

भाषण केले. त्यांनी पश्चिम विदर्भातील अनेक उदाहरणे दिली आहेत. हे सरकार कोणते निर्णय घेत आहेत, ते ऐकायला येत नाहीत. पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात व इतर अनेक निर्णय होणे गरजेचे आहेत. दुष्काळाला सामोरे जाताना कोणते निर्णय सरकार घेणार आहे, याची कोणतीही माहिती जनतेला मिळत नाही.

सभापती महोदय, सभागृहातील ज्येष्ठ नेत्या श्रीमती शोभाताई फडणवीस मी त्यांच्या सोबत विधानसभेत काम केले आहे. मी त्यांचा आदर करतो, त्या सत्तेत असताना व नसताना देखील शेतकऱ्यांच्या संदर्भात ग्रामीण भागातील प्रश्न त्या नेहमी मांडत होत्या. मी भारतीय जनता पक्षाचा सदस्य असताना त्यांनी ज्या पोटतिडीकीने विषय मांडले आहेत ते मी पाहिले आहेत. विरोधी पक्षात असो किंवा सत्ताधारी पक्षात असो त्यांचे विचार त्या मांडत होत्या काल देखील त्यांनी असेच परखड विचार मांडले आहेत. त्यांनी अनेक प्रश्न मांडले परंतु प्रश्न मांडत असताना त्यांनी हे सरकार अमुक ठिकाणी कमी पडते, असे सांगितले नाही. सर्व काही दुसऱ्यावर ढकलले जात आहे. हे त्यांचे घरचे भांडण होते, त्यांनी घरी सांगितले असते तर ते तेथेच संपले असते. पश्चिम विदर्भातील अनेक प्रश्न त्यांनी मांडले आहेत. सिंचन प्रकल्पाचे पाणी उद्योगांना देण्याचा प्रश्न त्यांनी मांडला आहे. सरकार सत्तेवर येऊन 9 ते 10 महिन्यांचा कालावधी झाला आहे. या सरकारला काय मापदंड बदलावयाचे असतील, नियम बदलावयाचे असतील ते त्यांनी बदलावेत. मराठवाड्यातील नाही तर किमान विदर्भ व खानदेशातील जनतेने या सरकारने आमचे अमुक अमुक प्रश्न सोडले असे तरी आम्हाला त्यांच्या तोंडून ऐकू द्यावे.

या नंतर श्री.भोगले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित.....

एकदा तरी या सदनामध्ये येऊन तुम्ही बोलत असल्याचे आम्हाला ऐकू द्या. तुमचे सरकार सत्तेवर येऊन 10 महिने होऊनही तुमच्यात हे बोलण्याचे धाडस नाही हे तुमचे दुर्दैव आहे, आमचे नाही.

सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी जे भाषण केले ते मी ऐकले आहे. सरकारला या दुष्काळाच्या दाहकतेचे गांभीर्य आहे की नाही? दररोज वृत्तपत्रात आम्ही वाचतो, कोर्टाने चौकशी करण्यास सांगितले आहे, कोर्टाने आदेश दिले आहेत. सरकार कोर्टाच्या आदेशाने चालविणार आहात काय, विचार करणार आहात की नाही? मराठवाडा, खानदेश, विदर्भातील जनता तहानलेली आहे. महाराष्ट्र दुष्काळाला सामोरा जात आहे. अशा परिस्थितीत धुळे नंदूरबार मधल्या नदी नाल्यातील गोट्याने किंवा दगडाने माननीय श्री.शरद पवार साहेबांवर सवंग लोकप्रियता मिळविण्यासाठी टीका करणे हे शोभणारे नाही. काल सायंकाळी आमच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दोन्ही सभागृहातील सर्व आमदारांची बैठक झाली. त्या बैठकीत हेच आमच्या साहेबांकडून हेच सांगण्यात आले की, राजकारण करु नका. आपल्याला राजकारण करायचे नाही. काय करायचे ते आपण करू. सरकारचे नंतर पाहू. आपला पक्ष काय तयारी करतो की नाही? पुढील काळात पाऊस पडला तर चांगले आहे, नाही पडला तर काय तयारी करता हे सांगण्यासाठी 15 दिवसांचा अवधी देतो. या संदर्भात मार्ग काढण्याचा प्रयत्न करा, ही भावना, हे विचार आमच्या साहेबांचे आहेत. 12 डिसेंबरला त्यांच्या वयाची पंच्याहत्तरी साजरी होणार आहे. शरीर साथ देत नसताना प्रतिकूल परिस्थितीत काम करीत असताना कोणी तरी सोम्यागोम्याने उठून आरोप करायचे हे शोभणारे नाही. ब-यापैकी काळ ते आत होते. त्यांनी बाहेर आल्यानंतर हा शहाणपणा शिकवू नये. नाव घ्यायचे झाले तर नियम 35 अन्वये नोटीस द्यावी लागते, त्यामुळे मी त्यांचे नाव घेत नाही. सभागृहात विरोधी पक्षाचे कोणी नाहीत या संधीचा उपयोग करुन टिकाटिप्पणी करणे ही लाजीरवाणी गोष्ट आहे. या महाराष्ट्रातील सर्वसामान्य शेतकऱ्यांचे प्रश्न आहेत. ते समजून घेऊन बोलले पाहिजे. सरकारने हाक दिली तर सरकारला मदत करण्याची तयारी आहे. मदत करताना राजकीय अभिनिवेश न बाळगता साहेबांनी काम केले आहे. ज्यांचा बराच काळ आत गेला आहे त्यांनी अशा पध्दतीने बोलणे हे शोभनीय नाही.

सभापती महोदय, श्री.मनिष गुंजाळ नावाचे कवी आहेत, त्यांनी त्यांची कविता माझ्यापर्यंत पोहोचविली आहे. मी ती कविता वाचून दाखवितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

17-07-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) W.2

SGB/ KTG/ 14:30

श्री.अमरसिंह पंडित....

नरेंद्र बोले तैसा देवेंद्र चाले
अच्छे दिन आले बाबा अच्छे दिन आले.
वर्षभरात बेजार शेतकरी हजार
कर्माने यांच्या फासावर लटकवले
अच्छे दिन आले बाबा अच्छे दिन आले.
बाया बापड्या पोरक्या, पोरं अनाथ झाली
कोट सूट घालून हे निर्लज्ज फिरले
अच्छे दिन आले बाबा अच्छे दिन आले.
कर्जमाफी द्यायला पैसे यांचे संपले
वर्षभरात सांगा कोणी किती खाल्ले
अच्छे दिन आले बाबा अच्छे दिन आले.
पोराबाळांच्या चिक्कीवर ताईंचा डोळा
बाबांच्या पुण्याईवर कोटी 260 घुसले
अच्छे दिन आले बाबा अच्छे दिन आले.
दादा चंद्रकांता पोलिसांवर बरसले
पुरोहितांचे प्रवचन साऱ्या जगाने ऐकले
अच्छे दिन आले बाबा अच्छे दिन आले.
धनुष्याचे बाण केव्हाच संपले
मावळ्यांच्या वेशात बावळे उभे राहिले
अच्छे दिन आले बाबा अच्छे दिन आले.
कोल्हापूरचे जावई अमित शहाणे झाले
मराठी मनाचे राज्य तोडाया निघाले
अच्छे दिन आले बाबा अच्छे दिन आले.
आश्वासनाचे इमले धडाधडा कोसळले
अति झाले यांचे हसू जगाला आले
आता तरी सुधरा शेवटचे सांगतो
तो दिवस दूर नाही, लोकांनी रस्त्यावर मारले
मग म्हणाले बुरे दिन आले बाबा बुरे दिन आले
स्वतःच्या कर्माने बुरे दिन आले.

एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

--------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.महादेव जानकर (नामनियुक्त) : सभापती महोदय, म.वि.प.नियम 260 अन्वये विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्षाने दिलेले प्रस्ताव क्लब करण्यात आले आहेत, त्या प्रस्तावांवर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांबद्दलचा जिव्हाळयाचा प्रश्न सभागृहात उपस्थित झालेला आहे. या सभागृहामध्ये अनेकदा दुष्काळाच्या आणि सिंचनाच्या प्रश्नावर चर्चा केली आहे. त्यातून फलित काय मिळाले याचा देखील विचार झाला पाहिजे. आज मराठवाडा दुष्काळाने होरपळत आहे. मराठवाडयाचा माझाही अभ्यास आहे. मी एवढेच सांगू इच्छितो की, ही परिस्थिती निर्माण होण्यासाठी कोण जबाबदार आहे हे पाहिले पाहिजे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर भाषणे करायची, आकडेवारी द्यायची ही परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी आम्ही काय उपाययोजना केली पाहिजे हे महत्वाचे आहे. राजकीय भूमिका न मांडता शेतकऱ्यांची गरीबी हटविण्यासाठी आम्ही काय करु शकतो ही भूमिका स्वीकारली पाहिजे.

सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रातील काही तालुके आज देखील पाण्यापासून वंचित आहेत. खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ, कोकणचा काही भाग तहानलेला आहे. कोकणामध्ये प्रचंड पाऊस पडतो, परंतु पाणी अडले जात नाही. पश्चिम महाराष्ट्रातील बारामती, कराड तालुक्यांचा विकास झाला म्हणजे संपूर्ण पश्चिम महाराष्ट्राचा विकास झाला असे समजण्याचे कारण नाही. आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या प्रयत्नाने काही तालुक्यात सिमेंट बंधारे बांधण्यात आले, त्याचे रिझल्ट चांगले येत आहेत, त्याबद्दल आम्ही अभिनंदन करण्यास तयार आहोत. माझ्या माण तालुक्यात काही सिमेंट बंधारे चांगल्या पध्दतीचे बांधले गेले आहेत.

माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी जलयुक्त शिवार हा कार्यक्रम हाती घेतला आहे. त्या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सपोर्ट केला तर भविष्यात कर्जमाफी मागण्याची वेळ येणार नाही. शॉर्ट टर्म उपायांची चर्चा करीत असल्यामुळे आपल्यावर कर्जमाफी मागण्याची वेळ आली आहे. शॉर्ट टर्मबरोबर लाँग टर्म उपाययोजना आखल्या पाहिजेत. आज गुजरात आणि महाराष्ट्रातील सिंचनाची तुलना केली तर महाराष्ट्र राज्य सिंचनाच्या बाबतीत 11 टक्क्यापर्यंत पोहोचले असून गुजरात राज्य 49 टक्क्यावर आहे. हे सत्य आम्हाला मान्य केले पाहिजे. मी राजकारणी नाही. मी दुष्काळी भागातून आलेलो आहे. शेतकऱ्यांचा मुलगा उद्योगपती होईल

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

17-07-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) W.4

SGB/ KTG/ 14:3

श्री.महादेव जानकर.....

त्यावेळीच शेतकऱ्याची आत्महत्या थांबेल. मी हे राजकारण म्हणून बोलत नाही. माननीय सदस्य श्री.दिपकराव साळुंखे हे वारंवार दुष्काळी भागाचे प्रश्न उपस्थित करतात. आज देखील सांगोला तालुक्याला पाणी मिळत नाही ही वस्तुस्थिती असताना आम्ही कायमस्वरुपी उपाययोजना करणार की वरवरची मलमपट्टी करणार हे महत्वाचे आहे.

नंतर एक्स.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.महादेव जानकर...

सभापती महोदय, मला आपणास सांगावयाचे आहे की, हे सरकार शेतकऱ्यांची बाजू घेण्यासाठी सक्षम आहे. आम्ही देखील शेतकऱ्यांची पोरं आहोत. आम्ही काय उद्योगपतींची पोरं नाही. बाजरी कुठे येते हे आम्हाला चांगले माहीत आहे. या राज्यामध्ये ऊसाचे उत्पादन कमी केल्यानंतर जे पाणी उरेल ते बाकीच्या तालुक्यांना दिले तर या राज्यातील दुष्काळ संपून जाईल. परंतु, ते आज पर्यंत झाले का ? मराठवाड्याला कृष्णा-खोऱ्याचे 21 टीएमसी पाणी दिले तर मराठवाड्यातील 100 टक्के दुष्काळ संपू शकतो. त्यामुळे ते पाणी दिले पाहिजे. मी सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांना सांगू इच्छितो की, आम्ही आपल्या बरोबर आहोत. आपणाला 21 टीएमसी पाणी मिळाले पाहिजे. पश्चिम महाराष्ट्रातील पाणी कर्नाटकमध्ये जात आहे. ते पाणी अडविले तर जत, कवठेमहांकाळ, मंगळवेढा, माण, खटाव, आटपाडीचा प्रश्न देखील तातडीने सुटू शकतो. पण् आज राजकीय नेत्यांमध्ये संवेदनशीलता आहे काय ? आजपर्यंतच्या राजकारणी नेत्यांनी मोठ्या आवाजात भाषणे केली. पण त्यांनी संवेदना का दाखविली नाही ? त्यासाठी कोणती कारणे आहेत याचा आपण विचार केला पाहिजे.

या शासनाने जलयुक्त शिवार योजनेसाठी नियोजन केले आहे. ते फार अफलातून आहे. नाशिकचे पाणी मराठवाड्याला नको. साताऱ्याचे पाणी सांगलीला नको. विहिरी नीट खोदल्या, नालेसफाई नीट व्यवस्थितपणे केली तर त्या त्या गावातील पाण्याची भूक भागू शकेल आणि कायमचा दुष्काळ आपला हटू शकतो. आम्हाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देखील राज्यातील 20 हजार गावांमध्ये टँकरने पाणी पुरवठा होत आहे. आजही त्या गावात दुष्काळाची स्थिती आहे. त्यासाठी आम्ही काय केले आहे ? आम्ही फक्त गप्पा मारत बसलो, मोठी भाषणे करत बसलो. आमची विद्यापीठे काय करत आहे, कृषी संशोधक काय करीत आहेत, याचा विचार सरकारने केला पाहिजे. आजही महाराष्ट्रातील 198 तालुक्यांमध्ये दुष्काळ आहे. दुष्काळ आहे म्हणजे फार चांगले आहे असे नाही. मी सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांना सांगू इच्छितो की, मीच बारामती मतदार संघातून उभा राहिलो होतो. तेथील 33 गावांना आजही पाणी नाही. त्या गावांना आजही टँकर लागत आहे. माझे सातारा जिल्ह्यातच गाव आहे. सातारा जिल्ह्यातील 92 गावांतील माता



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.महादेव जानकर...

भगिनींना दहा कि.मी.वरून पिण्याचे पाणी आणावे लागत आहे. हे आपले स्वातंत्र्य आहे काय ? त्यामुळे माझी सरकारला विनंती आहे की, यावर कायम स्वरूपी सोल्युशन काढावे. मलमपट्टी करू नये. माझी विरोधी पक्षाला विनंती आहे की, आपण देखील परमनंट सोल्युशन द्यावे. जनावरांसाठी छावणी दिल्यामुळे माणमध्ये काय होते ते मला माहीत नाही. मी इलेक्ट्रीकल इंजिजिनअर आहे. मला सर्व माहीत आहे. इंडियन एक्स्प्रेसमध्ये एक रिपोर्ट आला आहे. तो मी बनविलेला नाही. तो रिपोर्ट मी वाचून दाखवितो.

"During the period 2000-01 to 2010-11, Maharashtra's cumulative public expenditure on irrigation at current prices was Rs. 81,206 crore, which amounts to Rs. 1,31,076 crore at constant 2014-15 prices. This public expenditure led to an increase in gross irrigated area from 3.9 mha in 2000-01 to 4.1 mha by the end of the decade, a meagre rise of only 5.1 per cent. In contrast, in Gujarat, the cumulative public expenditure on irrigation over the same period was Rs. 39,369 crore at current prices, amounting to Rs. 64,799 crore at 2014-15 constant prices. This was almost half (49.4 per cent) of what Maharashtra spent...."

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. जेव्हा येथे दोन राज्यांची तुलना सांगितली जाते तेव्हा ती दोन्ही राज्ये भौगोलिकदृष्ट्या सारखी, समान असली पाहिजेत. महाराष्ट्राची भौगोलिक स्थिती अत्यंत वेगळी आहे. .....(अडथळा)..... येथे गुजरात आणि महाराष्ट्र या राज्यांची तुलना होऊच शकत नाही. महाराष्ट्रामध्ये डोंगर-दऱ्या आहेत. ती परिस्थिती गुजरातमध्ये नाही. त्यामुळे भौगोलिक तुलना करून सभागृहाची दिशाभूल करू नये एवढीच माझी आपल्याला विनंती आहे.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर हे दोन राज्यांची भौगोलिक तुलना करीत नसून दोन राज्यातील टक्केवारीची तुलना करीत आहे.

Shri Mahadeo Jankar: Hon. Member, you are a senior member, I request you to kindly listen to me. जास्त फंड मिळून देखील आमचा इरिगेटेड एरिया कमी झाला हेच मला सांगावयाचे होते. बाकी मला काहीच सांगावयाचे नव्हते. I am not spokesperson of the Party. मी हे शेतकऱ्यांच्या हितासाठी बोलत आहे. त्यामुळे मी येथे तुलना सांगितली. माझ्याकडे बाकीच्या 16 राज्यांचा अभ्यास असून तेथील जीडीपीची देखील माहिती आहे. तो जर सांगितला तर आपण फार लोएस्ट आहोत हे आपल्यालाही कळून येईल. आम्ही स्वत:ची अब्रु स्वत: काढत नाही आणि त्यावर बोलू देखील इच्छित नाही. आमची सत्ताधारी आणि विरोधी पक्षाला विनंती आहे की, आपण दोघांनी मिळून शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी काय कमिटमेंट करता येईल यासंबंधी चर्चा केली पाहिजे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, भावनेच्या भरात आपण अनेक गोष्टी बोलून जातो. हे बोलत असताना आपण आपल्या राज्याच्या बाबतीत बोलत आहोत हे विसरून जातो. आपण एरिगेशनसंबंधी विचार मांडत आहात. त्यासंबंधी श्वेतपत्रिका निघाली आहे. त्या श्वेतपत्रिकेमध्ये या सर्व गोष्टींची नोंद आहे. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे म्हणाले ती गोष्ट काही अंशी खरी आहे. आपण येथे बाजूच्या राज्याचा उल्लेख केला आहे. आपल्या राज्याच्या बाजूला चार राज्ये आहेत. मध्य प्रदेशसंबंधी आपण बोलू नका. मध्यप्रदेशमध्ये व्यापम आहे, तर गुजरातमध्ये ग्यापम आहे. त्यामुळे आम्ही राजकारण करीत नाही. आमचे म्हणणे एवढेच आहे की, राज्यासंबंधी बोलत असताना पूर्वीच्या सरकारवर टीका करण्याचा आपल्याला पूर्ण अधिकार आहे. अयोग्य गोष्टींवर आपण टीका करायलाच हवी. आपण महाराष्ट्र राज्याबद्दल बोलत आहोत याचे भान प्रत्येकाने ठेवावे एवढीच माझी विनंती आहे.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पंडित : सभापती महोदय, विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी अर्धा ते पाऊण तास भाषण केले. त्यांनी मांडलेले मुद्दे त्याच वेळी नीट करता आलेही असते. परंतु, त्यासंबंधी उत्तरात खुलासा देण्यात येईल असे आम्ही धोरण ठरविले आहे. त्यामुळे माझी सन्माननीय सदस्य सर्वश्री.भाई जगताप, प्रकाश बिनसाळे यांना विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर हे ज्या समाजातून आले आहेत, ज्या पद्धतीने बोलत आहेत त्याचे आपण ॲप्रीसिएशन केले पाहिजे.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांना मंत्री करावे असे एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)
त्यांना आम्ही मंत्री करणार. तेवढी आमची दानत आहे. त्यांना मंत्री करणार हे मी या सभागृहात सांगतो. त्यामुळे त्यांना आपण बोलू द्यावे

**तालिका सभापती (प्रा.जनार्दन चांदूरकर) :** ठीक आहे.

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, मी नवीन आहे. मी देखील या राज्यातीलच आहे. I am born in the State of Maharashtra. परंतु, राज्याचा अवमान व्हावा अशी माझी भूमिका नाही. मी नवीन सदस्य असल्यामुळे संसदीय कामकाजामध्ये नक्की कमी पडत असेन. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप हे फार पूर्वीपासून या सदनाचे सदस्य असल्यामुळे ते विद्वान आहेत. या राज्यातील दुष्काळ कायमचा संपावा अशी माझी तळमळ आहे. दुष्काळ काय असतो हे मला माहीत आहे. कारण तो आम्ही जास्त भोगला आहे. आम्ही दुष्काळी भागातील असलो तरी सर्वांना सगळे काही मिळाले पाहिजे अशी आमची विचारधारणा आहे. पण तशी त्यांची नियत नव्हती. आजच प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना घोषित करण्यात आली आहे. "Per drop, more crop" त्यामुळे आमचे म्हणणे आहे की, या सरकारने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्याची भूमिका घ्यावी. एवढे बोलून मी आपली रजा घेतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

.............



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि सत्ताधारी पक्षाच्यावतीने आणलेल्या प्रस्तावावर मी माझे मत मांडण्यासाठी उभा आहे. पहिले साडेतीन दिवस कर्जमाफीसाठी या सभागृहात आक्रोश होत होता.

यानंतर श्री.जुन्नरे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. कपिल पाटील .....

साडेतीन दिवसानंतर सरकारने प्रतिसाद दिला याचे कारण काय ? विरोधी पक्ष नेत्यांनी 15 वर्षाचा हिशोब सांगितला व आमच्या काही चुका झाल्यामुळे तुम्ही तेथे आलात हे सुध्दा सांगितले. परंतु तुम्ही इतक्या चुका का केल्यात की, असे सरकार आणले ? पहिल्यांदा शेतकऱ्यांचे नसलेले सरकार सत्तेवर आल्यामुळे राज्यातील शेतकरी संकटात आला आहे. हे सरकार कोणाचे आहे ? दोन तीन सन्माननीय सदस्यांचा अपवाद सोडला तर या सरकारमध्ये शेतकरी कोण आहे ? मी शेतकऱ्याचा पोरगा आहे. तुमचे सरकार शेतकऱ्याचे असते तर सत्ताधारी पक्षाचा जो ठराव आहे तो ठराव ज्येष्ठ शेतकरी माननीय श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी मांडला असता. तुमच्या ठरावात सुध्दा सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर याचे नाव नाही. मंत्रालयात माननीय श्री.भाऊसाहेब फुंडकर असले पाहिजे होते असे आम्हाला वाटते, पण भाऊसाहेबांना मंत्रालयात स्थान दिले नाही, किमान ठरावात तरी त्यांचे नाव द्यावयास पाहिजे होते. परंतु त्यांचे स्थान तुम्ही ठरावात सुध्दा न ठेवल्यामुळे मी म्हणालो की, हे सरकार शेतकऱ्यांचे नाही. माननीय श्री. चंद्रकांत दादा तुम्ही दिल्लीश्वराच्या जवळ राहून येथील गरीब शेतकऱ्याला विसरु नका एवढेच माझे सांगणे आहे. तुम्ही कोल्हापूरचे आहात. कोल्हापूरचा ऊस शेतकरी कसा मोडून पडला आहे हे तुम्हाला माहीत असले पाहिजे. त्याच्या बाजूने तुम्ही बोला, त्याच्या बाजूने तुम्ही उभे राहा तर आम्ही तुम्हाला मानू. परंतु ते न करता कंत्राटदार, व्यापारी, धनदांडगे यांच्या बाजूने तुम्ही सरकार उभे करणार असाल तर ते योग्य नाही. पूर्ण मंत्रालय तुम्ही कंत्राटदाराच्या व कार्पोरेट लोकांच्या ताब्यात दिल्यामुळे तुम्ही शेतकऱ्यांकडे कसे लक्ष देणार ? या सरकारमध्ये शेती कळणारी माणसे असती, पाण्याचा प्रश्न कळणारी माणसे असती तर साडेतीन दिवस झालेल्या आक्रोशाबद्दलची दखल तुम्ही लवकर घेतली असती. परंतु तसे मात्र झाले नाही.

सभापती महोदय, हे संकट इतके प्रचंड आहे की, दुर्गादेवीच्या दुष्काळाची आठवण येईल अशा प्रकारचे पुढचे भविष्य लिहून ठेवले आहे. आज पाऊस नाही, पाणी नाही. मी परवा वडील कोठे आहेत म्हणून आईला फोन केला होता. आईने सांगितले की, तुझे वडील शेतावर गेले आहेत. 25 दिवसापासून पावसाचा एक थेंब नाही, केलेली पेरणी वाया गेली असून ती पाहण्यासाठी

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. कपिल पाटील .....

ते शेतावर गेले आहेत. ही जर पालघर जिल्हयाची स्थिती असेल तर मराठवाडयाची स्थिती किती गंभीर असू शकते, किती भयंकर असू शकते हे मघाशी सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित ज्या उद्विगतेने बोलत होते त्यावरुन कळत होते.

सभापती महोदय, या वर्षीच्या संकटाइतकी परिस्थिती कोकणामध्ये कधीही आली नव्हती. जर कोकणाची ही परिस्थिती असेल तर मराठवाडयाची स्थिती किती वाईट असेल यासाठी दुसरा पुरावा देण्याची गरज नाही. गेल्या 15 वर्षात 53 हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची माहिती येथे देण्यात आली आहे. आम्हाला असे वाटत होते की, नवीन सरकार आल्यावर शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी होतील किंवा होणारच नाहीत. कारण, आपण अच्छे दिनाचे वादे केले होते. परंतु या सरकारच्या सात महिन्याच्या काळात 1800 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. गेल्या 10-15 वर्षापासून शेतकरी आत्महत्या करीत आहेत हे आम्हाला माहीत आहे. परंतु कुंकू पुसले गेले, बांगडया फुटल्या गेल्या तरी शेतकऱ्याची बाई आत्महत्या करत नव्हती. या सरकारवरील विश्वास उडाल्यामुळे तुमच्या राज्यात पहिल्यांदा दोन स्त्री शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. बाई आत्महत्या कधी करते, जेव्हा सर्व आधार तुटतात, जीवनावरील विश्वास उडतो तेव्हाच बाई आत्महत्या करते. तुमचे सरकार आम्हाला आधार देऊ शकेल यावर तिचा विश्वास उडाल्यामुळे सूंपर्ण देशातून आपल्या राज्यात पहिल्यांदा दोन महिला शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. या दोन आत्महत्या तुमच्या राज्यात घडलेल्या आहेत. तुमच्या सरकारवर जनतेचा विश्वास राहिलेला नाही हे सांगण्यासाठी आणखी दुसऱ्या पुराव्याची गरज उरलेली नाही.

सभापती महोदय, कर्जमाफी का हवी आहे, हे मी सांगण्याची गरज नाही. तुम्हालाही त्याची माहिती आहे. आज सगळया प्रकारची पिके अडचणीत आली आहेत. ऊस शेतकरी अडचणीत आला आहे. सोयाबीनचे पीक शेतकऱ्याच्या हातातून गेले आहे. आम्हाला असे वाटत होते की, धानाची शेती शाश्वत आहे. परंतु ती सुध्दा हातातून गेली आहे. अशा संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला तुम्ही दुबार,तिबार पेरणीच्या वेळी मदत केली नाही तर शेतकरी कोलमडून पडेल व शेतकरी कोलमडून पडला तर महाराष्ट्र ज्या कृषी औद्योगिक व्यवस्थेवर उभा आहे तो महाराष्ट्र कोलमडून

...3....

श्री. कपिल पाटील .....

पडेल. ग्रामीण भाग ज्या साखर कारखान्यावर उभा आहे तो उद्योग आज संकटात असेल आणि त्याला तुम्ही मदत करणार नसाल तर मग महाराष्ट्राला पुन्हा उभे करण्यासाठी अनेक वर्षे लागतील याची जाणीव या सरकारने ठेवण्याची गरज आहे.

सभापती महोदय, पाऊस येईल कधी ? 7 जूनला जो पाऊस पडला त्यानंतर पाऊस पडलेला नाही त्यामुळे यासंदर्भात सरकारने कोणते नियोजन केले आहे ? आपल्या राज्याच्या हवामान खात्याच्या सल्लागारांनी आपल्याला कळवले होते की, पावसाचा मोठा खंड पडणार असल्यामुळे अगोदरच शेतकऱ्यांना जागे करा. आपण त्या प्रमाणे नियोजन केले होते काय ? तुमच्यापर्यंत हवामान खात्याच्या सल्लागारांचा सल्ला पोहचला होता का ? राज्याच्या हवामान खात्याच्या सल्लागारांनी याबद्दलची जाणीव तुम्हाला करुन दिली होती. एक गोष्ट खरी आहे की, मुख्यमंत्री म्हणतात तसे कर्जमाफी हा केवळ एक उपाय होऊ शकत नाही. परंतु उरलेले जे काही उपाय आहेत ते तुम्ही केले का ? शेतकरी जगवायचा असेल तर बदलत्या हवामानाच्या दृष्टीने शेतीचे नीट नियोजन आपल्याला करावे लागेल. जगामध्ये ग्लोबल वॉर्मिंगचा भाग असेल, एलनिनोचा भाग असेल,वाढत्या कार्बनचा प्रश्न असेल आणि आपल्या राज्यामध्ये व देशामध्ये बदलत्या हवामानाचे गेल्या चार पाच वर्षाचे जे चित्र आहे ते लक्षात घेतले तर शेतीचे सर्व नियोजन आपल्याला बदलावे लागेल व त्यासाठी सरकारला स्वत: पुढाकार घ्यावा लागेल. आता जुन्या पंचांगावर आधारित शेतीची पेरणी किंवा लावणीचे नियोजन होऊ शकणार नाही. परंतु या सरकारने यासंदर्भात काहीही नियोजन केले नाही. मी अनेक अधिवेशनामध्ये सातत्याने यासंदर्भातील मुद्दा मांडत होतो की, आपल्या राज्याचे एक स्वतंत्र वेगळे हवामान खाते असले पाहिजे. हे हवामान खाते कृषी खात्याशी व कृषी विद्यापीठाशीही जोडले गेले पाहिजे. परंतु या सरकारने या दिशेने कोणतेही पाऊल उचलले नाही. जागतीक हवामान तज्ज्ञांनी इशारा दिला आहे की, महाराष्ट्र आणि गुजरात या दोन राज्यावर पुढील दोन महिने ढग येणार नाहीत. पाऊस फक्त ऑगस्ट आणि सप्टेंबर या महिन्यात येईल परंतु या दोन पावसामध्ये सुध्दा प्रचंड खंड असणार आहे व हा जो खंड आहे त्यामध्ये सुध्दा वाढ होण्याची शक्यता आहे. हा खंड वाढला तर केवळ शेतीचे नुकसान होणार नाही तर पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. 93 टक्के

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. कपिल पाटील .....

पाऊस पडेल असे आपले हवामान खाते सांगते. परंतु त्यापेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता नासाने वर्तवली आहे. आपल्याकडे 10 टक्के जरी पाऊस कमी पडला तरी पूर्ण महाराष्ट्राची व्यवस्था कोलमडून पडेल आणि पिण्याच्या पाण्याचे मोठे दुर्भीक्ष तयार होईल व त्या दुर्भिक्षाशी हे शासन कसे तोंड देणार आहे ? परंतु त्यासाठी शासनाने कोणतेही नियोजन केल्याचे दिसून येत नाही.

सभापती महोदय, सन 2003 पासून सातत्याने पाऊस कमी पडतो आहे. वारा, तापमान तसेच सूर्य प्रकाशही कमी असल्यामुळे पर्जन्यमान कमी होत आहे. गेल्या महिन्याभरापासून पाऊस गायब आहे त्याचे मुख्य कारण वारा, तपमान तसेच सूर्य प्रकाश कमी असणे हे आहे. पावसाचा जो मोठा खंड पडला आहे तो जुलै अखेर सुध्दा संपेल की, नाही यांची भिती हवामान तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत.

सभापती महोदय, पूर्वी चार वर्षाने अवर्षण यायचे. 1972 च्या दुष्काळानंतर 1986 मध्ये मोठा दुष्काळ पडला होता. सन 2002 नंतर सातत्याने दुष्काळ पडत आला आहे. आता चित्र असे आहे की, चार वर्षाने आपल्याकडे अवर्षण येत नाही तर गेल्या पाच वर्षात अवर्षणाची चार वर्षे होती. या अवर्षणामुळे शेती सातत्याने संकटात आली आहे. 2011 मध्ये कमी पाऊस पडला त्यानंतर 2012 मध्ये कमी पाऊस पडला, 2013 मध्ये चांगला पाऊस झाला, 2014 मध्ये कमी पाऊस पडला आणि 2015 मध्ये तर त्याहूनही कमी पाऊस पडणार आहे.

सभापती महोदय, हवामान तज्ज्ञांनी सांगितले होते की, भात लावणी ताबडतोब करु नका तर पावसाची वाट बघा. अगोदर केलेला पेरा पूर्णपणे वाया गेलेला आहे. मराठवाडयाची स्थिती तर जास्तच वाईट आहे. पाऊस येत नाही अशातला भाग नाही परंतु आपल्या महाराष्ट्रात काही ठिकाणी खूप पाऊस पडतो तर काही ठिकाणी काहीच पडत नाही. 1986 मध्ये 80 तालुके अवर्षण प्रवण होते ते आता 123 झालेले आहेत. या 123 अवर्षण प्रवण तालुक्यांचे शासनाने कोणते नियोजन केले आहे ? आता केवळ तालुका घटक घेऊन चालणार नाही, तर त्याचे गट पाडावे लागतील. गाव पातळीवर जाऊन हे तुम्हाला करणे सहज शक्य आहे, इतके हवामान शास्त्र पुढे गेलेले आहे. ढगाचे फिजिक्स सुध्दा आता पुढे गेले असून पाऊस कधी पडणार आहे, पाणी किती

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. कपिल पाटील .....

साठवायचे,पेरा कधी घ्यावयाचा यासंबंधीचे शास्त्र आता पुढे गेले आहे. शासनाने हे शास्त्र जाणून घेतले नाही ही मुख्य अडचण आहे. कृषी खाते, हवामान खाते यांचा शासनाने मेळ घातलेला नसल्यामुळे राज्यातील शेतकरी अडचणीत सापडला आहे. तुम्ही शेतकरी नाही हा तुमचा दोष नाही परंतु तुम्ही शेतकऱ्याच्या वेदना जाणून घेऊन शेतकऱ्याच्या बाजूने उभे राहणार की, नाही हा खरा मुद्दा आहे व त्या ठिकाणी तुम्ही कमी पडता ही खरी अडचण आहे.

सभापती महोदय, महाबळेश्वरला प्रचंड पाऊस पडतो परंतु खटाव आणि माण पूर्णपणे कोरडा राहातो. आंबेगाव तालुक्यातील अर्ध्या भागात 5000 मि.मी.पाऊस पडतो आणि उरलेल्या भागामध्ये फक्त 500 मि.मी.पाऊस पडतो. त्यामुळे जेथे जास्त पाऊस पडतो त्या ठिकाणचे पाणी वळवण्याचे नियोजन असले पाहिजे ते आपण करु शकलो नाही त्यामुळे शेती अधिकाधिक अडचणीत आली आहे.

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील.....

सभापती महोदय, आपल्या राज्याचे हवामान सल्लागार श्री.रामचंद्र साबळे आहेत, त्यापूर्वी श्री.गोवारीकर होते. त्यांनी आपणास पाऊस मोजण्याचे मॉडेल तयार करुन दिलेले आहे. आपण त्याची अंमलबजावणी कशी करीत आहोत ? पाऊस मोजण्याचे पर्जन्यमापक यंत्र दोन हजार गावांमध्ये लावले आहे. खरे म्हणजे हे यंत्र प्रत्येक गावामध्ये लावले पाहिजे. किमान पंचक्रोशीमध्ये लावले पाहिजे. या यंत्रामुळे आपणास गाव पातळीवर पाण्याचे आणि शेतीचे नियोजन करता येईल. हे यंत्र बसविण्यासाठी जास्त खर्च नाही. एका पर्जन्यमापक यंत्राची किंमत चार हजार रुपये आहे. आपण प्रत्येक गावात हे यंत्र बसवून त्यातील डेटा शास्त्रज्ञांना दिला तर शास्त्रज्ञ महाराष्ट्रातील गावपातळीपर्यंतचे नियोजन तयार करुन देतील. सरकारने 20 हजार गावांमध्ये यंत्र लावले तर 40 हजार गावांचे नियोजन होऊ शकेल. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे या यंत्रासाठी फार खर्च नाही. आपण ही यंत्रे गावांमध्ये बसविली नाहीत तर भविष्यकाळात अधिकाधिक अडचणी निर्माण होतील.

सभापती महोदय, राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढण्याचे आणि शेतकरी अधिक संकटात येण्याचे आणखी एक कारण आहे आणि त्यास हे सरकार पूर्णपणे जबाबदार आहे. हे सरकार सत्तेवर आल्यावर त्यांनी गोवंश हत्या बंदी विधेयक जिवंत केले आणि ते माननीय राष्ट्रापतींकडून मंजूर करुन घेतले. दादा, आपण शेतकरी पाहिलेला आहे आणि शेतकऱ्यांमध्ये राहिलेला आहात. आपण शेतकरी आहात. आज शेतकऱ्यांच्या कपाळी भाकड जनावरे टाकणे त्याला परवडणारे आहे काय ? 15-17 वर्षानंतर जनावर भाकड झाल्यानंतर शेतकरी ते जनावर खाटिकाला विकत होते. त्यातून त्यांना किमान 15 ते 20 हजार रुपये मिळत होते. पण आज आपण त्यांच्याकडून ते हिरावून घेतलेले आहे. आज अशा जनावरांना पोसण्यासाठी दुप्पट खर्च येत आहे. आपण त्याबाबत कोणती व्यवस्था केली आहे ? जे प्रॅक्टीकल नाही ते आपण करु नये. आम्ही गोमाता म्हणून आदर करतो. आपण गोहत्या बंदी केलेली नाही, ती बाबरने केली. तेव्हापासून ती चालत आलेली आहे. काश्मिरमध्ये ती आधीपासून सुरु आहे. पण या सरकारने निकामी ठरलेल्या वळूला आणि बैलाला मारायचे नाही, असे फर्मान काढलेले आहे. त्यामुळे अडचण निर्माण झालेली आहे. जनावरांच्या कातड्यापासून चामडे तयार होते, खुरापासून नखापर्यंत सर्व

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील.....

गोष्टी कामाला येतात. जनावर विकल्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होताच, पण इतर गोष्टी देखील होत होत्या. जनावरांच्या कातड्यापासून चामडे तयार करण्यात येते म्हणजे यावर चर्मोद्योग अवलंबून आहे. महाराष्ट्रात मोठ्या जनावराचे मांस खाणारा समाज मोठ्या प्रमाणात आहे. फक्त अल्पसंख्याक असे मांस खातात असे नाही. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी काल त्यांच्या भाषणात सांगितले की, नंदूरबार, धुळे या भागातील लोकांना मटण विकत घेणे परवडत नाही. त्यांना मोठ्या जनावराचे मांस विकत घेणे परवडते. या मांसमध्ये प्रोटीन जास्त असते. पण सरकारने गोवंश हत्या बंदी आणून शेतकऱ्यांच्या गोठ्यात ही जनावरे बांधून ठेवल्यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे. आज शेतकऱ्यांकडे स्वतःच्या मुलांना जेवू घालण्यासाठी पैसे नाहीत. आत्महत्या करायची तर विष विकत घेण्यासाठी पैसे नाहीत. अशा परिस्थितीत सरकारने शेतकऱ्यांच्या बोकांडी गाई-गुरे बांधून ठेवली आहेत. आपण ती जनावरे मोकळी सोडा. भाकड जनावरे शेतकऱ्यांना विकू द्यावीत. आपण गाय सांभाळावी. पण बैल विकण्यास काय हरकत आहे ? बैल देखील आपण विकू देत नाही. अमेरिका आणि युरोपमध्ये जनावरे विकता येतात. पण जोपर्यंत ती दूध देतात तोपर्यंत तेथील शेतकऱ्याला प्रत्येक जनावरामागे दिवसाला तीन डॉलर मिळतात. या सरकारने देखील प्रत्येक जनावरामागे दिवसाला तीन डॉलर म्हणजे 210 रुपये दिल्यास शेतकरी ही जनावरे सांभाळतील. सरकारने गोवंश हत्या बंदी आणून शेतकऱ्यांवर दुष्काळात तेरावा महिना लादलेला आहे. तेव्हा आपण ही बंदी ताबडतोब मागे घ्यावी. तो शहाणपणाचा निर्णय होईल. त्याचा धार्मिक काहीही संबंध नाही. सरकारने नको त्या गोष्टी आणून, भेदाभेद करुन शेतकऱ्याला अडचणीत आणलेले आहे. आपणास शेतकऱ्याला वाचवावयाचे असेल, आपण शेतकऱ्यांच्या बाजूने असाल, तर आपण हे विधेयक ताबडतोब मागे घ्यावे, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, आज शेतकरी खूप अडचणीत सापडलेला आहे. गेली तीन वर्षे सातत्याने दुष्काळ पडत असल्यामुळे आपण शेतकऱ्यांच्या मुलांची परीक्षा फी माफ करीत आहोत. परंतु त्याला वर्षाची फी भरावी लागते. परंतु ही फी परवडत नसल्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या मुलांचे शिक्षण

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

थांबलेले आहे. तेव्हा शेतकऱ्यांच्या मुलांचे सर्व शुल्क माफ करावे. शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा खर्च सरकार उचलेल अशी घोषणा सरकारने करावी. असे केल्यास शेतकरी सरकारला दुवा

..3..

17-07-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Z-3

AJIT/ MMP/ KTG/ पूर्वी श्री.जुन्नरे... 15:00

श्री.कपिल पाटील.....

देईल. मी संकटात आहे, पण माझी मुले शिक्षण घेत आहेत याचा किमान त्याला आधार मिळेल. शेतीवरील भार कमी करण्यासाठी तो मुलांना शिकवित असतो. तेव्हा सरकार शेतकऱ्यांच्या मुलांची फी माफ करणार की नाही, ते त्यांनी सांगावे.

सभापती महोदय, शेती अधिकाधिक अडचणीत यावी, संकटात यावी या दृष्टीने केंद्रातील आणि राज्यातील सरकार काम करीत आहे. या सरकारकडे एलबीटीचा परतावा देण्यासाठी 7 हजार कोटी रुपये आहेत पण शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी किंवा शेतीच्या पेऱ्यासाठी मदत करण्यासाठी त्यांच्याजवळ पैसे नाहीत. या सरकारचा कसला प्रयत्न आहे ? दिल्लीत त्यांचा प्रयत्न फसला आहे. शेतकरी अधिकाधिक अडचणीत आला की शेतकरी आपली जमीन विकेल याची ते वाट पाहत आहेत. जमीन अधिग्रहण कायदा आणण्याचा प्रयत्न होता त्याचे खरे कारण हे आहे. देशातील शेतकरी जितका संकटात सापडेल, अडचणीत येईल, त्याला तितका अडचणीत आणायचा आणि त्याच्याकडून जमीन हिसकावून घ्यायची हाच हेतू आहे. केवळ उद्योगासाठी नाही तर शेतीच्या कंपनीकरणाची प्रक्रिया सुरु करण्याचा तुमचा प्रयत्न आहे. आमचे अडाणीचे डोके नाही. ते तुमच्याकडे आहे. कोणाला कसे संकटात आणायचे याचे डोके तुमच्याकडे आहे. पूर्वीशेतकरी अडचणीत आला की सावकारीचा धंदा जोरात चालायचा. तसा तुमचा धंदा जोरात आहे. शेतकरी जितका अडचणीत तेवढा तुमचा धंदा जोरात. म्हणून आपण प्रथम सावकरांचे कर्ज माफ केले. तुमचे-आमचे कर्ज माफ करणार नाही. माननीय विरोधी पक्ष नेते, सन्माननीय सदस्य सर्वश्री अमरसिंह पंडित, सुनील तटकरे यांचे कर्ज माफ करणार नाही. आपणास सावकारांची कर्जे प्रथम चुकती केली. बँकांना वाचववयाच्या आहेत, साखर कारखाने वाचववयाचे आहेत म्हणून आपण कर्जमाफी नाही म्हणता. सावकर अडचणीत होता म्हणून शेतक-यांचे कर्ज माफ केले आणि सावकाराला सांगितले की, पुन्हा शेतकऱ्यांना कर्ज द्या. म्हणजे आपण शेतकऱ्यांची सावकराकडे जाण्याची व्यवस्था केली. शेतकऱ्यांनी छोट्या बँकाकडे, शेतकरी सोसायटीकडे न जाता

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सावकाराकडे जावे. आपण उभे राहून सांगावे की, हे सरकार सावकारांचे आहे. आम्हाला काही अडचण नाही.

..4..

17-07-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Z-4

AJIT/ MMP/ KTG/ पूर्वी श्री.जुन्नरे... 15:00

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, सावकरांचे कर्ज आहे की, सावकरांकडून काढलेले शेतकऱ्यांचे कर्ज आहे हे सांगावे. सन्माननीय सदस्यांनी पुनर्गठन हा विषय काय आहे, हे मांडले तर मी त्यांना ते खरे शेतकरी आहेत असे मानेन. शेती संकटात आणून जमीन अधिग्रहण करायची असे कोणतेही लॉजिक कोठेही वापरत आहेत. मी सांगू इच्छितो की, कसत असलेली जमीन अधिग्रहीत करण्यात येत नाही. रस्ते बांधण्यासाठी, धरण बांधण्यासाठी,उद्योग उभारण्यासाठी जमिनीची आवश्यकता आहे. कसत असलेली जमीन कोणी घेत नाही. सन्माननीय सदस्य कोणतेही लॉजिक कोठेही मांडत आहेत हेच कळत नाही.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील हे खूप महत्वाच्या विषयावर बोलत आहेत. सरकारला काही सांगायचे असेल तर त्यांनी उत्तरात सांगण्यास काही हरकत नाही. सन्माननीय सदस्यांनी विषय मांडला की, पुरवणी मागण्यांमध्ये एलबीटीच्या परताव्यासाठी सात हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. एलबीटीचा परतावा दिला पाहिजे. शेतकऱ्यांसाठी 900 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, शेतकऱ्यांचा कुठेही संबंध जोडू नका. माझे असे म्हणणे आहे की, आपला शेतकऱ्यांशी संबंध कुठे आहे ? सरकारला जो काही खुलासा करायचा आहे तो उत्तरात करावा. दादा, आपल्यासारख्या संवेदनशील व्यक्तीने खाली बसून, "मग तो निर्णय मागे घ्यायचा काय" असे बोलणे बरोबर नाही. सरकारने कर्ज माफ करताना छातीठोकपणे सांगितले होते की, आम्ही ते पैसे डायरेक्ट वर्ग करु.. त्यावेळी आम्ही सांगितले होते की, ते पैसे शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करा. शेतकरी स्वत: त्याचा 7/12 कोरा करील, सरकारने तो का करावा, असा आमचा साधा प्रश्न होता. सरकारला जी काही उत्तरे द्यायची आहेत, ती त्यांनी द्यावीत.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.चंद्रकांत पाटील यांनी कितीही आव आणला तरी, या संदर्भातील आकडेवारी स्पष्ट आहे. सन्माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे हे शेतकरी आहेत, त्यांना सर्वकाही माहीत आहे. परंतु ज्या ज्या ठिकाणी अवर्षण आहे त्या त्या ठिकाणी ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. केवळ महाराष्ट्र आणि गुजरातमध्येच ही परिस्थिती आहे अशातला भाग नाही, तर स्पेन आणि ब्राझिलमध्ये सुध्दा ही परिस्थिती निर्माण झाली आहे. त्या ठिकाणी जमिनी हिसकविण्याचे उद्योग सुरु झालेले आहेत. तेथील हजारो एकर जमिनी हिसकविल्या आहेत.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील भाषण करीत असताना सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी मध्येच उठून बोलणे योग्य नव्हते. चुकीचे रेकॉर्डवर येऊ नये म्हणून खुलासा करण्यासाठी मला उभे राहावे लागले. कारण सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील मला उद्देशून म्हणाले की, आपण उभे राहून बोलावे. त्यामुळे मी उभे राहून माझे मत मांडले.

**तालिका सभापती** (प्रा.जनार्दन चांदूरकर) : मला वाटते सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांच्याऐवजी तालिका सभापती म्हणून मी आपल्याला सांगितले असते तर आपण उठून बोलावयास पाहिजे होते.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सहकार मंत्री श्री.चंद्रकांत पाटील यांची अडचण स्वाभाविक आहे. त्यांना दिल्ली आणि या राज्याला सांभाळावयाचे आहे. मला वाटते आपण सन्माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांच्याकडून माहिती घेऊन उत्तर द्यावे. जी आकडेवारी आपल्याला माहीत नाही ती आपण सांगू नये. या सरकारचा शेतीशी संबंध असो अगर नसो, परंतु बदलत्या हवामानाच्या संदर्भात या राज्यात स्वतंत्र विभाग निर्माण करावयास पाहिजे. गाव पातळीपर्यंत त्याचे नियोजन करावे आणि किमान शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणारी यंत्रणा निर्माण करावयास पाहिजे. हे करणे सरकारला सहज शक्य आहे. त्यामुळे मी विचारु इच्छितो की, अशा प्रकारची यंत्रणा शासन निर्माण करणार आहे की नाही ? अशा प्रकारची यंत्रणा निर्माण केल्यास वारंवार येणाऱ्या अवर्षणातून शेतकऱ्यांना काही अंशी तरी वाचविता येईल. कर्जमाफी हा

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील....

वेगळा विषय आहे. परंतु शेतकऱ्यांना वाचविण्याच्या संदर्भात नियोजन करण्याबाबतचा कोणताही मागमूस माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात दिसला नाही, अर्थसंकल्पात दिसला नाही आणि या प्रस्तावामध्ये सुध्दा दिसत नाही. मी तर म्हणेन की, उत्तरामध्ये सुध्दा तो दिसणार नाही. मी स्पेसिफिक विचारतो की, या संदर्भात शासन म्हणून आपण नेमके काय करणार आहात ? नाही तर राज्यातील शेतकरी एवढेच समजेल की, हे राज्य बळीराजाचे नाही. किमान बळीराजाला बुडविणारे, पाताळात गाडणारे हे सरकार नाही, हे सांगण्याची संधी या सरकारकडे आहे. या संधीचा शासन फायदा घेणार की, बळीराजाला गाडण्याचे काम करणारे सरकार आलेले आहे हे सांगणार आहात हा प्रश्न सरकारपुढे आहे, एवढेच या प्रस्तावावरील चर्चेच्या निमित्ताने सांगतो व येथेच थांबतो.

--------

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभागृहापुढील कामकाजाबाबत**

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चा सायंकाळी 6-7 वाजेपर्यंत चालू राहिली तरी हरकत नाही. मला केवळ तीन-चार विधेयके पुरःस्थापित करावयाची आहेत.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चा दुपारी 3.30 वाजेपर्यंत घेण्याचे ठरलेले आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्य या प्रस्तावावरील चर्चेवर ऑनलेग राहतील.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आपण ही विधेयक पुरःस्थापित करण्यास अनुमती द्यावी. त्यानंतर अशासकीय कामकाज घ्यावे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री हेमंत टकले, अनिल तटकरे आणि मी, माननीय सभापतींना विनंती केली की, आजचा दिवस हा अशासकीय कामकाजासाठी निश्चित केलेला असतो. त्यामुळे आजच्या दिवशी अशासकीय कामकाज घ्यावे. अशासकीय कामकाजाच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांच्या हक्कावर गदा येता कामा नये. नियमानुसार अशासकीय कामकाजासाठी 2.30 तासाची वेळ द्यावी. या प्रस्तावावरील चर्चा दुपारी 3.30 वाजेपर्यंत सुरु ठेवावी व त्यानंतर सन्माननीय सदस्यांना ऑनलेग ठेवावे. सभागृहाची वेळ 6.00 वाजेपर्यंत आहे. त्यामुळे सभागृह संपण्याच्या अडीच तासापूर्वी म्हणजेच 3.30 वाजता अशासकीय कामकाजास सुरुवात करण्याचे ठरले आहे. 3.30 वाजता शासकीय विधेयके, अशासकीय कामकाज आणि विशेष उल्लेखाच्या सूचना घेऊन, सन्माननीय सदस्यांना न्याय देण्याची भूमिका माननीय सभापतींनी घेतलेली आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : मला वाटते आता सभागृहाचे नेते माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी विधेयक पुरःस्थापित करावीत.

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : सागरी मासेमारी नियमन (सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. X OF 2015.

(A BILL TO AMEND THE MAHARASHTRA MARINE FISHING REGULATION ACT, 1981.)

श्री.एकनाथराव खडसे ( मत्स्यव्यवसाय मंत्री ) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक-10, महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, 1981 यात सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.प.वि. क्रमांक-10 मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : मासेमारीबाबत (सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. XI OF 2015.

(A BILL TO AMEND THE MAHARASHTRA FISHERIES ACT, 1960.)

श्री.एकनाथराव खडसे ( मत्स्यव्यवसाय मंत्री ) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक-11, महाराष्ट्राचा मासेमारीबाबत अधिनियम, 1960 यात सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक-11 मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

---------

..6..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक
L.C. BILL NO. XII OF 2015.
(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.)

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री ) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक-12, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, 1961 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक-12 मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

---------

..7..

UNCORRECTED COPY/ NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक
L.C. BILL NO. XIII OF 2015.
(A BILL FURTHER TO AMEND THE CODE OF CRIMINAL PROCEDURE, 1973, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक-13, फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973, महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.एकनाथराव खडसे: सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक-13 मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

---------

..8..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**<u>सभागृहापुढील कामकाजाबाबत</u>**

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांचे भाषण झाल्यानंतर ही चर्चा आजच्या दिवसापुरती थांबविण्यात आली. त्यानंतर काही लेईंग झाले. परंतु आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या नियम 93 च्या सूचना आणि विशेष उल्लेखाच्या सूचना राहिलेल्या आहेत. त्यांचा सुध्दा विचार करण्यात यावा.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माननीय सभापतींनी सन्माननीय सदस्यांनी दिलेले औचित्याचे मुद्दे मान्य केलेले आहेत. त्यामुळे आपण औचित्याचे मुद्दे मांडण्यास परवानगी द्यावी.

**तालिका सभापती** : ठीक आहे. या प्रस्तावावरील चर्चा संपल्यानंतर दुपारी 3.30 वाजता सदरहू कामकाज घेऊ.

..9..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने भूजल पातळीत कमालीची घट होऊन दुबार पेरणीचे निर्माण झालेले संकट

**मु.शी.:** राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने भूजल पातळीत कमालीची घट होऊन दुबार पेरणीचे निर्माण झालेले संकट, या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, अमरसिंह पंडित, संजय दत्त, हेमंत टकले, भाई जगताप, जयंतवराव जाधव, जयंत प्र. पाटील, शरद रणपिसे, कपिल पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु.....)

ॲड.रामहरी रुपनवर (नामनियुक्त) : सभापती महोदय, म.वि.प. नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

या प्रस्तावावर बोलत असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी वेगवेगळे मुद्दे मांडले आहेत. जवळजवळ 1800 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. राज्यात पावसाने दडी मारल्यामुळे दुबार पेरणीचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशाप्रकारे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावाच्या अनुषंगाने जे मुद्दे मांडलेले आहेत त्यापेक्षा वेगळे मुद्दे मांडणार आहे. ही समस्या दरवर्षीची आहे आणि या समस्येवर वारंवार चर्चा होत असते. त्यामुळे या समस्येच्या बाबतीत शासनाने सर्वंकष विचार करुन, शेतकऱ्यांची समस्या कायमस्वरुपी मिटविली पाहिजे.

नंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. रामहरी रुपनवर ....

शेती हा आपणा सर्वांचा जिव्हाळ्याचा आणि ग्रामीण भागातील एकमेव उद्योग आहे. त्यामुळे त्याबाबतीत आपण किती गंभीर आहोत हे दाखविण्याची गरज आहे. फक्त बोलण्याने, भाषणाने फार फरक पडेल असे नाही. दरवर्षी समस्या वाढत आहेत, शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. वेगवेगळे प्रश्न निर्माण होत आहेत. शेती व्यवसाय आता कोलमडतो की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मराठवाड्यातील परिस्थिती फार भयानक आहे आणि विदर्भातील परिस्थिती तर त्याहूनही भयानक आहे. निसर्गाचे संतुलन बिघडत चालले आहे आणि त्यामुळे पिकांचेही संतुलन बिघडत चालले आहे. त्यामुळे या संदर्भात विचार करुन नवीन धोरण ठरविण्याची गरज आहे असे माझे मत आहे. राज्यात वेगवेगळे विभाग आहेत आणि त्यात वेगवेगळे प्रश्नही आहेत. काही विभागांत शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण जास्त आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण कमी आहे. कारण पश्चिम महाराष्ट्रात शेतीला जोडधंदे जास्त आहेत. काही शेतकऱ्यांचे कुक्कुटपालन व्यवसाय आहेत तर काही शेतकऱ्यांचे दुधाचे व्यवसाय आहेत. शेतीची जोड असलेले अनेक व्यवसाय आहेत. फळबागा जास्त आहेत. आता या सर्व गोष्टींवर पावसाचा परिणाम झाला आहे. काढायला आलेली द्राक्षे गारांचा पाऊस पडल्यामुळे जमिनदोस्त झाली आहेत. आता हा प्रश्न वेगळाच आहे. काही ठिकाणी पाऊस पडला नाही म्हणून शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत तर काही ठिकाणी गारांचा पाऊस पडला म्हणून बागा जमिनदोस्त झाल्या आहेत. शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. गारांचा पाऊस पडल्यामुळे भुसारच्या मालाचे 4 हजार रुपयांचे नुकसान होईल. पण द्राक्षांच्या मालाचे 4 लाख रुपयांचे, 10 लाख रुपयांचे, 20 लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. दरवर्षी घडत आहे. आपण त्याबाबतीत विचार केला पाहिजे. आम्ही गेल्या वर्षी 26 रुपये लीटर दूध विकत होतो, आज 17 रुपये लीटर दर आहे. माझा स्वतःचा दूध संकलन करणारा मोठा दूध संघ आहे. दूध संघ कसा चालवायचा आणि दुधाला कसे पैसे द्यायचे असा प्रश्न आहे. एका लीटरला 10 पैसे देखील राहत नाहीत अशी स्थिती आहे. हे उद्योग कसे चालणार आहेत ? दूध उत्पादन थांबले आहे, दुधाशी संबंधित उद्योग थांबले आहेत. जनावरे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. रामहरी रूपनवर ....

पाळणे कठीण होणार आहे. सरकारने शेतीच्याच संदर्भात नव्हे तर सर्व बाबतीत निर्णय घेणे गरजेचे आहे. शेतीच नव्हे तर शेतीचे जोडधंदे देखील टिकले पाहिजेत. शेतकऱ्याचा विकास होण्याकरिता शेतीचा विकास झाला पाहिजे. शेतकऱ्याला आधार मिळाला पाहिजे. आज कुक्कुटपालन व्यवसाय देखील मोठ्या प्रमाणात अडचणींत आला आहे. शेळ्यामेंढ्या पाळल्या जातात. परंतू शेळ्यामेंढ्यांची अवस्था देखील वाईट आहे, त्यांच्यावर अनेक रोग पडलेले आहेत. आपल्याला त्यावर सुध्दा उपाययोजना करावी लागेल. शेती पिकली नाही तर शेळ्यामेंढ्यावर देखील फरक पडतो. शेती पिकली नाही तर दुधाच्या धंद्यावर शेतकरी जगतो. शेतकऱ्यांचे हे सर्व जोडधंदे देखील अलीकडच्या काळात अडचणीत आले आहेत, त्या संदर्भात प्रश्न निर्माण झाले आहेत. आपण त्यावर देखील विचार केला पाहिजे. आता रोख नागपूर, विदर्भ या ठिकाणाकडे आहे. नवीन सरकार आल्यापासून आम्ही ऐकत आहोत. पश्चिम महाराष्ट्राला टोमणे मारायचे आणि विदर्भाचे गाणे गायचे असे प्रचलित प्रकार होऊ लागले आहेत. ऊसाचा प्रश्न मोठा झालेला आहे. एफआरपीने दर मिळाला नाही तर काय होणार ? काल सर्व साखर कारखान्यांच्या चेअरमननी जाहीर केले की, पुढील वर्षी 1 हजार रूपये सुध्दा ऊसाला भाव देता येणार नाही अशी परिस्थिती आहे. पश्चिम महाराष्ट्रात असलेल्या खाजगी कारखान्यांनी जाहीर केले आहे की, पुढील वर्षी कोणीही कारखाना सुरू करायचा नाही. आपल्याला एफआरपीप्रमाणे दर देणे शक्य नाही. आज 20 रूपये किलो साखर आहे. हे संतुलन कशामुळे बिघडले आहे याचा अभ्यास होण्याची गरज आहे. मी जगाचा बाजार म्हणत नाही. मागच्या वर्षी 56 रूपये किलो साखर होती आणि आज 20 रूपये किलो साखर आहे आणि आपण सांगत आहात की, साखरेला एफआरपीप्रमाणे दर द्यावा. मी विचारतो की, साखर कारखाना साखरेला एफआरपीप्रमाणे कसा दर देणार ? तो देऊ शकत नाही. आम्ही त्याला पॅकेज द्या म्हटले, पॅकेज न देता कर्जाऊ पॅकेज, असे कसे चालेल ? एवढी मोठी साखर कारखानदारी कोलमडली तर काय करणार ? नवीन इंडस्ट्री उभी करणार आणि जुनी इंडस्ट्री कोसळणार हे योग्य नाही. हा प्रकार काय आहे ? हे योग्य नाही. शेतीच्या बाबतीतील आपले धोरण चुकीचे चालले आहे. शेती महामंडळाशी संबंधित 50 हजार एकर शासनाच्या मालकीची

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. रामहरी रूपनवर ....

शेती पिकविणे बंद केली आणि त्याचे पाणी दुसऱ्याला दिले, जे त्या शेतीला पाणी नव्हते. डोंगर भागात, दऱ्यां-खोऱ्यांत पावसावर शेती पिकते, त्यापेक्षा ते बेकार आहे. एका सुध्दा विहिरीला पाणी नाही. शेती महामंडळाच्या जमिनीला इरिगेशनचे पाणी मिळायचे आणि म्हणून शेतकऱ्यांच्या जमिनीला पाझराचे पाणी मिळून विहिरी चालायच्या. आमच्याकडे विहिरीला 2-2 मोटारी चालायच्या, आज चिमणीला पिण्यासाठी देखील पाणी नाही. संपूर्ण जमीन जिराईत झाली आहे. शेती महामंडळाला आमच्याच जमिनी 50 एकर दिल्या. शेजारी आमची 20 एकर जमीन आहे. आमचीच जमीन जी 50 एकर होती ती भिजत होती. त्यामुळे आमच्या शेतीला पाणी मिळत होते. आज ते पाणी बंदच झाले आहे. आता आमच्याच जमिनी आम्हाला परत दिल्या. पण अजूनही पाण्याचा हक्क नाही. पाणी कुठे गेले ? पाणी दुसऱ्याला दिले. जे पट्टे 60 टक्के, 40 टक्के होते, ते 50 टक्के केले, ते कोणी केले हे बघितले पाहिजे. ते बेकायदेशीर केले. शेती महामंडळाने सर्वच पाणी दुसरीकडे हलविले, ते पुन्हा शेती महामंडळाच्या विभागात आले पाहिजे आणि तरच तो शेतकरी जगणार आहे. शेती महामंडळाच्या एरियामध्ये इरिगेशन आहे. आता 80 हजार एकर जमीन आहे, त्यापैकी खंडकऱ्यांना देऊन 50 हजार एकर शेती तुमच्याकडे राहिली आहे. माझे म्हणणे आहे की, तुम्ही तेथे विद्यापीठ करावे किंवा शासनाच्या कृषी विद्यापीठाने तरी योजना करावी नाही तर शेती महामंडळ तरी पुन्हा सुरू करावे. आपण अशाप्रकारे करावे. पण आमच्या परिसरातील पाणी आम्हाला द्यावे, आमच्या परिसरातील जमीन भिजली पाहिजे, त्याचे पर्कोलेशन आमच्या विहिरीला आले पाहिजे. आपण नवीन बागायत, धरणे घेण्याचा प्रयत्न करतो. 100 वर्षांपूर्वीपासून जमिनी भिजत आहेत, त्यांना उजाड करण्याचा प्रयत्न सुरू आहे. पुढचे पाठ आणि मागचे सपाट असे चालले आहे. तुम्हाला माहीत आहे, तुम्ही दौरा केला आहे. मी आपल्याला अजून लक्षात आणून देतो की, त्यावेळची परिस्थिती वेगळी होती आणि आजची परिस्थिती वेगळी आहे. तेथे पाणीसुध्दा प्यायला नाही. माण तालुक्यात जशी परिस्थिती आहे तशी आमच्याकडे आहे. तो सर्व डोंगराळ भाग आहे. इरिगेशनचे पाणी आले म्हणून तो भाग बागायत झाला. पर्कोलेशन बंद झाले आणि तो पुन्हा जिराईत झाला. खालच्या भागाला पाणी नेऊन तो भाग बागायत केला. इरिगेशनचा टापू होता तो



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. रामहरी रुपनवर ....

उजाड झाला आणि ते केवळ शासनाच्या धोरणामुळे झाले आहे. शेती महामंडळ बंद केल्याने उरलेले पाणी मागणारे वाढले, त्यांनी नवीन योजना काढून ते पाणी त्यांच्याकडे नेले. आमचे म्हणणे हेच आहे की, ज्याच्या हक्काचे पाणी आहे ते त्याला द्या. धरणाच्या बाजूला असलेल्यांना पाणी नाही आणि तेथून पाणी खाली जाते. आपण हे धोरण बदलले पाहिजे. (अडथळा) पिकायचे बंद झाले. आता तुम्ही शेती करायला देत आहात. सन 2008 पासून परवापर्यंत ते बंद होते. आता देत आहात, यवतमाळचा माणूस साताऱ्यात शेती करायला कसा येणार, कसे शक्य आहे ? दिले आहे ते चालत नाही. पिके आल्यावर समजेल. वॉचमन बंदुका घेऊन फिरायचे तरी पिके राहत नव्हती. गावातील माणसाला शेती करू देत नाहीत तर नागपूरच्या माणसाल कोण शेती करू देणार आहे ? अडचणी आहेत. धोरणात्मक बदल केले पाहिजेत असे माझे मत आहे. शेतकऱ्यांना मिळणारे जे आहे ते कमी दिले जाते. वजनकाट्यात, दरात मारले जाते. शासनाकडून त्यांना मदत देत नाही आणि जे पिकविले आहे त्याला दर मिळत नाही. तुम्ही त्यांच्यासाठी धोरण ठरविणार का ? शेतकऱ्याने व्यापाऱ्याला विकलेला मालाच्या संदर्भात व्यापाऱ्याला पोत्यामागे 100 रुपये जास्त मिळतात. शेतकऱ्याला मात्र 100 रुपये कमी मिळतात. बाजारात कांदा विकण्यास नेला तर शेतकऱ्याला 500 रुपये मिळतात आणि दुसऱ्याच दिवशी व्यापारी तोच कांदा 700 रुपयांनी विकतात. व्यापारी कोंडी करीत आहेत. त्यामुळे पणनच्या संदर्भात काही सुधारणा केल्या पाहिजेत. शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला भाव मिळाला पाहिजे. परंतु त्यांना खरा भाव मिळत नाही. उत्पादक व प्रत्यक्ष ग्राहक यांच्या किंमतीमध्ये खूप तफावत आहे. मधील दर कोण खात आहे हे सुध्दा पाहिले पाहिजे. आपण शेतकऱ्याला देऊ नका. पण दुसरे कोण आहे त्याला तरी थांबवा. आपण त्या संदर्भात यंत्रणा निर्माण केली पाहिजे असे माझे म्हणणे आहे. कृषी साहित्याचे वाटप योग्य माणसाला होत नाही. जिल्हा परिषदकडून नांगरणी, फवारणी यंत्रे वाटली जातात. जिल्हा परिषद सदस्यांना कोटा ठरवून दिला जातो. आपण त्याबाबत धोरण ठरवावे की, गरजुंना साहित्य मिळाले पाहिजे, अयोग्य माणसला मिळायला नको.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रुपनवार........

मदत करीत असताना 100 रुपये आर्थिक मदत करण्याऐवजी 100 रुपयांचा पंप दिला तर ती मदत जास्त उपयुक्त ठरेल. त्याच्या खिशात पैसे जाण्याचे थांबेल आणि शेतीला उपयोगी असणारी साधने त्याला मिळतील.

**तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे) :** ही चर्चा आता आपण येथे थांबवितो आहोत. सन्माननीय सदस्य ॲड.रामहरी रुपनवार हे ऑनलेग राहतील.

आता आपण औचित्याचे मुद्दे घेऊ.

-------------

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** औचित्याचे मुद्दे

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शिंदे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.जगन्नाथ शिंदे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, कल्याण तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कल्याण या उपक्रमाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले असताना व राज्यात हजारो विद्यार्थी आय.टी.आय.प्रवेशापासून वंचित असताना कल्याण आय.टी.आय.फक्त प्रशासन आणि शासनाच्या अनास्थेमुळे अद्याप सुरु होऊ शकले नसल्याने या परिसरातील विद्यार्थ्यांचे नुकसान होत असून शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने तत्काळ याची गंभीर दखल घेऊन कल्याण येथील आय.टी.आय.सुरु करण्याबाबतची कार्यवाही करावी, असा माझा औचित्याचा मुद्दा आहे.

-------------

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, शासनमान्य शाळांमध्ये आणि खाजगी शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दैनंदिन कामाव्यतिरिक्त अनेक अशैक्षणिक कामे दिली जात असतात. गृह विभागाने त्यांच्या दिनांक 12 मे, 2015 रोजीच्या शासन निर्णयान्वये फौजदारी स्वरूपाच्या गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी व घटनास्थळी उपस्थित राहून पंचनामा करण्याकामी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांबरोबरच शिक्षकांना पंच म्हणून घेण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. शासकीय कर्मचाऱ्यांबरोबरच संबंधित पोलीस ठाण्याकडून शिक्षकांनाही पंच म्हणून बोलाविले जात आहे. शाळेत जायचे, शिकवायचे, शासनाची अन्य कामेही करायची आणि त्यानंतर पुन्हा पंच म्हणून जायचे, कोर्टात फेऱ्या मारायच्या, अशी शिक्षकांची परिस्थिती झाली आहे. पंच म्हणून काम करण्यास गृह विभागाकडून शिक्षकांवर सक्ती करण्यात येत आहे. ती रद्द करण्यात यावी. शिक्षकांना या कामातून मुक्त करण्यात यावे. गंभीर बाब ही आहे की, या राज्यातील काही शिक्षकांविरोधात पंच म्हणून कामास गेले नाहीत, उपस्थित राहिले नाहीत म्हणून फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. याबाबत मी स्वतः गृह मंत्री महोदयांशी चर्चा केली आहे. हा अतिशय गंभीर विषय आहे. गृह विभागाचा दिनांक 12 मे, 2015 रोजीचा शिक्षकांसंबंधीचा शासन निर्णय तातडीने रद्द करण्यात यावा, अशा प्रकारची मागणी मी या औचित्याच्या मुद्याव्दारे करीत आहे.

------------

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मुंबईत गोरेगाव ते दहिसर परिसरात लेप्टोस्पायरोसिस या साथीच्या आजाराने 11 जणांचा एका आठवड्यात मृत्यू होणे, या साथीच्या आजाराने कहर केला असताना जुलै, 2015 च्या 15 दिवसात स्वाईन फ्लुमुळे 4 जणांचा मृत्यू झाला असून पंधरा दिवसात स्वाईन फ्लुच्या रुग्णांची संख्या 60 वर पोहाचली आहे. वाढलेल्या तापमानामुळे स्वाईन फ्लुच्या रुग्णांच्या व मृत्युच्या संख्येत झपाट्याने वाढ होत आहे. फेब्रुवारी, 2015 मध्ये संपूर्ण राज्यात स्वाईन फ्लुची साथ पसरुन या साथीमध्ये मुंबईतील 18 व बाहेरच्या शहरातून आलेल्या 39 जणांचा मृत्यू झाला आहे. आता पुन्हा पावसाने दडी मारल्याने हा आजार फोफावून दिनांक 13 जुलै, 2015 रोजी एकाच दिवसात दोन महिलांचा मृत्यू झाला आहे. मुंबई शहरात लेप्टो, स्वाईन फ्लु, मलेरिया, कावीळ, डायरीया इत्यादी साथीचे आजार आटोक्यात आणण्याची उपाययोजना करण्यास प्रशासनाला अपयश आले आहे. याकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्यामुळे सर्वसामान्य जनतेचे नाहक बळी जात असल्याने जनतेमध्ये भीतीचे व चिंतेचे वातावरण आहे. राज्य शासनाने यामध्ये लक्ष घालून स्थानिक प्रशासनाने या आजारांवर प्रतिबंध करण्यासाठी विशेष मोहीम राबवून तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता असल्याची बाब मी औचित्याच्या मुद्याव्दारे शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे.

-------------

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, "संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम, संत गजानन महाराज यांच्यासह राज्यातून येणाऱ्या दिंड्यांचे आषाढी वारीसाठी पंढरपूर, जिल्हा सोलापूर कडे प्रयाण सुरु झालेले आहे. सोलापूर जिल्ह्यातील भीषण दुष्काळ आणि तीव्र पाणी टंचाई यामुळे दिंडीतील भाविकांना पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई भासत आहे. मौजे बोरगाव, तालुका माळशिरस येथे श्री संत तुकाराम महाराज यांची दिंडी मुक्कामी आहे. दिंडीतील भाविकांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून बोरगाव ग्राम पंचायतीने जिल्हा प्रशासनाकडे पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची मागणी केली आहे. अशा पध्दतीने पालखी मार्गावरील अनेक ग्राम पंचायती व दिंडी व्यवस्थापकांनी भाविकांसाठी शासकीय टँकर मिळण्याची विनंती जिल्हा प्रशासनाकडे केली आहे. दिंडीमधील भाविकांना टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यास मंजुरी दिलेली नाही. यामुळे वारकरी संप्रदाय, दिंडी व्यवस्थापक आणि ग्रामस्थांमध्ये जिल्हा प्रशासनाविरुध्द तीव्र असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. जिल्ह्यातील टंचाईग्रस्त भागातही टँकर न मिळणे, तहानलेल्या ग्रामस्थांना टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यास अक्षम्य विलंब होणे, यामधून मार्ग काढण्यासाठी सर्व पालखी मार्गावर वारकऱ्यांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात यावी, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याव्दारे शासनास करीत आहे.

--------------

...6.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गो-हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मी सोमवार पासून या औचित्याच्या मुद्याची सूचना दिली असून आज हा मुद्दा सभागृहात मांडण्याची संधी मला मिळाली आहे. आता माननीय गृह राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत.

सभापती महोदय, कोणत्याही महत्वाच्या घटनेचा तपास सी.बी.आय.कडे दिला जातो त्यावेळी आपण असे नेहमीच म्हणत असतो की, आता तपास सी.बी.आय.च्या अखत्यारित आहे.

सभापती महोदय, डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्येचा तपास सी.बी.आय.कडे सोपविल्यानंतर सी.बी.आय.ने तपासाला मदत करण्यासाठी महाराष्ट्र पोलीसांमधील पुणे आणि मुंबई पोलीस दलातील चार अधिकारी आणि काही कर्मचाऱ्यांची मागणी केली होती. तसेच, पुणे पोलीस दलातील निरीक्षक दर्जाचे अधिकारी समांतर तपास करीत होते. परंतु, सी.बी.आय.च्या मागणीप्रमाणे राज्य पोलिसांनी पोलीस अधिकारी सी.बी.आय.ला दिलेच नाहीत. पुण्यामधील निरीक्षक दर्जाचो अधिकारी, जे समांतर तपास करीत होते, त्यांना सहायक आयुक्त पदी पदोन्नती मिळाल्यामुळे त्यांचा तपासातील सहभाग संपलेला आहे. भरीसभर म्हणून सी.बी.आय.चे उप अधीक्षक श्री.चौहान दिनांक 2 जून, 2014 पासून तपास अधिकारी म्हणून काम करीत होते. पण त्यांची दिनांक 4 डिसेंबर, 2914 ला बदली जाहीर झाली असून पदाचा कार्यभार कुणाकडे सोपवावा, हे स्पष्ट न झाल्यामुळे त्यांना त्या पदाची कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे देता आला नाही. पुन्हा दिनांक 24 फेब्रुवारी, 2015 ला श्री.चौहान यांची चेन्नई येथे बदली झाल्याचे आदेश आले आहेत.

सभापती महोदय, ही संपूर्ण परिस्थिती बघितली तर तपास अधिकारी श्री.चौहान यांची बदली झाली आहे. महाराष्ट्र पोलिसांकडील 4 अधिकारी अद्याप गृह विभागाने सी.बी.आय.ला दिलेले नाहीत. पुणे पोलीस दलातील निरीक्षकांना बढती मिळाली असल्यामुळे त्यांचा तपासातील

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सहभाग संपुष्टात आला आहे. गेल्या सहा महिन्यांपासून डॉ.नरेंद्र दाभोळकर हत्येच्या तपासावर

...7....



डॉ.नीलम गो-हे.......

उच्च न्यायालय देखरेख ठेऊन आहे. महाराष्ट्र पोलिसांकडून याबाबत त्वरेने आणि ताबडतोब अंमलबजावणी होऊन योग्य ते तपास अधिकारी सी.बी.आय.ला देण्यात यावेत, याकडे मी या औचित्याच्या मुद्याव्दारे शासनाचे लक्ष वेधित आहे.

--------------

....8.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, नागपूर शहरात असलेले वन विभागाचे "वन उद्यान", हे नागपूरचे जपानी गार्डन म्हणून ओळखले जाते. हे उद्यान म्हणजे निसर्गप्रेमी, पक्षीप्रेमी व आरोग्य निरोगी व तंदुरूस्त रहावे यासाठी दररोज सकाळी नियमितपणे मॉर्निंग वॉक करण्यासाठी येणाऱ्या बहुसंख्य लोकांसाठी निसर्गाचे एक वरदान म्हणून ओळखले जाते. तथापि, या उद्यानाच्या हिरवळीला आज ग्रहण लागल्यासारखे झाले आहे. वन संरक्षण कायदा 1980 नुसार वन विभागाच्या उद्यानाला विनामुल्य पाणी पुरविण्याची जबाबदारी त्या परिसरातील स्थानिक स्वराज्य संस्थेची असतानाही नागपूर महानगरपालिकेने वन विभागाला सन 2008 पासून पाण्याचे बिल पाठविले असून आतापर्यंत 3 कोटी रुपये बील वन विभागाकडे थकले असल्याने महानगरपालिकेने मीटर कापले असून वन उद्यानातील विविध प्रकारची झाडे पाण्याअभावी सुकली आहेत. पाण्याअभावी पक्षांची चिवचिवाट देखील थांबली आहे. वन विभाग व महानगरपालिका या दोन्ही यंत्रणा शासनाचाच भाग असल्याने तसेच माननीय मुख्यमंत्री हे नागपूरचेच असल्याने त्यांनी या प्रकरणी स्वत: लक्ष घालून जपानी गार्डनमधील बंद केलेला पाणी पुरवठा पुन्हा नियमितपणे सुरु करण्याचे दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्यांव्दारे शासनास करीत आहे.

--------------

यानंतर श्री.बोरले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** नियम 93 अन्वये सूचना

**तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे)** : आज शुक्रवार, दिनांक 17 जुलै, 2015 रोजी मला प्राप्त झालेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनेसंदर्भातील निर्णय सचिव वाचून दाखवतील.

उप सचिव : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "राज्यातील विनाअनुदानित शाळांमधील हजारो शिक्षक गेली दहा-बारा वर्षे पगाराविना असणे, दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 नंतरच्या शिक्षकांना सध्या कोणतीही पेन्शन योजना लागू झालेली नसणे, पूर्णवेळ सहायक शिक्षक परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झाल्यानंतरही वेतन मिळत नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी "राज्यातील महसूल अधिकारी व पुरवठा अधिकारी वाद आणि रेशन दुकानदारांचा संप यामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्था कोलमडलेली असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "सोलापूर येथील शासकीय समाज कल्याण कार्यालयात मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या ऑनाईन शिष्यवृत्तीमध्ये करोडो रुपयांचा अपहार झाल्याप्रकरणी पुण्याच्या मास्टेक कंपनीमधील 34 जणांविरुद्ध सदर बाजार पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.दीपकराव साळुंखे यांनी "राज्यात मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी राज्य शासनाने जानेवारी, 2014 मध्ये सुरु केलेली 'सुकन्या योजना' प्रभावीपणे राबविण्यासाठी करावयाची कार्यवाही" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

उप सचिव.........

सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी "अंबरनाथ येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या धिकाऱ्यांनी 70 एकर जागा मे.रिलायबल कंपनीला नियम धाब्यावर बसवून देणे त्यामुळे महामंडळाचे झालेले आर्थिक नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी "अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील शालेय विद्यार्थीनींवर शिक्षकांकडून झालेला अत्याचार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी "ठाणे जिल्ह्यातील नालासोपारा येथील विद्यार्थ्याचा अंधश्रद्धेच्या माध्यमातून बळी देण्याचा उघडकीस आलेला धक्कादयक प्रकार, याकडे पोलिसांनी केलेले दुर्लक्ष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी "राज्यातील शासकीय, निमशासकीय अनुदानित संस्थेतील ओबीसी कर्मचाऱ्यांसाठी नॉन-क्रिमीलेअरची मर्यादा रुपये 6 लाख असणे, तथापि, शिष्यवृत्तीसाठी 4.5 लाख रुपयांची असलेली मर्यादा रुपये 6 लाख करण्याकरिता अद्याप शासन निर्णय निर्मित न करण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

--------

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** विशेष उल्लेखाच्या सूचना

**तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे)** : आता विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात येतील.

श्री.अनिल तटकरे (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, "कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) कळंब-पाशाने-वांगणी या मार्गावरील रस्त्यावर अनेक लहान मोठे खड्डे पडल्याने व स्थानिक ठेकेदारांनी कामे निकृष्ट दर्जाची केल्याने रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाल्याने कर्जत एसटी डेपो आगाराने या मार्गावरील एसटी बस सेवा बंद केल्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थी, नोकरदार व इतर ग्रामस्थ, प्रवाशांचे मोठ्या प्रमाणावर हाल होत आहेत, या रस्त्याच्या दुरूस्तीसाठी रूपये 12 लाख इतका खर्च झाला असूनही वाहतुकीच्या दृष्टीने निरूपयोगी ठरला आहे. त्याच प्रमाणे, वाकणी-पाली मार्गावरील आंबा नदीवर बांधलेल्या पुलाचे सिमेंटचे कठडे तसेच, लोखंडी पाईप तुटून नदीत पडल्याने सदर पुलावरून जा-ये करताना जीव मुठीत धरून पुलपार करावा लागत असल्याने लोकांना त्रास सहन करावा लागत असतो, ही बाब विचारात घेता शासनाने या प्रकरणी लक्ष घालून सदर रस्त्याची व पुलाची दुरूस्ती करण्याच्या दृष्टीने शासनाने त्वरित कार्यवाही करावी," अशी मी विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जगन्नाथ शिंदे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, "कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात झालेल्या अनधिकृत बांधकामांची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या निवृत्त न्यायमूर्ती अग्यार यांच्या अध्यक्षतेखालील समितीने 23 हजार पानांचा अहवाल सन 2009 मध्ये राज्य शासनास सादर केलेला असताना सहा वर्षापासून अद्याप सदर अहवालाबाबत शासनाने आपली भूमिका जाहीर न केल्याने माहिती अधिकारात अहवाल मागविल्यास शासकीय कारणे देऊन सरकारी अधिकारी सदर अहवाल दाबत असल्याने, आता राज्य माहिती आयुक्तांनीच सदर अहवाल जनतेसाठी त्वरित खुला करण्याचे आदेश दिलेले असताना शासनाने त्याची विनाविलंब अंमलजावणी करावी," अशी मी विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

---------

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, "राज्यभरातील महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छतागृहांची उपलब्धता नसल्याने महिलांची कुचंबना होणे या पार्श्वभूमीवर गर्दीच्या ठिकाणी रस्त्यावर महिलांसाठी स्वच्छतागृहे उभारण्यात यावीत, असे आदेश माननीय उच्च न्यायालयाने शासनास देऊन मुंबईसह राज्यभरातील महानगरपालिका क्षेत्रात महिलांसाठी स्वच्छतागृहे न उभारल्याने होत असलेला त्रास, परिणामी महिला वर्गात निर्माण झालेला असंतोष व संतापाची भावना याबाबत राज्यभरातील महानगरपालिका क्षेत्रात महिलांसाठी गर्दीच्या व मोक्याच्या ठिकाणी तातडीने स्वच्छतागृहे उभारण्याची कार्यवाही करण्यात यावी," अशी मी विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

---------

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, "राज्यात अपंगांसाठी शैक्षणिक आणि इतर सोईसुविधा विभागामार्फत पुरविल्या जातात. अपंगांच्या शिक्षण आणि पुनर्वसनामध्ये अंध, पोलिओ अफेक्टेड, मेंटली रिटायर्ड अशा सर्वांची सोय केली जाते. परंतु गतिमंद मुलांकडे शासनाने अद्याप लक्ष दिलेले नाही. त्यांची शैक्षणिक प्रगती इतर मुलांप्रमोणे होऊ शकत नाही. काही मुले एका वर्षात जो शालेय अभ्यासक्रम पूर्ण करु शकतात तो अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी त्यांना तीन-चार वर्षे लागतात. त्यांच्यासाठी वेगळ्या शाळा लागतात आणि ही मुले प्रौढ वयात आल्यानंतर त्यांच्या अडचणी अधिक वाढतात. या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल झालेली आहे. यासाठी तातडीने सामाजिक न्याय विभाग व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने अशा मुलांचा शोध घेऊन त्यांच्यासाठी काय करता येईल, यासाठी एक अभ्यासगट नेमून त्या अभ्यास गटाने शासनाकडे शिफारशीसह लवकरात लवकर अहवाल सादर करावा आणि त्यानंतर शासनाने कार्यवाही करावी," अशी मागणी मी विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

--------

..7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, "महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाची मुदत डिसेंबर, 2014 मध्ये संपलेली आहे. आता 7 महिने झाले तरी राज्यात मागासवर्ग आयोग नाही. भारतीय संविधानाच्या तरतुदीनुसार आणि सुप्रिम कोर्टाच्या आदेशानुसार या आयोगाची स्थापना झाली आहे आणि तो कायम आहे. त्याचे तातडीने पुनर्गठन करावे," अशी मागणी मी विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, "राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना नॉन क्रिमिलेअरच्या आधारे फीची सवलत मिळते, प्रतिपूर्ती मिळते. केंद्र शासनाची प्रतिपूर्तीसाठी 6 लाख रुपये आणि प्रवेशासाठी सुद्धा 6 लाख रुपये उत्पन्नाची मर्यादा आहे. परंतु, राज्यात मात्र प्रवेशासाठी 6 लाख रुपये नॉन क्रिमिलेअरची उत्पन्न मर्यादा आहे. पंरतु, प्रतिपूर्तीसाठी मात्र 4.5 लाख रुपयेच उत्पन्न मर्यादा ठेवण्यात आलेली आहे. मागील अधिवेशनात या संदर्भात विषय उपस्थित करण्यात आला होता. मंत्री महोदयांनी आम्हाला सभागृहात ठोस आश्वासन दिले होते की, नवीन शैक्षणिक वर्ष 15 जून रोजी सुरु होईल. नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी या संदर्भातील आदेश निघालेला असेल आणि आम्ही नॉन क्रिमिलेअरची मर्यादा प्रतिपूर्तीसाठी सुद्धा 6 लाख रुपये करू परंतु, त्यांनी अद्याप या संदर्भात कोणताही आदेश काढलेला नाही. मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे नॉन क्रिमिलेअरच्या संदर्भात नुकसान होत आहे. म्हणून माझी या निमित्ताने विनंती आहे की, सामाजिक न्याय मंत्र्यांनी तातडीने याची दखल घ्यावी आणि नॉन क्रिमिलेअरच्या उत्पन्नाच्या आधारे तातडीने प्रतिपूर्तीसाठी जी मर्यादा वाढविणे आवश्यक आहे ती वाढविण्याबाबत निर्णय घ्यावा," अशी मी विशेष उल्लेखाद्वारे विनंती करतो.

-------

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय,"सोलापूर-औरंगाबाद-धुळे राष्ट्रीय महामार्ग क्र.211 च्या चौपदरीकरणाच्या कामास शासनाने मंजुरी देणे, चौपदरीकरण कामाच्या भूसंपादनासाठी निधी उपलब्ध असतानाही जिल्हा प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे अद्याप भूसंपादनाचे काम तीन वर्षापासून प्रलंबित असणे, बीड जिल्ह्यात केवळ 65 टक्के भूसंपादनाचे काम पूर्ण होणे, भूसंपादनाच्या कामास विलंब होत असल्यामुळे चौपदरीकरणाचे काम मोठ्या प्रमाणावर रखडणे, भूसंपादन प्रक्रियेस झालेल्या विलंबामुळे शासनावर मोठा आर्थिक ताण पडणे, दिवसें-दिवस जमिनीच्या किमतीत होणारी वाढ यामुळे अधिक मावेजा देण्याची वेळ शासनावर येणे. वारंवार उद्दिष्ट देऊनही संबंधित अधिकाऱ्यांकडून उद्दिष्टांची पूर्तता न होणे, भूसंपाद प्रक्रियेस झालेल्या विलंबामुळे चौपदरीकरण कामास होत असलेला अक्षम्य विलंब, यामुळे रस्ते अपघातात झालेली लक्षणीय वाढ, भूसंपादन प्रक्रियेस झालेल्या विलंबाची चौकशी करुन भूसंपादनाचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी मागणी या विशेष उल्लेखाद्वारे करण्यात येत आहे."

--------

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, " गेल्या 15 वर्षात कल्याण-डोंबिवली परिसरात ज्या वेगाने नागरीकरण झाले त्याप्रमाणात नागरी सुविधा झालेल्या नसणे, भविष्याच्या दृष्टीकोनातून रस्त्याचा विकास झालेला नसणे, वाहतुकीची समस्या अत्यंत बिकट असून तासनतास वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना त्रास होत आहे. सिंग्नल असूनही बरेचसे सिग्नल बंद असणे, वाहतूक पोलिसांची संख्या अत्यंत अपुरी असणे, कल्याण स्टेशन परिसरात वाहनांची अवैध वाहतुकीमुळे मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असणे, कल्याण डोंबिवली परिसरात पर्यायी रस्ते उपलब्ध नसणे, नादुरूस्त रस्त्यांची कामे झाल्यानंतर रस्त्यांच्या मध्ये जेसीबीच्या गाड्या उभ्या असणे, रॅबिट उचलला गेल्या नसल्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. गोविंदवाडी बायपास रस्त्याचे काम रखडले असणे, वाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणात वापर होणाऱ्या दुर्गाडी ब्रिजची दुरवस्था झाली असून तो धोकादायक बनला असून या ब्रिजची दुरूस्ती व त्या शेजारीच नवीन ब्रिजचे काम तसेच गोविंदवाडी बायपास रस्ता त्वरीत झाल्यास बरीचशी वाहतुकीची समस्या सुटणार असणे.

कल्याण परिसरात असलेले आधारवाडी डम्पिंग ग्राऊंडची क्षमता संपली असणे, या डम्पिंग ग्राऊंडमध्ये नियमाला धरून डम्पिंग होत नसणे, शास्त्रशुध्द पध्दतीने कचऱ्याची विल्हेवाट करण्यात येत नसणे, उबंरेडला डम्पिंग ग्राऊंडसाठी पर्यायी जागा सूचविण्यात आली परंतु तेथील नागरिकांचा विरोध असल्याने डम्पिंग ग्राऊंडचा प्रश्न प्रलंबित राहणे, त्यातच आधारवाडी डम्पिंग ग्राऊंड मधील कचरा जाळला जात असल्याने जवळच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्यांवर विपरीत परिणाम होत असणे, या दोन्ही समस्यांमुळे नागरिकांमध्ये असंतोष पसरला असून याबाबत शासनातर्फे त्वरीत कार्यवाही व्हावी अशी मी विशेष उल्लेखाद्वारे मागणी करीत आहे."

-------

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, आजचा विशेष उल्लेख एका वेगळ्या विषयाबाबत आहे. यामध्ये विशेषत: बऱ्याच ठिकाणी स्त्रिया जेथे कपडे बदलतात त्या ठिकाणी गुपचूप कॅमेरा ठेवणे किंवा वेगवेगळ्या पध्दतीने कॅमेरा लपविणे अशा घटना सातत्याने होत आहेत.

सभापती महोदय "मुंबईतील मढ येथील एका बंगल्यामध्ये टिव्ही मालिकेचे शुटिंग सुरु असताना मालिकेत काम करणाऱ्या अभिनेत्रींना कपडे बदलण्यासाठी असलेल्या खोलीत अभिनेत्री कपडे बदलण्यासाठी गेली असता तिच्या सहाय्यकाचा मोबाईल सापडला त्या मोबाईलमध्ये व्हिडीओ रेकॉर्डींग सुरु असल्याची धक्कादायक घटना शनिवार दिनांक 11/07/2015 रोजी उघडकीस आली आहे. चौकशी केली असता सदर मोबाईल वेषभुषाकार अन्सारी याचा असल्याचे समजले आहे. यासंदर्भात मालवणी (मुंबई) पोलीस स्टेशनमध्ये विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. यामध्ये लगेच त्या व्यक्तीची जामिनावर सुटका झाली आहे. याबाबत ठोस कारवाई न झाल्यामुळे अशा घटना करणाऱ्या लोकांना मोकळे रान मिळाले आहे, अशा प्रकारे यापूर्वीही व्हीडीओ शुट केल्याचे उघडकीस आले आहे. या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कारवाई करण्याकरिता मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

--------

....4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थामधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखाली लोकसेवांमधील नियुक्तीचे किंवा पदांचे) आरक्षण विधेयक.

L.C. BILL NO. XIV OF 2015.

(A BILL TO PROVIDE FOR RESERVATION OF SEATS FOR ADMISSION IN EDUCATIONAL INSTITUTIONS IN THE STATE AND OF APPOINTMENTS OR POSTS IN THE PUBLIC SERVICES UNDER THE STATE TO THE SPECIAL BACKWARD CATEGORY-A (SBC-A) IN THE STATE OF MAHARASHTRA FOR THEIR ADVANCEMENT AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक 14 महाराष्ट्र राज्यातील विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता, त्यांच्या प्रगतीसाठी राज्यातील शैक्षणिक संस्थामधील जागांच्या प्रवेशाकरिता आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांच्या किंवा पदांच्या आरक्षणासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभापती महोदय, या विषयावर ज्यावेळी सविस्तर चर्चा होईल त्यावेळी माननीय विरोधी पक्ष नेते व आम्ही सर्व सदस्य या विषयावर बोलणार आहोत. सत्ताधारी पक्षाने कसे वागावे याचे देखील काही नियम ठरले पाहिजेत. आम्ही नागपूर येथील अधिवेशनात मुस्लिम आरक्षणाचा विषय उपस्थित केला होता. मुस्लिम आरक्षणाच्या अध्यादेशाची मुदत संपते हे आम्ही लक्षात आणून दिले. तो अध्यादेश लॅप्स करु नका अशी आम्ही मागणी केली होती. मागील अधिवेशनात मी यासंदर्भातील अशासकीय विधेयक मांडले होते. अध्यादेश लॅप्स होत असेल तर विधेयक मंजूर करा. त्यावेळी सर्व सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी गोंधळ घातला व हे विधेयक सभागृहात येऊ शकले

नाही. पुन्हा अध्यादेश सरकारने काढला नाही. मंत्री महोदय श्री.चंद्रकांत पाटील आपणाकडून आमची अशी अपेक्षा नव्हती.

...5...



श्री.शरद रणपिसे...

सभापती महोदय, छत्रपती शाहू महाराजांनी 1902 मध्ये मुस्लिम समाजाला आरक्षण दिले होते. दिनांक 23 एप्रिल, 1942 रोजी त्यावेळच्या बॉम्बे प्रोव्हीन्शिअल ॲक्टनुसार 228 समाजाला मध्यम आणि मागासवर्गीय म्हणून घोषित केले. त्यामध्ये मुस्लिम समाजाचा देखील समावेश होता. अडीच हजार वर्षापूर्वी चार मजली इमारत उभी केली होती. या चार मजल्याच्या इमारतीत उर्वरित तीन वर्गाने शुद्र, वैश्य, क्षेत्रिय या सर्वांनी आपली जबाबदारी पार पाडली आहे. फक्त वरच्या वर्गाने या तीन समाजाला सुशिक्षित केले नाही. या लोकांना विद्या दिली नाही. म्हणून आरक्षण आलेले आहे. महात्मा फुले यांनी असे सांगितले होते की, विद्येविना मती गेली, मतीविना निती गेली, नितीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.

मंत्री महोदय, तुम्ही ज्यांना मानता ते भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष श्री.अमित शहा, माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी अशी घोषणा केली आहे की, 'सबका साथ सबका विकास', त्यामुळे आपण मुस्लिम समाजाला बरोबर घेणार नाही काय ? आपण हे करून दाखवा व हा विषय संपवावा. आम्हाला अशासकीय विधेयक मांडण्याची गरज पडणार नाही. माननीय विरोधी पक्ष नेत्यांना या ठिकाणी विषय मांडण्याची व तुमच्या विरोधात बोलण्याचे काही कारण राहणार नाही. त्यामुळे तुम्ही असा धार्मिक जातीवाद करु नका. सभापती महोदयांनी मला बोलण्यास परवानगी दिली त्याबाबत मी आपला आभारी आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष (श्री.दिपकराव साळुंखे)** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.प.वि.क्रमांक 14 मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

या नंतर श्री.भोगले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) (सुधारणा) विधेयक

**मु.शी.:**

L.C. BILL NO. XV OF 2015

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STATE PUBLIC SERVICES (RESERVATION FOR SCHEDULED CASTES, SCHEDULED TRIBES, DE-NOTIFIED TRIBES (VIMUKTA JATIS), NOMADIC TRIBES, SPECIAL BACKWARD CATEGORY AND OTHER BACKWARD CLASSES) ACT, 2001.)

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2015 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 15 महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, 2001 यात सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभापती महोदय, एस.सी., एस.टी., विमुक्त जाती, भटक्या जमाती, धनगर, ओबीसी या सर्व समाजाला भरती, बढती मिळावी यासाठी प्रत्येक पॉईंटवर आरक्षण आहे. मॅटने निर्णय दिल्यानंतर प्रकरण हायकोर्टात गेले. हायकोर्टाने मॅटमध्ये जा असे सांगितले. नाशिक जिल्हयातील अन्नधान्य घोटाळा प्रकरणात 7 तहसीलदारांना अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी सभागृहात निलंबित केल्याची घोषणा केली होती. मॅटने त्या तहसीलदारांना पुन्हा कामावर घेतले आहे. यानंतर मंत्री महोदयांनी जाहीर भूमिका घेतली की, आम्हाला मॅट बंद करावे समाज आरक्षणापासून वंचित राहिला तर या सभागृहाचे काय काम आहे?

सभापती महोदय,भारतीय राज्य घटनेच्या 16 च्या खंडाच्या 4 नुसार एस.सी., एस.टी., विमुक्त जाती, भटक्या जमाती, धनगर, ओबीसी या सर्व समाजांना भरती, बढतीमध्ये आरक्षण दिलेले आहे. ते कायम ठेवण्याची गरज आहे. म्हणून मी हे अशासकीय विधेयक मांडले आहे. मॅट बंद करण्याचा निर्णय सरकारने घेतला तर आम्ही त्या निर्णयाचे स्वागत करु.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे.....

सभापती महोदय, मी या अशासकीय विधेयकाच्या निमित्ताने दोन सुधारणा सुचविल्या आहेत. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी 2004 मध्ये कायदा केला, त्यानुसार शासनाचा जीआर काढण्यात आला. त्या जीआर नुसार शासकीय अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करुन भरती व बढतीबाबत आरक्षण अंमलात आणले नाही तर त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी. वारंवार अशा घटना घडू नयेत म्हणून सामाजिक न्याय मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन संख्यात्मक आकडेवारी मॅटला देता येईल. शासनाने मी सुचविलेल्या सूचना मान्य कराव्यात अशी या निमित्ताने विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** (श्री.दिपकराव साळुंखे) : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक-15 मांडतो.

**तालिका सभापती** (श्री.दिपकराव साळुंखे) : विधेयक मांडण्यात आले आहे.

-----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मीरा-भाईंदर येथे पत्रकारांवर झालेल्या हल्ल्यासंबंधी**

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, आज सकाळी सभागृहाचे कामकाज सुरु होत असताना आज मीरा भाईंदर येथे घटनेच्या अनुषंगाने आम्ही नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली होती. आज मीरा भाईंदर येथे 3 पत्रकारांवर हल्ले झाले, त्यातील एका पत्रकाराचा मृत्यू झाला आहे. या घटनेबाबत सरकारने सभागृहात निवेदन करावे अशी आम्ही विनंती केली होती. आता सभागृहाचे आजचे कामकाज संपणार आहे. अद्याप सरकारकडून या घटनेबाबत निवेदन करण्यात आलेले नाही. कमीत कमी घटना काय घडली हे तरी सभागृहाला कळले पाहिजे. कायदा व सुव्यस्थेबाबत सरकार गंभीर आहे का? सभागृहात कामकाज सुरु होत असताना विरोधी पक्षाकडून नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना दिली होती त्यावर माननीय सभापतींनी निर्देश दिले होते की, सरकारने या घटनेबाबत तातडीने निवेदन करावे. चार तास उलटूनही सरकार या घटनेबाबत निवेदन करु इच्छित नाही, सरकारकडे कायदा व सुव्यवस्थेच्या घटेनबद्दल वेळ नाही. सरकारने तातडीने निवेदन केले पाहिजे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, नियम 289 अन्वये विरोधी पक्षाकडून प्रस्तावाची सूचना देण्यात आली होती, ती सूचना स्वीकारली नाही. दोन दिवसापूर्वी देखील एका महिला पत्रकारावर हल्ला झाला होता. सरकार या घटनांबाबत गंभीर नाही हेच दिसून येते. सरकारने तातडीने निवेदन करावे अशी मी विनंती करतो.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आज सकाळी सभागृहाचे कामकाज सुरु होत असताना मीरा भाईंदर येथील घटनेचा उल्लेख केला होता. नंतरच्या काळात दोन वेळा सभागृहात संबंधित विभागाचे मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज स्थगित करण्यात आले होते. अधिकारी गॅलरी सुध्दा पूर्णपणे निकामी होती. इतके दुर्लक्ष केल्यामुळे मीरा भाईंदर येथे दुर्दैवी घटना घडली आहे. त्याबाबत आजचे कामकाज संपण्यापूर्वी शासनाने निवेदन करावे असा निर्णय माननीय सभापतींनी दिला होता. शासनाकडून या विषयाबाबत आज निवेदन होणे आवश्यक आहे. या गंभीर घटनेची दखल न घेण्याचे कारण आम्हाला समजून येत नाही. या

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे.....

संदर्भात प्रक्रिया करणारी जी यंत्रणा आहे ती अकार्यक्षम झाली आहे का, असा प्रश्न यातून निर्माण होतो. या घटनेची माहिती सभागृहात देणे अत्यंत आवश्यक असताना अक्षम्य दुर्लक्ष होत आहे, हे खरोखर दुर्दैवी आहे. त्यावर उपाय म्हणून सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी शासनाने निवेदन करावे. सदरची बाब गंभीर असल्याने शासनाने दखल घ्यावी.

श्री.चंद्रकांत पाटील : सभागृहाचे कामकाज सायंकाळी 6.00 वाजता संपणार आहे, त्यापूर्वी म्हणजे सायंकाळी 5.30 वाजेपर्यंत निवेदन केले जाईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आजच्या दिवसाचे कामकाज जवळजवळ पूर्ण होत आले आहे. आम्ही गंभीर घटना घडल्याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. या राज्यामध्ये शेतकरी, पत्रकार, महिला, मुली सुरक्षित नाहीत. अशा परिस्थितीत एखादी घटना घडल्यानंतर विरोधी पक्षाकडून निवेदन करण्याची मागणी केली जाते. परंतु सरकारकडे उत्तर नसल्यामुळे सायंकाळी 5.30 वाजता निवेदन केले जाईल असे सांगण्यात आले. दुपारी 12.00 वाजता हा विषय सभागृहात मांडला होता. चार तास उलटून गेले आहेत. घटना काय घडली, किती लोकांना अटक झाली, आरोपी कोण आहेत याबाबत निवेदन करण्यास सरकारकडे वेळ नाही. ही कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भातील गंभीर बाब आहे.

नंतर 2 जी.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

एवढे होऊन सुद्धा सरकार निवेदन करीत नसेल तर सरकारचा निषेध करून आम्ही सभात्याग करतो.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य बहिर्गमन करतात.)

**तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे) :** कार्यक्रम पत्रिकेवरील अशासकीय ठराव नंतर घेण्यात येतील. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 20 जुलै 2015 रोजी, दुपारी 1.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक 4 वाजून 10 मिनिटांनी सोमवार, दिनांक 20 जुलै 2015 रोजीच्या दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION